कोण करी । सगळें ब्रह्म ब्रह्मांडोदरीं । माईल कैसें ॥ १७ ॥ अमृतीमध्यें आकाश । सगळें सांठवतां प्रयास । म्हणोन तयाचा अंश । बोलिजेतो ॥ १८ ॥ ब्रह्म तैसें कालवलें । परी तें नाहीं हालवलें । सर्वांमध्यें परी संचलें । संचलेपणें ॥ १९ ॥ पंचभूतीं असे मिश्रित । परंतु तें पंचभूतातीत । पंकीं आकाश अलिप्त । असोनि जैसें ॥ २० ॥ ब्रह्मास दृष्टांत न घडे । बुझावया देणें घडे । परी दृष्टांतीं साहित्य पडे । विचारितां आकाश ॥ २१ ॥ 'खंब्रह्म' ऐसी श्रुती । 'गगनसदृशं' हे स्मृती । म्हणोनि ब्रह्मास दृष्टांतीं । आकाश घडे ॥ २२ ॥ काळिमा नसतां पितळ । मग तें सोनेंचि केवळ । शुन्यत्व नस्तां निवळ । आकाश ब्रह्म ॥ २३ ॥ म्हणोनि ब्रह्म जैसें गगन । आणि माया जैसा पवन । आडळे परी दर्शन । नव्हे त्याचें ॥ २४ ॥ शब्दसृष्टीची रचना । होत जाते क्षणक्षणा । परंतु ते स्थिरावेना । वायुऐसी ॥ २५ ॥ असो ऐसी माया माईक । शाश्वत तें ब्रह्म येक । पाहों जातां अनेक । व्यापून आहे ॥ २६ ॥ पृथ्वीसी भेदून आहे । परी तें ब्रह्म कठीण नव्हे । दुजी उपमा न साहे । तया मृदत्वासी ॥ २७ ॥ पृथ्वीहूनि मृद जळ । जळाहूनि तो अनळ । अनळाहून कोमळ । वायो जाणावा ॥ २८ ॥ वायोहून तें गगन । अत्यंतचि मृद जाण । गगनाहून मृद पूर्ण । ब्रह्म जाणावें ॥ २९ ॥ वज्रास असे भेदिलें । परी मृदत्व नाहीं गेलें । उपमेरहित संचलें । कठिण ना मृद ॥ ३० ॥ पृथ्वीमध्यें व्यापून असे । पृथ्वी नासे तें न नासे । जळ शोषे तें न शोषे । जळीं असोनी ॥ ३१ ॥ तेजीं असे परी जळेना । पवनीं असे परी चळेना । गगनीं असे परी कळेना । परब्रह्म तें ॥ ३२ ॥ शरीर अवघें व्यापलें । परी तें नाहीं आडळलें । जवळिच दुरावलें । नवल कैसें

सगळें आकाश मावत नाहीं, त्याप्रमाणें ब्रह्मांडापेक्षां ब्रह्म मोठें असून त्यांत सगळें ब्रह्म सांठवणें अशक्य आहे म्हणून 'अंशमात्रें' हें पद घातलें आहे; वस्तुतः ब्रह्म हालत नाहीं, जातयेत नाहीं, तेथें अंशांशीभाव नाहीं. चिखलांत आकाश असून अलिप्त आहे, तसें ब्रह्म पंचभूतांत असून पंचभूतातीत आहे. ब्रह्मासारखें दुसरें कांहीं नसल्यामुळें त्याला कोणाचाच दृष्टांत देतां येत नाहीं, आकाशाचा मात्र बराच साजतो. 'खं ब्रह्म' म्ह. आकाश हें ब्रह्म आहे असें श्रुति म्हणते, व 'गगनसदृशं' असें स्मृतीनेंही म्हटलें आहे, म्हणून ब्रह्माला आकाशाचा दृष्टांत देतां येतो. पितळेला काळिमा चढत नसता तर पितळच सोनें म्हटलें असतें, तसें आकाश शून्य नसतें तर आकाशालाच ब्रह्म म्हटलें असतें. आकाश ब्रह्माजवळ आहे म्हणून आकाशाचा दृष्टांत ब्रह्माला देतां येतो. आकाशासारखें ब्रह्म आढळतें पण दृश्य नव्हे. आकाशांत वायु तशी ब्रह्मीं माया. आकाशीं वायु तशी निःशब्दाविषयीं शब्दरचना होत जाते. असो. माया मिथ्या, शाश्वत व व्यापक (१५–२६). ब्रह्म पृथ्वीस भेदून आहे पण पृथ्वीसारखें कठीण नाहीं. पृथ्वीपेक्षां जळ, जळापेक्षां तेज, तेजापक्षां वायु, वायूपेक्षां आकाश व आकाशापेक्षां ब्रह्म उत्तरोत्तर अधिक मृदु आहे. ब्रह्म वज्रासही भेदतें पण त्याचें मृदुत्व कमी होत नाहीं, तें मृदु ना कठीण असें अनुपम आहे. पंचभूतांचा त्यावर कोणताच परिणाम होत नाहीं. शरीर त्यानें व्यापलें असून तें आढळत नाहीं हें नवल

३३ ॥ सन्मुखचि चहूंकडे । तयामध्यें पाहाणें घडे । बाह्याभ्यंतरीं रोकडें । सिद्धचि आहे ॥ ३४ ॥ तयामध्येंचि आपण । आपणा सबाह्य तें जाण । दृश्यावेगळी खूण । गगनासारिखी ॥ ३५ ॥ कांहीं नाहींसें वाटलें । तेथेंचि तें कोंदाटलें । जैसें न दिसे आपलें । आपणासि धन ॥ ३६ ॥ जो जो पदार्थ दृष्टी पडे । तें त्या पदार्थां ऐलीकडे । अनुभवें हें कुवाडें । उकलावें ॥ ३७ ॥ मागें पुढें आकाश । पदार्थेंविण जो पैस । सृष्टीविण भकास । येकरूप ॥ ३८ ॥ जें जें रूप आणी नाम । तो तो नाथिलाच भ्रम । नामरूपातीत वर्म । अनुभवी जाणे ॥ ३९ ॥ नभीं धूम्राचे डोंगर । उचलती थोर थोर । तैसें दावी वोडंबर । माया देवी ॥ ४० ॥ ऐसी माया अशाश्वत । ब्रह्म जाणावें शाश्वत । सर्वां ठाईं सदोदित । भरलें असे ॥ ४१ ॥ पोथी वाचूं जातां पाहे । मातृकांमध्यें आहे । नेत्रीं निघोनि राहे । मृदपणें ॥ ४२ ॥ श्रवणें शब्द ऐकतां । मनें विचार पाहातां । मना सबाह्य तत्वता । परब्रह्म तें ॥ ४३ ॥ चरणें चालतां मार्गीं । जें आडळे सर्वांगीं । करें घेतां वस्तुलागीं । आडवें ब्रह्म ॥ ४४ ॥ असो इंद्रियसमुदाव । तयामध्यें वर्ते सर्व । जाणों जातां मोडे हांव । इंद्रियांची ॥ ४५ ॥ तें जवळिच असे । पाहों जातां न दिसे । न दिसोन वसे । कांहीं येक ॥ ४६ ॥ जें अनुभवेंचि जाणावें । सृष्टीचेनिं अभावें । आपुलेन स्वानुभवें । पाविजे ब्रह्म ॥ ४७ ॥ ज्ञानदृष्टीचें देखणें । चर्मदृष्टी पाहों नेणे । अंतरवृत्तीचिये खुणे । अंतरवृत्ती साक्ष ॥ ४८ ॥ जाणे ब्रह्म जाणे माया । जाणे अनुभवाच्या ठाया । ते येक जाणावी तुर्या । सर्वसाक्षिणी ॥ ४९ ॥ साक्षत्व वृत्तीचें कारण । उन्मनी ते निवृत्ति जाण । जेथें विरे जाणपण । विज्ञान तें ॥ ५० ॥ जेथें अज्ञान सरे । ज्ञान तेंहि नुरे । विज्ञानवृत्ति मुरे । परब्रह्मीं

आहे. तें सर्वत्र सन्मुख सबाह्य आहे. त्यांतच आपण आहोंत. दृश्यावेगळी (अदृश्य) खूण (दृष्टांत) फक्त आकाशाची आहे म्ह. आकाश अदृश्य तसें तें आहे. गुप्त धनासारखें आपलें असून आपणांस दिसत नाहीं. जो जो पदार्थ पहाल त्याच्या तें अलीकडे आहे. मागें पुढें आकाश आहे, मध्यें कांहीं एक पदार्थ नसून त्याचाच विस्तार आहे, तसें पृथिव्यादि कांहीं नसून त्याचा एकाचाच सारा विस्तार आहे. नामरूपात्मक सृष्टि भ्रमरूप असून नामरूपातीत ब्रह्म अनुभवीच जाणतात. तें सदोदित सर्वत्र संचलें आहे. पोथी वाचतांना तें पाहातें, अक्षरांत तेंच आहे, नेत्रांत मृदुपणानें तेंच आहे. कानानें शब्द ऐकतां, मनानें विचार पाहतां, मनाच्या आंतबाहेर तेंच आहे. पायानें चालतां, हातानें वस्तु घेतां, किंबहुना सर्व इंद्रियांत तेंच भरलें असून त्याला जाणायला जावें तों इंद्रियांची विषयाकडची हांव खुंटून जाते. तें जवळ असून दिसत नाहीं, न दिसून एकलें एक आहे. दृश्याचा विसर पडून तें स्वानुभवानेंच पावायचें आहे. तें चर्मचक्षूनें पाहतां येत नाहीं. तें ज्ञानदृष्टीचें पाहणें आहे. संतांच्या या अंतर्वृत्तीच्या खुणा अंतर्मुख संतच ओळखतात. ब्रह्म व माया दोन्हींकडे पाहणारी सर्वसाक्षिणी अवस्था तिला तुर्या म्हणतात. तुर्या साक्षित्वानें पाहते. सुखाच्या अनुभवाची स्थिति ती उन्नति की

॥ ५१ ॥ ऐसें ब्रह्म शाश्वत । जेथें कल्पनेसी अंत । योगीजना येकांत । अनुभवें जाणावा ॥ ५२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विमळब्रह्मनिरूपणनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ केवळ ब्रह्म जें बोलिलें । तें अनुभवास आलें । आणि मायेचेंहि लागलें । अनुसंधान ॥ १ ॥ ब्रह्म अंतरीं प्रकाशे । आणी मायाहि प्रत्यक्ष दिसे । आतां हें द्वैत निरसे । कवणेपरी हो ॥ २ ॥ तरी आतां सावधान । येकाग्र करावें मन । माया ब्रह्म हें कवण । जाणताहे ॥ ३ ॥ सत्य ब्रह्माचा संकल्प । मिथ्या मायेचा विकल्प । ऐसिया द्वैताचा जल्प । मनचि करी ॥ ४ ॥ जाणे ब्रह्म जाणे माया । ते येक जाणावी तुर्या । सर्व जाणे म्हणोनिया । सर्व साक्षिणी ॥ ५ ॥ ऐक तुर्येचें लक्षण । जेथें सर्व जाणपण । सर्वचि नाहीं तें कवण । जाणेल गा ॥ ६ ॥ संकल्पविकल्पाची सृष्टी । जाली मनाचिये पोटीं । तें मनचि मिथ्या सेवटीं । साक्षी कवणु ॥ ७ ॥ साक्षत्व चैतन्यत्व सत्ता । हे गुण ब्रह्माचिया माथां । आरोपले जाण वृथा । मायागुणें ॥ ८ ॥ घटमठाचेनि गुणें । त्रिविधा आकाश बोलणें । मायेचेनि खरेंपणें । गुण ब्रह्मीं ॥ ९ ॥ जंव खरेंपण मायेसी । तंवचि साक्षत्व ब्रह्मासी । मायेअविद्येचे निरासीं । द्वैत कैचें ॥ १० ॥ म्हणोनि सर्वसाक्षी मन । तेंचि जालिया उन्मन । मग तुर्यारूप ज्ञान । तें मावळोन गेलें ॥ ११ ॥ जयास द्वैत भासलें ।

जेथें मन मनपणानें मुरतें व जेथें जाणपण विरून जातें तें विज्ञान. जेथें अज्ञान सरतें, ज्ञान उरत नाहीं व विज्ञानही मुरतें तें परब्रह्म. तें शाश्वत, निर्विकल्प आहे. योगीजनांचा तो एकांत होय (२७–५२). [द० ७, स० ४]

प्रश्न—ब्रह्माचा अनुभव आला आणि मायेचेंही रूप कळलें, चित्तांत ब्रह्मप्रकाश झाला आणि बाहेर माया प्रत्यक्ष दिसली, याप्रमाणें ब्रह्म व माया हें द्वैत उभें राहिलें. याचें निरसन कसें होईल ? (१–२).

उत्तर—माया व ब्रह्म हीं दोन्ही कोण जाणतें याचा विचार कर. मनच दोन्ही कल्पना करितें. ब्रह्माची कल्पना ती शुद्ध कल्पना, व मायेची कल्पना ती शबल किंवा अशुद्ध कल्पना; एक संकल्प व एक विकल्प. मनाची दोन्ही कल्पना करणारी जी अवस्था तिला तुर्या (चौथी; जागृती, स्वप्न व सुषुप्ती याहून वेगळी म्हणून चौथी) किंवा सर्वसाक्षिणी (ब्रह्म व माया दोहींची साक्षी म्हणून) म्हणतात. तुर्यावस्था म्ह० सर्व जाणणारी, पण 'सर्व'च नाहीं (एक ब्रह्मच आहे त्याबेगळें कांहीं नाहीं) तेथें जाणपण कोणाचें ? संकल्प व विकल्प दोन्ही मन करितें म्हणून म्हणतात, पण जेथें मनच मिथ्या तेथें त्या मनाच्या साक्षिणी अवस्थेचा पत्ता कोठें लागावा ? साक्षित्व, चैतन्यत्व, सत्ता हे गुण ब्रह्मावर मायेनें लादले आहेत, हे खरे नव्हत, कां कीं ब्रह्म मुळींच निर्गुण आहे. घट व मठ या उपाधींच्या योगें घटाकाश व मठाकाश हे शब्द निघाले, वस्तुतः आकाशाच्या ठिकाणीं दोन्ही कल्पना मिथ्यारोप आहेत, तसे ब्रह्माच्या ठिकाणीं गुणाचा वृथा आरोप माया करिते, ब्रह्म निर्गुण निधर्म आहे. माया खरी मानतात तोंवर ब्रह्म साक्षी आहे असें म्हणतात, पण माया (आदिकल्पना; ब्रह्मांड व त्याचा स्वामी शिव यांची कल्पना) व अविद्या (पिंड व पिंडाचा चालक जीव याची कल्पना) या दोन्ही कल्पनांचा निरास झाल्यावर एक ब्रह्मच उरतें, द्वैताला जागाच कोठें आहे ? म्हणून सर्वसाक्षी मन म्ह० तुर्या पुढील उन्मनीच्या सुखांत लीन झालें म्हणजे तुर्येचें ज्ञान (ब्रह्म व माया या दोहींचें जाणपण)

तें मन उन्मन जालें। द्वैताद्वैताचें तुटलें। अनुसंधान ॥ १२ ॥ येवं द्वैत आणी अद्वैत। होय वृत्तीचा संकेत। वृत्ति जालिया निवृत्त। द्वैत कैंचें ॥ १३ ॥ वृत्तिरहित जें ज्ञान। तेंचि पूर्ण समाधान। जेथें तुटे अनुसंधान। मायाब्रह्मींचें ॥ १४ ॥ मायाब्रह्म ऐसा हेत। मनें कल्पिला संकेत। ब्रह्म कल्पनेरहित। जाणती ज्ञानी ॥ १५ ॥ जें मनबुद्धि अगोचर। जें कल्पनेहून पर। तें अनुभवितां साचार। द्वैत कैंचें ॥ १६ ॥ द्वैत पाहातां ब्रह्म नसे। ब्रह्म पाहातां द्वैत नसे। द्वैताद्वैत भासे। कल्पनेसी ॥ १७ ॥ कल्पना माया निवारी। कल्पना ब्रह्म थावरी। संशय धरी आणी वारी। तेहि कल्पना ॥ १८ ॥ कल्पना करी बंधन। कल्पना दे समाधान। ब्रह्मीं लावी अनुसंधान। तेहि कल्पना ॥ १९ ॥ कल्पना द्वैताची माता। कल्पना ज्ञप्ती तत्वता। बद्धता आणी मुक्तता। कल्पनागुणें ॥ २० ॥ कल्पना अंतरीं सबळ। नसते दावी ब्रह्मगोळ। क्षणा येकातें निर्मळ। स्वरूप कल्पी ॥२१॥ क्षणा येका धोका वाहे। क्षणा येका स्थिर राहे। क्षणा येका पाहे। विस्मित होउनी ॥ २२ ॥ क्षणा येकातें उमजे। क्षणा येकातें निर्बुजे। नाना विकार करिजे। ते कल्पना जाणावी ॥ २३ ॥ कल्पना जन्माचें मूळ। कल्पना भक्तीचें फळ। कल्पना तेचि केवळ। मोक्षदाती ॥ २४ ॥ असो ऐसी हे कल्पना। साधनें दे समाधाना। येरवीं हे पतना। मूळच कीं ॥ २५ ॥ म्हणोन सर्वांचें मूळ। ते हे कल्पनाच केवळ। इचें केलिया निर्मूळ। ब्रह्मप्राप्ती ॥ २६ ॥ श्रवण आणी मनन। निजध्यासें समाधान। मिथ्या कल्पनेचें भान। उडोन जाये ॥ २७ ॥ शुद्ध ब्रह्माचा निश्चयो। करी कल्पनेचा जयो। निश्चितार्थें संशयो। तुटोन जाय ॥ २८ ॥ मिथ्या कल्पनेचें कोडें। कैसें राहे साचापुढें। जैसें सूर्याचेनि उजेडें।

सहजच मावळून जातें. या द्वैताची कल्पना करणारें मनच उन्मन झालें म्ह० द्वैत संपलें व त्याच्या सापेक्षतेनें भासणारें अद्वैतही उरलें नाहीं. द्वैताद्वैत कल्पना निमाल्या, त्या वृत्तीच्या शाखा आहेत. वृत्तिरहित ज्ञान तेंच समाधान, तेथें मायाब्रह्म या द्वैताचें अनुसंधान तुटतें, ब्रह्म कल्पनातीत, निर्विकल्प आहे, ब्रह्म मनबुद्धीपलीकडे आहे, तेथें द्वैत कोठचें ? द्वैत पाहतां ब्रह्म नाहीं व ब्रह्म पाहतां द्वैत नाहीं (१२–१७). सारा खेळ कल्पनेचा आहे. कल्पनाच माया दूर करून ब्रह्म सिद्ध करिते, संदेह उभारते व निवारते. बंध व मोक्ष या दोन्ही कल्पनाच, ब्रह्माचें अनुसंधान किंवा चिंतन हीही कल्पनाच. कल्पना द्वैताची जननी आहे. ज्ञान ही कल्पनाच आहे. (ज्ञान अज्ञान सापेक्ष आहे,) शबल कल्पना मिथ्या ब्रह्मगोळ दाखविते व शुद्ध कल्पना स्वरूप कल्पिते. संसाराचें भय (धोका) वाहणें, स्थिर होणें (स्वरूपीं, आश्चर्यानें स्वरूपाकडे पाहणें, उमजणें व न उमजणें (ज्ञान व अज्ञान), विकारांचा पुंज वाढवणें ही सारी कल्पना. मी जन्ममृत्युवान् ही कल्पना व मी मुक्त हीही कल्पना ! पहिली कल्पना पतनास नेते व दुसरी मोक्षाचें समाधान देते म्हणून बंधाचें व मोक्षाचें मूळ कल्पनाच (मन, वृत्ति,) आहे (१८–२६). श्रवणमनननिदिध्यासाच्या अभ्यासानें मायेची मिथ्या कल्पना उडून जाते. शुद्ध ब्रह्माचा निश्चय झाला कीं कल्पना (संशय) उडून जाते. सूर्यापुढें अंधार कसा टिकेल ? तसें शुद्धज्ञाननिश्चयानें द्वैतकल्पना निरसून

नासे तम ॥ २९ ॥ तैसें ज्ञानाचेनि प्रकाशें । मिथ्या कल्पना हे नासे । मग हें तुटे अपैसें । द्वैतानुसंधान ॥ ३० ॥ कल्पनेनें कल्पना उडे । जैसा मृगें मृग सांपडे । कां शरें आतुडे । आकाशमार्गीं ॥३१॥ शुद्ध कल्पनेचें बळ । जालियां नासे सबळ । हेंचि वचन प्रांजळ । सावध ऐका ॥ ३२ ॥ शुद्ध कल्पनेची खूण । स्वयें कल्पिजे निर्गुण । सत्स्वरूपीं विस्मरण । पडोंचि नेदी ॥ ३३ ॥ सदा स्वरूपानुसंधान । करी द्वैताचें निरसन । अद्वयनिश्चयाचें ज्ञान । तेचि शुद्ध कल्पना ॥३४॥ अद्वैत कल्पी ते शुद्ध । द्वैत कल्पी ते अशुद्ध । अशुद्ध तेचि प्रसिद्ध । सबळ जाणावी ॥ ३५ ॥ शुद्ध कल्पनेचा अर्थ । अद्वैताचा निश्चितार्थ । आणी सबळ ते व्यर्थ । द्वैत कल्पी ॥ ३६ ॥ अद्वैतकल्पना प्रकाशे । तेचि क्षणीं द्वैत नासे । द्वैतासरिसी निरसे । सबळ कल्पना ॥ ३७ ॥ कल्पनेनें कल्पना सरे । ऐसी जाणावी चतुरें । सबळ गेलिया नंतरें । शुद्ध उरली ॥ ३८ ॥ शुद्ध कल्पनेचें रूप । तेंचि जे कल्पी स्वरूप । स्वरूप कल्पितां तद्रूप । होय आपण ॥ ३९ ॥ कल्पनेसी मिथ्यत्व आलें । सहजचि तद्रूप जालें । आत्मनिश्चयें नासिलें । कल्पनेसी ॥ ४० ॥ जेचि क्षणीं निश्चयो चळे । तेचि क्षणीं द्वैव उफाळे । जैसा अस्तमानीं प्रबळे । अंधकार ॥ ४१ ॥ तैसें ज्ञान होतां मळिण । अज्ञान प्रबळे जाण । याकारणें श्रवण । अखंड असावें ॥४२॥ आतां असो हें बोलणें जालें । आशंका फेडूं येका बोलें । जयास द्वैत भासलें । तें तूं नव्हेस सर्वथा ॥ ४३ ॥ मागील आशंका फिटली । इतुकेन हे कथा संपली । पुढें वृत्ति सावध केली । पाहिजे श्रोतीं ॥ ४४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वैतकल्पनानिरसननाम समास पंचम ॥ ५ ॥

॥ श्रीराम ॥ अद्वैत ब्रह्म निरोपिलें । जें कल्पनेरहित संचलें । क्षण येक तदाकार केलें । मज या निरूपणें ॥ १ ॥ तरी म्यां तदाकार व्हावें । ब्रह्मचि

जाते. ब्रह्माच्या शुद्ध कल्पनेनें मायेची मिथ्या कल्पना उडून जाते. कल्पनेनें कल्पना मोडते. मृग (कुत्रा) पाठीं लावून मृग (हरिण) पकडतात किंवा बाणानेंच बाण (शत्रूचा) तोडतात. तशी निर्गुणाची कल्पना (म्ह० स्वस्वरूपानुसंधान म्ह० अद्वैतनिश्चय) ही द्वैताची अशुद्ध कल्पना मोडते. ती गेली कीं शुद्ध कल्पनाच उरते. मुळीं कल्पना मिथ्या हा निश्चय झाला कीं ब्रह्माशीं तद्रूपताच उरते. अस्तमानीं अंधार पसरतो, तसा आत्मनिश्चय ढळला कीं द्वैत प्रबळ होतें, ज्ञान मळिन झालें कीं अज्ञानें पसरतें. म्हणून निश्चयदृढतेसाठीं अखंड श्रवण मनन असावें. तात्पर्य, ज्याला द्वैत भासतें तें तूं नाहींस, तूं उभय कल्पनातीत आहेस एवढें ओळख (२७–४४). [द० ७, स० ५]

६ प्रश्न — आतां आणखी एक विचारणें आहे. अद्वैत ब्रह्म कल्पनेरहित आहे या निरूपणानें मला क्षणभर तदाकार केलें ; पण मी तदाकार व्हावें, ब्रह्मच होऊन असावें, पुन्हां संसारास येऊं नये याचा उपाय सांगा, निर्विकल्प ब्रह्म व्हावें

होऊन असावें। पुन्हा संसारासी न यावें। चंचळपणें सर्वथा॥ २॥ कल्पनेरहित जें सुख। तेथें नाहीं संसारदुःख। म्हणोनियां तेंचि येक। होऊन असावें॥३॥ ब्रह्मचि होईजे श्रवणें। पुन्हा वृत्तीवरी लागे येणें। ऐसें सदा येणें जाणें। चुकेना कीं॥ ४॥ मनें अंतरिक्ष जावें। क्षणयेक ब्रह्मचि व्हावें। पुन्हा तेथून कोसळावें। वृत्तीवरी मागुतें॥ ५॥ प्रत्यावृत्ती सैरावैरा। किती करूं येरझारा। पाईं लाउनियां दोरा। कीटक जैसा॥ ६॥ उपदेशकाळीं तदाकार। होतां पडे हें शरीर। अथवा नेणे आपपर। ऐसें जालें पाहिजे॥ ७॥ ऐसें नस्तां जें बोलणें। तेंचि वाटे लाजिरवाणें। ब्रह्म होऊन संसार करणें। हेंहि विपरीत दिसे॥ ८॥ जो स्वयें ब्रह्मचि जाला। तो मागुता कैसा आला। ऐसें ज्ञान माझें मजला। प्रशस्त न वाटे॥ ९॥ ब्रह्मचि होऊन जावें। कां तें संसारींच असावें। दोहींकडे भरंगळावें। किती म्हणूनी॥ १०॥ निरूपणीं ज्ञान प्रबळे। उठोन जातां तें मावळे। मागुता कामक्रोध खवळे। ब्रह्मरूपासी॥ ११॥ ऐसा कैसा ब्रह्म जाला। दोहींकडे अंतरला। वोडगस्तपणेंचि गेला। संसार त्याचा॥ १२॥ घेतां ब्रह्मसुखाची गोडी। संसारिक मागें वोडी। संसार करितां आवडी। ब्रह्मीं उपजे मागुती॥ १३॥ ब्रह्मसुख नेलें संसारें। संसार गेला ज्ञानद्वारें। दोनी अपुरीं पुरें। येकही नाहीं॥ १४॥ याकारणें माझें चित्त। चंचळ जालें दुश्चीत। काये करणें निश्चीत। येकही नाहीं॥ १५॥ ऐसी श्रोता करी विनती। आतां राहावें कोणे रीती। म्हणे अखंड माझी मती। ब्रह्माकार नाहीं॥ १६॥ आतां याचें प्रत्योत्तर। वक्ता देईल सुंदर। श्रोतीं व्हावें निरोत्तर। क्षणयेक आतां॥ १७॥ ब्रह्मचि होऊन जे पडिले। तेचि मुक्तपदास गेले। येर ते काय बुडाले। व्यासादिक॥ १८॥ श्रोता

आणि तेथून वृत्तीवर कोसळून पडावें हें मला नको. जन्ममृत्यूच्या येरझारा, सुखदुःखाचे धक्के, हा वृत्तिरूप संसार मला नको. एखाद्या कीटकाच्या पायाला दोरा बांधून त्याला आकाशांत सोडून द्यावें आणि लगेच दोरीला हिसका मारून खालीं पृथ्वीवर खेंचावें असें माझें होत आहे! अद्वैत-ब्रह्माचें निरूपण ऐकतांच हा देह पडावा, मृत्यु यावा, किंवा आपपर भेद निःशेष निवटावा असें झालें पाहिजे! ब्रह्म होऊन संसार करावा हें मला लाजिरवाणें वाटतें. ब्रह्म प्राप्त झाल्यावर वृत्तीवर येऊन संसार कां करावा? 'निरूपणीं ज्ञान प्रबळे। उठोन जातां तें मावळे!' अशी स्थिति होत असल्यामुळें 'माझी गति अखंड ब्रह्माकार नाहीं.' ब्रह्मसुख घेतांना संसार मागें ओढतो व संसार करितांना चित्त पुन्हां ब्रह्माकडे ओढतें याप्रमाणें 'ब्रह्मसुख नेलें संसारें। संसार गेला ज्ञानद्वारें' अशी 'देव ना संसार' स्थिति मला नको, मी तिला कंटाळलों आहें तात्पर्य, ब्रह्मनिरूपणीं हा देह पडावा व मी पुन्हां वृत्तिरूप संसारीं येऊं नये याला निश्चयाचा उपाय मला सांगा. माझें मन चंचळ होऊन दोहींकडे हेलकावे खात आहे, एकही निश्चय होत नाहीं, म्हणून मति अखंड ब्रह्माकार होण्याचा उपाय सांगा (१–१६).

६ उत्तर — वाहवा! याचें निरुत्तर उत्तर देतों तें ऐक. पण आधीं मी विचारतों कीं जे ब्रह्म होऊन पडले तेवढेच

विनती करी पुढती । शुको मुक्तो वामदेवो वा हे श्रुती । दोघेचि मुक्त आदिअंतीं । बोलतसे ॥ १९ ॥ वेदें बद्ध केले सर्व । मुक्त शुक वामदेव । वेदवचनीं अभाव । कैसा धरावा ॥ २० ॥ ऐसा श्रोता वेदाधारें । देता जाला प्रत्योत्तरें । दोघेचि मुक्त अत्यादरें । प्रतिपाद्य केलें ॥ २१ ॥ वक्ता बोले याउपरी । दोघेचि मुक्त सृष्टीवरी । ऐसें बोलतां उरी । कोणास आहे ॥ २२ ॥ बहु ऋषि बहु मुनी । सिद्ध योगी आत्मज्ञानी । जाले पुरुष समाधानी । असंख्यात ॥ २३ ॥

॥ श्लोक ॥ प्रऱ्हादनारदपराशरपुंडरीकव्यासांबरीषशुकशौनकभीष्मदाल्भ्यान् ।
रुक्मांगदार्जुनवसिष्ठबिभीषणादीन्पुण्यानिमान्परमभागवतान्स्मरामि ॥ १ ॥
कविर्हरिरंतरिक्षः प्रबुद्धः पिप्पलायनः । आविर्होत्रोऽथद्रुमिलश्चमसः करभाजनः ॥ २ ॥

याहि वेगळे थोर थोर । ब्रह्माविष्णुमहेश्वर । आदिकरून दिगंबर । विदेहादिक ॥ २४ ॥ शुक वामदेव मुक्त जाले । येर हे अवघेचि बुडाले । या वचना विश्वासले । ते पढतमूर्ख ॥ २५ ॥ तरी वेद कैसें बोलिला । तो काय तुम्हीं मिथ्या केला । ऐकोन वक्ता देता जाला । प्रत्योत्तर ॥ २६ ॥ वेद बोलिला पूर्वपक्ष । मूर्ख तेथेंचि लावी लक्ष । साधु आणी व्युत्पन्न दक्ष । त्यांस हें न मने ॥ २७ ॥ तथापी जरी हें मानलें । तरी वेदसामर्थ्य बुडालें । वेदांचेनि उद्धरिलें । न वचे कोणा ॥ २८ ॥ वेदाआंगीं सामर्थ्य नसे । तरी या वेदास कोण पुसे । म्हणोनि वेदीं सामर्थ्य असे । जन उद्धरावया ॥ २९ ॥ वेदाक्षर घडे ज्यासी । तो बोलिजे पुण्यरासी । म्हणोन वेदीं सामर्थ्यासी ।

मुक्त झाले आणि इतर व्यासादिक काय बुडाले? प्रपंचांत राहून कर्में करीत असतांना काय मुक्ति मिळत नाहीं? (१७-१८)

१ प्रतिप्रश्न—'शुको मुक्तो वामदेवो वा' अशी श्रुति आहे ना? दोघेच मुक्त बाकी सर्व बद्ध असें वेदांनींच म्हटलें आहे आणि वेदवचनावर अविश्वास कसा धरावा?

१ प्रत्युत्तर—दोघांशिवाय कोणीच मुक्त झाले नाहींत किंवा होणार नाहींत असें का तुझें म्हणणें? अरे! प्रऱ्हाद, नारद, पराशर, पुंडरीक, व्यास, अंबरीष, शौनक, भीष्म, दाल्भ्य, रुक्मांगद, अर्जुन, वसिष्ठ, बिभीषण इत्यादि महाभागवत, तसेच भागवतांत, (स्कंध ११ अ० २) वर्णिलेले कवि, हरि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, आविर्होत्र, द्रुमिल, चमस व करभाजन हे नवयोगी, शिवाय ब्रह्माविष्णुहर, विदेहादि राजर्षि, तात्पर्य, बहु ऋषि, बहु मुनी, सिद्ध, योगी, आत्मज्ञानी असंख्य झाले आहेत. असें असतांना 'शुक वामदेव' हे दोघेच मुक्त झाले व बाकी सारे बुडालेले या वचनावर पढतमुर्खा-शिवाय कोणीच विश्वास ठेवणार नाहीं! (१९–२५).

२ प्रतिप्रश्न—मग वेदवचन काय मिथ्या म्हणतां?

२ प्रत्युत्तर—वेदानें हा पूर्वपक्ष मांडला आणि तूं मूर्ख तेंच धरून बसला आहेस? हें संत सज्जन कोणी मानणार नाहींत! आणि हा पूर्वपक्ष नसून वेदाचा सिद्धांतच आहे असें कोणी सिद्ध करील तर मी स्वच्छ सांगेन कीं 'बा वेदोनारायणा! तुझें सामर्थ्य बुडालें, तूं कोणालाही उद्धरायला समर्थ नाहींस!'—आणि जनांस उद्धरायचें सामर्थ्य वेदांत नसेल तर वेदाला विचारणार तरी कोण? पण असें नाहीं. वेदांत सामर्थ्य आहे. वेदाक्षर ज्याला येतें त्याला पुण्यशील म्हणतात.

काय उणें ॥ ३० ॥ वेदशास्त्रपुराण । भाग्यें जालियां श्रवण । तेणें होईजे पावन । हें बोलती साधु ॥ ३१ ॥ श्लोक अथवा श्लोकार्ध । नाहीं तरी श्लोकपाद । श्रवण होतां येक शब्द । नाना दोष जाती ॥ ३२ ॥ वेदशास्त्रीं पुराणीं । ऐशा वाक्याच्या आइणी । अगाध महिमा व्यासवाणी । वदोन गेली ॥ ३३ ॥ येकाक्षर होतां श्रवण । तत्काळचि होईजे पावन । ऐसें ग्रंथाचें महिमान । ठाईं ठाईं बोलिलें ॥ ३४ ॥ दोहींवेगळा तिजा नुद्धरे । तरी महिमा कैंचा उरे । असो हें जाणिजे चतुरें । येरां गथागोवी ॥ ३५ ॥ वेदशास्त्रें पुराणें । कैसीं होतीं अप्रमाणें । दोघांवांचून तिसरा कोणें । उद्धरावा ॥ ३६ ॥ म्हणसी काष्ठीं लागोन पडिला । तोचि येक मुक्त जाला । शुक तोहि अनुवादला । नाना निरूपणें ॥ ३७ ॥ शुक मुक्त ऐसें वचन । वेद बोलिला हें प्रमाण । परी तो नव्हता अचेतन । ब्रह्माकार ॥ ३८ ॥ अचेतन ब्रह्माकार । असता शुक योगेश्वर । तरी सारासारविचार । बोलणें न घडे ॥ ३९ ॥ जो ब्रह्माकार जाला । तो काष्ठ होऊन पडिला । शुक भागवत बोलिला । परीक्षितीपुढें ॥ ४० ॥ निरूपण हें सारासार । बोलिला पाहिजे विचार । धांडोळावें सचराचर । दृष्टांताकारणें ॥ ४१ ॥ क्षण येक ब्रह्मचि व्हावें । क्षण येक दृश्य धांडोळावें । नाना दृष्टांतीं संपादावें । वगतृत्वासी ॥ ४२ ॥ असो भागवतनिरूपण । शुक बोलिला आपण । तया आंगीं बद्धपण । लावूं नये कीं ॥ ४३ ॥ म्हणोनी बोलतां चालतां । निचेष्टित पडिलें नस्तां । मुक्ति लाभे सायोज्यता । सद्गुरुबोधें ॥ ४४ ॥ येक मुक्त येक नित्यमुक्त । येक जाणावे जीवन्मुक्त । येक योगी विदेहमुक्त । समाधानी ॥ ४५ ॥ सचेतन ते जीवन्मुक्त । अचेतन ते विदेहमुक्त । दोहिंवेगळे नित्यमुक्त । योगेश्वर

वेदाच्या सामर्थ्याविषयीं शंकाच नाहीं. वेदशास्त्रपुराणांच्या श्रवणानें लोक उद्धरून जातात. त्याचा एक श्लोक, श्लोकार्ध, एक पाद किंवा एक शब्द जरी कानांवर पडला तरी जीव पावन होतो. म्हणून शुकवामदेवाशिवाय कोणीच मुक्त होत नाहीं हा वेदाचा अभिप्राय नसलाच पाहिजे. वेदांनीं दोघांनाच मुक्त केलें असें म्हटलें तर इतरांना कोण उद्धरील? बरें, काष्ठ होऊन पडणें म्हणजे मुक्त होणें असें म्हणशील तर शुकही कित्येक निरूपणें बोलले आहेत! शुकांनीं परिक्षितीला स्वमुखानें भागवत सांगितलें आहे यावरून ते काष्ठासारखे अचेतन होऊन पडले नव्हते हें स्पष्ट आहे, आणि शुक मुक्त हें वेदाचें वचन आहे, तस्मात् काष्ठवत् अचेतन पडणें म्हणजे मुक्ति हा वेदाचा अभिप्राय नाहीं हें सिद्ध झालें. भागवत निरूपणांत सारासार विचार आहे. सारासार विचार सांगतांना दृष्टान्तासाठीं चराचर सृष्टि धांडोळावी लागते. क्षणैक ब्रह्म व्हावें, क्षणैक दृश्य धुंडाळावें, व त्यांतून दृष्टान्त घेऊन सिद्धान्त स्थापित करावा. याप्रमाणें वक्तृत्व उभारावें हा सर्व निरूपणकारांचा किंवा ग्रंथकारांचा अनुभव आहे. शुकाचार्य निरूपण बोलले आहेत व त्यांनाही असेंच करावें लागलें आहे म्हणून त्यांना बद्ध म्हणतां येईल काय? तात्पर्य, बोलतां चालतां, काष्ठवत् निश्चेष्ट पडलें नसतांही मुक्तपण सद्गुरुकृपेनें टळत नाहीं. जिवंतपणींच ज्ञान होऊनही व्यवहार करीत असतात त्यांना जीवन्मुक्त म्हणतात व देहभान विसरतात त्यांना विदेहमुक्त

जाणावे ॥ ४६ ॥ स्वरूपबोधें स्तब्धता । ते जाणावी ताटस्तता । ताटस्तता आणी स्तब्धता । हा देहसमंधु ॥ ४७ ॥ येथें अनुभवासी कारण । येर सर्व निःकारण । तृप्ती पावावी आपण । आपुल्या स्वानुभवें ॥ ४८ ॥ कंठमर्याद जेविला । त्यास म्हणती भुकेला । तेणें शब्दें जाजावला । हें तों घडेना ॥ ४९ ॥ स्वरूपीं नाहीं देहो । तेथें काईसा संदेहो । बद्ध मुक्त ऐसा भावो । देहाचकडे ॥ ५० ॥ देहबुद्धि धरून चिंती । मुक्त ब्रह्मादिक नव्हेती । तेथें शुकाची कोण गती । मुक्तपणाची ॥ ५१ ॥ मुक्तपण हेंचि बद्ध । मुक्त बद्ध हें अबद्ध । सस्वरूप स्वतःसिद्ध । बद्ध ना मुक्त ॥५२॥ मुक्तपणाची पोटीं शिळा । बांधतां जाईजे पाताळा । देहबुद्धीचा आगळा । स्वरूपीं न साहे ॥ ५३ ॥ मीपणापासून सुटला । तोचि येक मुक्त जाला । मुका अथवा बोलिला । तरी तो मुक्त ॥ ५४ ॥ जयास बाधावें तें वाव । तेथें कैंचा मुक्तभाव । पाहो जातां सकळ वाव । गुण वार्ता ॥ ५५ ॥

बद्धो मुक्त इति व्याख्या गुणतो मे न वस्तुतः । गुणस्य मायामूलत्वान्न मे मोक्षो न बंधनम् ॥ ६ ॥

तत्वज्ञाता परम शुद्ध । तयासी नाहीं मुक्त बद्ध । मुक्त बद्ध हा विनोद । मायागुणें ॥ ५६ ॥ जेथें नामरूप हें सरे । तेथें मुक्तपण कैंचें उरे । मुक्त बद्ध हें विसरे । विसरलेपणें ॥ ५७ ॥ बद्ध मुक्त जाला कोण । तो तरी नव्हे कीं आपण । बद्धक जाणावें मीपण । धर्त्यास बाधी ॥ ५८ ॥ एवं हा अवघा भ्रम । अहंतेचा जाला श्रम । मायातीत जो विश्राम । सेविला नाहीं ॥ ५९ ॥ असो बद्धता आणी मुक्तता । आली कल्पनेच्या माथां । ते कल्पना तरी तत्वता । साच आहे ॥ ६० ॥ म्हणोनी हें मृगजळ । माया नाथिलें आभाळ । स्वप्न मिथ्या

म्हणतात. स्वरूपबोधानें तटस्थता किंवा स्तब्धता प्राप्त होणें हा देहधर्म आहे त्याचा स्वरूपबोधाशीं कांहीं संबंध नाहीं. आत्मानुभव हा मुख्य आहे. तो झाल्यावर कोणी स्तब्ध राहतील, कोणी हालचाल (व्यवहार) करतील. व्यवहार करितो एवढ्याचसाठीं कोणी ज्ञान्याला बद्ध म्हणत असतील तर म्हणेनात बिचारे ! एक मनुष्य आकंठ जेवून तृप्त झाला आहे व दुसरा त्यास 'तूं जेवला नाहींस, भुकिस्त आहेस' असें म्हणूं लागला, तर जो तृप्त झाला आहे त्याची काय हानि आहे ? तो तृप्तच आहे. ताटस्थ्य किंवा हालचाल हे दोन्ही देहाकडे येतात आणि स्वरूपीं देहच नाहीं, म्हणून जो स्वरूपाकार झाला अर्थात् देहाभिमानापासून सुटला तो बद्ध आणि मुक्त या दोन्हींपासून मोकळा झाला. मी मुक्त असें वाटणें हें बद्धपण स्वरूपबद्ध नाहीं न मुक्तही नाहीं. बद्धपण देहबुद्धींत आहे. ती गेल्यावर 'मुका अथवा बोलिला' तरी तो मुक्तच आहे. 'मी मुक्त' या देहबुद्धीचा पाषाण पोटीं बांधील तर तो मुक्तपणानें बद्ध होय, कां कीं, देहबुद्धि बाळगणारा स्वरूपाकार होतच नाहीं. बद्ध व मुक्त ही भाषा मायेंतली आहे, स्वरूपाशीं बद्धमुक्तपणाचा कांहीं संबंध नाहीं, व स्वरूपाकार झालेल्या ज्ञात्याशींही नाहीं. नामरूपात्मक माया नाहींशी होते तेथें मुक्तपणाची कल्पना तरी कोण करणार ? जो खरोखरी मुक्त होतो तो 'बद्ध–मुक्त' या दोन्ही कल्पना विसरून जातो. बद्ध व मुक्त कांहीं आत्मा नव्हे, हा संबंध देहाकडे येतो व देह कांहीं आपण (आत्मा) नव्हे. हें बंधन मीपण घेणारास बंधक आहे. मायातीत विश्रामस्थान जें परब्रह्म तें प्राप्त झालें नाहीं, तोंवरच मीपण असतें. बद्धता व मुक्तता ही कल्पना आहे व ती कल्पना तरी खरी आहे ? नाहीं; मृगजळासारखी

तत्काळ। जागृतीसी होय ॥ ६१ ॥ स्वप्नीं बद्ध मुक्त जाला। तो जागृतीस नाहीं आला। कैंचा कोण काय जाला। कांहीं कळेना ॥ ६२ ॥ म्हणोनि मुक्त विश्वजन। जयास जालें आत्मज्ञान। शुद्धज्ञानें मुक्तपण। समूळ वाव ॥ ६३ ॥ बद्ध मुक्त हा संदेहो। धरी कल्पनेचा देहो। साधु सदा निःसंदेहो। देहातीत वस्तु ॥ ६४॥ आतां असो हें पुढती। पुढें राहावें कोणे रिती। तेंचि निरूपण श्रोतीं। सावध परिसावें ॥ ६५॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे बद्धमुक्तनिरूपणनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥ वस्तूसी जरी कल्पावें। तरी ते निर्विकल्प स्वभावें। तेथें कल्पनेच्या नांवें। शून्याकार ॥ १ ॥ तथापि ते कल्पूं जातां ॥ नये कल्पनेच्या हातां। ओळखी ठाईं न पडे चित्ता। भ्रंश पडे ॥२॥ कांहीं दृष्टीसचि न दिसे। मनास तेंहि न भासे। न भासे न दिसे कैसें। वोळखावें ॥ ३ ॥ पाहों जातां निराकार। मनासि पडे शून्याकार। कल्पूं जातां अंधकार। भरला वाटे ॥ ४ ॥ कल्पूं जातां वाटे काळें। ब्रह्म काळें ना पिवळें। आरक्त निळें ना धवळें। वर्णरहित ॥ ५ ॥ तयासी वर्णव्यक्ती नसे। भासाहून अनारिसें। रूपचि नाहीं कैसें। वोळखावें ॥ ६ ॥ न दिसतां वोळखण। किती धरावी आपण। हें भ्रमासीच कारण। होतसे ॥ ७ ॥ जो निर्गुण गुणातीत। जो अदृश्य अव्यक्त। जो अचिंत्य चिंतनातीत। परम पुरुष ॥ ८ ॥

॥ श्लोक ॥ अचिंत्याव्यक्तरूपाय निर्गुणाय गुणात्मने। समस्तजगदाधारमूर्तये ब्रह्मणे नमः ॥

अचिंत्य तेंचि चिंतावें। अव्यक्तास आठवावें। निर्गुणास वोळखावें। कोणेपरी ॥ ९ ॥ जें दृष्टीसचि न पडे। जें मनासही नातुडे। तया कैसें पाहाणें घडे। निर्गुणासी ॥ १० ॥ असंगाचा संग धरणें। निरावलंबीं वास करणें।

किंवा अभ्रासारखी मिथ्या आहे. या संसारस्वप्नांत जो मी बद्ध किंवा मी मुक्त म्हणतो तो जागाच झाला नाहीं असें समजावें, म्हणूनच त्याला बद्धता काय व मुक्तता काय हें कांहींच कळत नाहीं. ज्याला शुद्ध आत्मज्ञान झालें त्याला सर्व जीव मुक्त आहेत. कोणीच बद्ध नाहीं; हेंच दुसऱ्या भाषेनें सांगायचें म्हणजे मुक्तपणच त्याला व्यर्थ (वाव) होय (मुक्तत्वाची कल्पनाच नाहीं), कां कीं, तो देहातीत निःसंदेह असतो (२६–६५). [द० ७, स० ६]

७ प्रश्न—ब्रह्मवस्तु जर निर्विकार आहे तर तिची कल्पना कशी करावी ? बळेंच कल्पावी तर जेथच्या तेथें ओळख न पडतां भ्रमानें भलतीकडेच लक्ष जातें ! डोळ्यांस दिसत नाहीं व मनास भासत नाहीं असें ब्रह्म ओळखावें कसें ? कल्पूं जातां अंधार भरलासें वाटतें. त्याला वर्णव्यक्ति (रंगरूप) नाहीं, गुण नाहीं, तें अचिंत्य आहे म्हणतां, अशा त्या निर्गुणाला पहावें कसें ? तें असंग, निरावलंब (आधाररहित), निःशब्द आहे. त्या अद्वैताचें ध्यान करावें तर मनांत द्वैतच उभें रहातें. अनुसंधान न धरावें तर संशयांत मन पडतें. अद्वैताचें ध्यान धरूं जातां द्वैत उभें राहतें. या भीतीनें ब्रह्माकडे

निशब्दासी अनुवादणें । कोणेपरी ॥ ११ ॥ अचिंत्यासी चिंतूं जातां । निर्विकल्पासी कल्पितां । अद्वैताचें ध्यान करितां । द्वैतचि उठे ॥ १२ ॥ आतां ध्यानचि सोडावें । अनुसंधान तें मोडावें । तरी मग तें पडावें । महासंशईं ॥ १३ ॥ द्वैताच्या भेणें अंतरीं । वस्तु न पाहिजे तरी । तेणें समाधाना उरी ॥ कदा असेचिना ॥ १४ ॥ सवे लावितां सवे पडे । सवे पडतां वस्तु आतुडे । नित्यानित्यविचारें घडे । समाधान ॥ १५ ॥ वस्तु चिंतितां द्वैत उपजे । सोडी करितां कांहींच नुमजे । शून्यत्वसंदेहीं पाडिजे । विवेकेंविण ॥ १६ ॥ म्हणोनि विवेक धरावा । ज्ञानें प्रपंच सारावा । अहंभाव वोसरावा । परी तो वोसरेना ॥ १७ ॥ परब्रह्म तें अद्वैत । कल्पितांच उठे द्वैत । तेथें हेत आणि दृष्टांत । कांहींच न चले ॥ १८ ॥ तें आठवितां विसरिजे । कां तें विसरोनि आठविजे । जाणोनियां नेणिजे । परब्रह्म तें ॥ १९ ॥ त्यास न भेटतां होये भेटी । भेटों जातां पडे तुटी । ऐसी हे नवल गोष्टी । मुकेपणाची ॥ २० ॥ तें साधूं जातां साधवेना । ना तरी सोडितां सुटेना । लागला समंध तुटेना । निरंतर ॥ २१ ॥ तें असतचि सदां असे । नातरी पाहातां दुरासे । न पाहातां प्रकाशे । जेथींचा तेथें ॥ २२ ॥ जेथें उपाये तोचि अपाये । आणी अपाये तोचि उपाये । हें अनुभवेंविण काये । उमजों जाणें ॥ २३ ॥ तें नुमजतांच उमजे । उमजोन कांहींच नुमजे । तें वृत्तीविण पाविजे । निवृत्तिपद ॥ २४ ॥ तें ध्यानीं धरितां नये । चिंतनीं चिंतावें तें काये । मनामध्यें न समाये । परब्रह्म तें ॥ २५ ॥ त्यास उपमें द्यावें जळ । तरी तें निर्मळ निश्चळ । विश्व बुडालें

न पाहिलें तर समाधानसुख मिळत नाहीं. त्याची संवय (ध्यान) लावितां संवय जडते, व सहज वस्तुलाभ होतो, हें खरें पण वस्तूचें चिंतन करूं जावें तों द्वैत उफाळतें व चिंतन न करावें तर कांहींच उमजत नाहीं, एवंच मन शून्य संदेहांत पडतें म्हणून विवेक धरावा, ज्ञानानें प्रपंच सावरावा, अहंभाव सोडावा, पण तो सोडावा कसा ? (१– १७). उत्तर—परब्रह्म अद्वैत असून त्याची कल्पना करूं जातां द्वैत उठतें हें तुझें म्हणणें कांहीं खोटें नाहीं. ब्रह्मस्वरूपच असें आहे कीं तें असें आहे व तसें आहे हें कांहीं बोलतांच येत नाहीं. तेथें हेतु म्ह. कार्यकारणसंबंध लावतां येत नाहीं व त्याच्यासारखें दुसरें कांहींच नसून तें एकीएक असल्यामुळें दृष्टांतानेंही तें सांगतां येत नाहीं. ‘ तें आठवितां विसरिजे.’ त्याची आठवण (स्मरण) करूं जावें तों त्रिपुटी उभी राहून त्याचा विसर पडतो व विसरून ते आठवतें. तें जाणून जाणतेंपण उरत नाहीं, जाणून नेणतें झालें पाहिजे, म्हणजे ब्रह्मरूपता सहज अंगीं जडते. त्याची अखंड भेट घेऊं जावें तों त्याची तुटी पडते, व तुटी आहे म्हणावें तों त्याची अखंड भेट आहेच. अशी ही मुकेपणाची गोष्ट आहे. ते साधूं जावें तों साधतां येत नाहीं व सोडावें तर सुटत नाहीं, कां कीं त्याचा नित्यसंबंध आहेच आहे. त्याच्या प्राप्तीचा जो उपाय करावा तोच अपाय होतो व अपाय तोच उपाय होतो. तें न उमजून उमजतें व उमजून उमजत नाहीं, न पहातां प्रकाशतें व पाहतां दुरावतें. आठवणें व विसरणें, भेटणें व तुटणें, उमजणें व नुमजणें, पाहणें व न पाहणें ह्या दोन्ही वृत्ति सांडूनच तें निवृत्तिपद प्राप्त होतें. तें ध्यानाचा, चिंतनाचा विषय होत नाहीं. तें मनामध्यें मावत नाहीं (मन एकदेशी व तें सर्वदेशी). त्याला जळाचा दृष्टांत द्यावा तर तें निर्मळ व निश्चळ आहे तसें जळ नाहीं व जळानें ब्रह्मांड बुडविलें तरी जळ त्याला बुडवूं

सकळ । परी तें कोरडेंचि असे ॥ २६ ॥ नव्हे प्रकाशासारिखें । अथवा नव्हे काळोखें । आतां तें कासियासारिखें । सांगावें हो ॥ २७ ॥ ऐसें ब्रह्म निरंजन । कदा नव्हे दृश्यमान । लावावें तें अनुसंधान । कोणेपरी ॥ २८ ॥ अनुसंधान लावूं जातां । कांहीं नाहीं वाटे आतां । तेणें मनाचिया माथां । संदेह वाजे ॥ २९ ॥ लटिकेंचि काय पाहावें । कोठें जाऊन राहावें । अभाव घेतला जीवें । सत्यस्वरूपाचा ॥ ३० ॥ अभावचि म्हणों सत्य । तरी वेदशास्त्रें कैसीं मिथ्य । आणी व्यासादिकांचें कृत्य । वाउगें नव्हे ॥ ३१ ॥ म्हणोनि मिथ्या म्हणतां नये । बहुत ज्ञानाचे उपाये । बहुतीं निर्मिलें तें काये । मिथ्या म्हणावें ॥ ३२ ॥ अद्वैतज्ञानाचा उपदेश । गुरुगीता तो महेश । सांगतां होय पार्वतीश । पार्वतीप्रती ॥ ३३ ॥ अवधूतगीता केली । गोरक्षीस निरोपिली । ते अवधूतगीता बोलिली । ज्ञानमार्ग ॥ ३४ ॥ विष्णु होऊन राजहंस । विधीस केला उपदेश । ते हंसगीता जगदीश । बोलिला स्वमुखें ॥ ३५ ॥ ब्रह्मा नारदा उपदेशित । चतुःश्लोकी भागवत । पुढें व्यासमुखें बहुत । विस्तारलें ॥ ३६ ॥ वसिष्ठसार वसिष्ठऋषी । सांगता जाला रघुनाथासी । कृष्ण सांगे अर्जुनासी । सप्तश्लोकी गीता ॥ ३७ ॥ ऐसें सांगावें तें किती । बहुत ऋषी बोलिले बहुतीं । अद्वैत ज्ञान आदिअंतीं । सत्यचि असे ॥ ३८ ॥ म्हणोनि मिथ्या आत्मज्ञान । म्हणतां पाविजे पतन । प्रज्ञेरहित जे जन । तयांसी हें कळेना ॥ ३९ ॥ जेथें शेषाची प्रज्ञा मंदली । श्रुतीस मौन्यमुद्रा पडिली । जाणपणें न वचे वदली । स्वरूपस्थिती ॥४०॥ आपणास नुमजे बरवें । म्हणोनि मिथ्या कैसें म्हणावें । नातरी सदृढ धरावें ।

शकत नाहीं. त्याला प्रकाशाचा व काळोखाचा कोणताच कसलाच दृष्टांत देतां येत नाहीं (१८–२७). प्रश्न — असें हें निरंजन ब्रह्म मनबुद्धिवाचेलाही दृश्यमान नाहीं मग त्याचें अनुसंधान कसें लावावें ? लटकेंच काय कोठें पहावें ? परब्रह्म म्ह. सत्यस्वरूप कांहीं आहे असेंच वाटत नाहीं, त्याचा अभाव आहे याच संशयावर मन आरूढ होतें (२८–३०). उत्तर — ब्रह्माचा अभाव सत्य म्हणशील तर वेदशास्त्रांना व व्यासादि महर्षींनीं जे ज्ञानोपाय सांगितले त्यांना मिथ्या म्हणावें लागेल. त्यांना तूं काय मीपणाच्या डौलानें मिथ्या म्हणशील ? गुरुगीतेंत शंकरांनीं पार्वतीस अद्वैतज्ञानाचा बोध केला आहे. अवधूतगीतेंत गोरखनाथास ज्ञानमार्ग सांगितला आहे. हंसगीतेंत स्वतः भगवान् विष्णूंनीं राजहंसरूपानें ब्रह्मदेवास तेंच सांगितलें आहे. भागवतांत (द्वितीय स्कंध) ब्रह्मदेवानें नारदास चतुःश्लोकी भागवत सांगितलें असून त्याचा व्यासांनीं पुढें विस्तार केला आहे. योगवासिष्ठ ग्रंथांत वसिष्ठांनीं प्रभुरामास व भीष्मपर्वांत श्रीकृष्णांनीं अर्जुनास ह्याच अद्वैतज्ञानाचा उपदेश केला आहे. याप्रमाणेंच आणखीही अनेक महात्म्यांनीं अद्वैताची सत्यता सिद्ध करून दाखविली आहे, म्हणून अश्रद्धेनें जर आत्मज्ञानास कोणी मिथ्या म्हणेल तर तो पतन पावेल. मंदबुद्धीच्या लोकांस हें कळत नाहीं. जेथें शेष थकला व श्रुतीनें 'नेति नेति' म्ह. ब्रह्मस्वरूप वर्णन करून सांगतां येत नाहीं असें म्हणून मौन धरिलें ती स्वरूपस्थिति जाणतेपणाच्या अभिमानानें 'मला नीट उमगत नाहीं म्हणून मिथ्या' म्हणणारास काय म्हणावें ? ब्रह्म सत्य असून मिथ्या व माया मिथ्या असून सत्य मानणारा संदेहसागरांत मात्र बुडून राहील. मनाला कल्पना करायची व कल्पनेंत येईल तेवढेंच

सद्गुरुमुखें ॥ ४१ ॥ मिथ्य तेंचि सत्य जालें । सत्य असोन मिथ्य केलें । संदेहसागरीं बुडालें । अकस्मात मन ॥ ४२ ॥ मनास कल्पायाची सवे । मनें कल्पिलें तें नव्हे । तेणें गुणें संदेह धांवे । मीपणाचेनि पंथें ॥ ४३ ॥ तरी तो पथचि मोडावा । मग परमात्मा जोडावा । समूळ संदेह तोडावा । साधुचेनि संगतीं ॥ ४४ ॥ मीपण शस्त्रें तुटेना । मीपण फोडितां फुटेना । मीपण सोडितां सुटेना । कांहीं केल्या ॥४५॥ मीपणें वस्तु नाकळे । मीपणें भक्ति मावळे । मीपणें शक्ति गळे । वैराग्याची ॥ ४६ ॥ मीपणें प्रपंच न घडे । मीपणें परमार्थ बुडे । मीपणें सकळही उडे । यशकीर्तिप्रताप ॥ ४७ ॥ मीपणें मैत्री तुटे । मीपणें प्रीति आटे । मीपणें लिगटे । अभिमान आंगीं ॥४८॥ मीपणें विकल्प उठे । मीपणें कळह सुटे । मीपणें संमोह फुटे । ऐक्यतेचा ॥ ४९ ॥ मीपण कोणासिच न साहे । तें भगवंतीं कैसेनि साहे । म्हणोनि मीपण सांडून राहे । तोचि समाधानी ॥ ५० ॥ मीपण कैसें त्यागावें । ब्रह्म कैसें अनुभवावें । समाधान कैसें पावावें । कोणा प्रकारें ॥ ५१ ॥ मीपणजाणोनि त्यागावें । ब्रह्म-होऊन अनुभवावें । समाधान-तें पावावें । निःसंगपणें ॥ ५२ ॥ आणीक येक समाधान । मीपणेंविण साधन । करूं जाणे तोचि धन्य । समाधानी ॥ ५३ ॥ मी तों ब्रह्मचि जालों स्वतां । साधन कोण करील आतां । ऐसें मनीं कल्पूं जातां । कल्पनाचि उठे ॥ ५४ ॥ ब्रह्मीं कल्पना न साहे । तेचि तेथें येऊनि उभी राहे । तयेसि शोधून पाहे । तोचि साधु ॥ ५५ ॥ निर्विकल्पासी कल्पावें । परी कल्पिते आपण न व्हावें । मीपणासि त्यागावें । येणें

सत्य मानायची संवय आहे. मन इतर पदार्थांप्रमाणें ब्रह्माचीही कल्पना करावयाला धांवतें. पण स्वरूपीं कल्पना चालत नसल्यामुळें फजीत पावून आपला उणेपणा झांकण्यासाठीं संशयारूढ होऊन मीपणाच्या मार्गाला लागतें ! म्हणून मीपणा समूळ मोडून सत्संगतींत संशयोच्छेद करून घेऊन परमात्मा जोडावा (३१-४४). मीपण म्ह० अहंकार फार कठीण आहे. मीपण शस्त्रानें तुटत नाहीं, फोडतां फुटत नाहीं व कांहीं केल्या सुटत नाहीं. मीपणामुळें ब्रह्मस्वरूप कळत नाहीं, भक्ति मावळते व वैराग्य लुलें होऊन जातें. मीपणानें प्रपंचही नेटका होत नाहीं, परमार्थ तर पार बुडून जातो, यशकीर्तिप्रताप या सर्वांची माती होते. मीपणानें मैत्री तुटते, प्रेम टिकत नाहीं, वृथाभिमान वाढतो, कलह उठतात, विकल्प प्रबळ होतात, ऐक्यता मोडून जाते. मीपण कोणालाच नाहीं, मग भगवान् तो कसा सहन करतील ? म्हणून मीपण समूळ टाकून आत्मसमाधन भोगावें (४५-५०). प्रश्न—मीपण कसें टाकावें ? ब्रह्म कसें अनुभवावें ? समाधान कसें पावावें ? (५१). मीपण जाणून टाकावें. ब्रह्म होऊन अनुभवावें. समाधान निःसंग होऊन पावावें. मीपणाचा संग सोडून साधन करील तोच धन्य. मी ब्रह्म झालों आतां मला साधन कशाला अशी कल्पना, कीं कल्पनेनें कल्पना वाढत जाऊन जीव संशयांत पडतो. ब्रह्मस्वरूपीं कल्पना साहत नाहीं, तीच बाहेर पंगु होऊन उगी राहते, कल्पनेला शोधील तोच साधु. कल्पना मूळ कशी उठते तें पहावें. मी कल्पिता आहें असा आपला (वेगळेपणाचा) संग सोडून निर्विकल्पास कल्पावें. मीपण टाकण्याचा हा मार्ग आहे. कल्पनेंत येतें तें आपलें रूप नाहीं, आपण त्याहून पर आहोंत, तोच अनुभव मीपणत्यागानें

रिती ॥ ५६ ॥ या ब्रह्मविद्येच्या लपणी । कांहींच नसावें असोनी । दक्ष आणी समाधानी । तोचि हें जाणे ॥ ५७ ॥ जयासी आपण कल्पावें । तेंचि आपण स्वभावें । येथें कल्पनेच्या नांवें । शून्य आलें ॥५८॥ पदीहून चळों नये । करावें साधन उपाये । तरीच सांपडे सोये । अलिप्तपणाची ॥ ५९ ॥ राजा राजपदीं असतां । उगीच चाले सर्व सत्ता । साध्यचि होऊन तत्वता । साधन करावें ॥ ६० ॥ साधन आलें देहाच्या माथां । आपण देह नव्हे कीं सर्वथा । ऐसा करूनि अकर्ता । सहजचि आला ॥ ६१ ॥ देह आपण ऐसें कल्पावें । तरीच साधन त्यागावें । देहातीत अस्तां स्वभावें । देह कैंचा ॥६२॥ ना तें साधन ना तें देह । आपला आपण नःसंदेह । देहींच असोन विदेह । स्थिति ऐसी ॥ ६३ ॥ साधनेंविण ब्रह्म होतां । लागों पाहे देहममता । आळस प्रबळे तत्वता । ब्रह्मज्ञानमिसें ॥ ६४ ॥ परमार्थमिसें अर्थ जागे । ध्यानमिसें निद्रा लागे । मुक्तिमिसें दोष भोगे । अनर्गळता ॥ ६५ ॥ निरूपणमिसें निंदा घडे । संवादमिसें विवाद पडे । उपाधिमिसें येऊन जडे । अभिमान आंगीं ॥ ६६ ॥ तैसा ब्रह्मज्ञानमिसें । आळस अंतरीं प्रवेशे । म्हणे साधनाचें पिसें । काये करावें ॥ ६७ ॥

किं करोमि क्व गच्छामि किं गृह्णामि त्यजामि किम्। आत्मना पूरितं सर्वं महाकल्पांबुना यथा ॥

वचन आधारीं लाविलें । जैसें शस्त्र फिराविलें । स्वता म्हणोन घेतलें । तयापरी ॥ ६८ ॥ तैसा उपायाचा अपाये । विपरीतपणें स्वहित जाये । साधन सोडितां होये । मुक्तपणें बद्ध ॥ ६९ ॥ साधन करितांच सिद्धपण । हातींचें जाईल निघोन । तेणें भेणें साधन । करूंच नावडे ॥ ७० ॥ लोक म्हणती हा

ंतो. प्रपंच पुढें करून आपण मागें लपणाऱ्या या ब्रह्मविद्येच्या लपणींत असून कसें नसावें हें दक्ष व समाधानी असतो तोच जाणतो. ज्याची कल्पना करायची तेंच (ब्रह्म) आपण आहोंत, हें उमगलें म्हणजे कल्पना शून्य (नाहींशी) होते. स्वरूपच्युत न होतां साधनसायास करावेत. राज्यपदीं असतां उगीच म्ह० तो स्वतः कांहींहीं न करितांही त्याच्या सत्तेनें सारा कारभार होत असतो, त्याप्रमाणें ब्रह्मस्वरूपाच्या बैठकीवर स्थिर राहून साधनें करावींत, साध्य होऊन साधन करावें. साधन देह करीत राहतो व आपण तर देह नव्हे. ह्याप्रमाणें करून अकर्तेपण सहजच येतें. देह आपण अशी कल्पना केल्यास साधन त्याग करावा, पण आपण देहातीत वस्तु आहोंत, देह नाहीं असें जाणून साधन केल्यास आपण 'ना तें साधन ना तें देह' अशी निःसंदेहता येते, यालाच विदेहस्थिति म्हणतात (५२–६३). प्रश्न—आपण साध्य होऊन गेल्यावर साधन कशाला ? उत्तर—साध्य होऊन साधन सोडलें तर देहममता जडण्याचा संभव असतो. ब्रह्मज्ञानमिषानें आळस वाढतो, परमार्थमिषानें स्वार्थ अंतरीं उठतो, ध्यानमिषानें निद्रा लागते, मुक्तपणाच्या मिषानें अनर्गळता वाढते, निरूपणमिषानें निंदा घडते, संवादमिषानें वितंडवादांत हा पडतो, उपाधिमिषानें गर्व चढतो, ब्रह्मज्ञानमिषानें आळस अंगीं जडतो, 'किं करोमि क्व गच्छामि' हें आत्मनिष्ठाचें सुंदर वचन आधाराला घेऊन, शस्त्र आपलें आपल्यावर मारून घ्यावें त्याप्रमाणें, आपला घात करितो. साधन सोडल्यास हा मुक्तपणानें बद्ध होतो. 'मी मुक्त'

साधक। हेचि लज्जा वाटे येक। साधन करिती ब्रह्मादिक। ते ठाउकेंचि नाहीं ॥ ७१ ॥ आतां असो हे अविद्या। अभ्याससारिणी विद्या। अभ्यासें पाविजे आद्या। पूर्ण ब्रह्म ॥ ७२ ॥ अभ्यास करावा कोण। ऐसा श्रोता करी प्रश्न। परमार्थाचें साधन। बोलिलें पाहिजे ॥ ७३ ॥ याचें उत्तर श्रोतयांसी। दिधलें पुढिले समासीं। निरोपिलें साधनासी। परमार्थाच्या ॥ ७४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे साधनप्रतिष्ठानिरूपणनाम समास सप्तम ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥ ऐका परमार्थाचें साधन। जेणें होये समाधान। तें तूं जाण गा श्रवण। निश्चयेंसीं ॥ १ ॥ श्रवणें आतुडे भक्ती। श्रवणें उद्भवे विरक्ती। श्रवणें तुटे आसक्ती। विषयांची ॥ २ ॥ श्रवणें घडे चित्तशुद्धी। श्रवणें होये दृढबुद्धी। श्रवणें तुटे उपाधी। अभिमानाची ॥ ३ ॥ श्रवणें निश्चयो घडे। श्रवणें ममता मोडे। श्रवणें अंतरीं जडे। समाधान ॥ ४ ॥ श्रवणें आशंका फिटे। श्रवणें संशय तुटे। श्रवण होतां पालटे। पूर्वगुण आपुला ॥ ५ ॥ श्रवणें आवरे मन। श्रवणें घडे समाधान। श्रवणें तुटे बंधन। देहबुद्धीचें ॥ ६ ॥ श्रवणें मीपण जाये। श्रवणें धोका नये। श्रवणें नाना अपाये। भस्म होती ॥ ७ ॥ श्रवणें होये कार्यसिद्धी। श्रवणें लागे समाधी। श्रवणें घडे सर्व सिद्धी। साधनांची ॥ ८ ॥ सत्संगावरी श्रवण। तेणें कळे निरूपण। श्रवणें होईजे आपण। तदाकार ॥ ९ ॥ श्रवणें प्रबोध वाढे। श्रवणें प्रज्ञा चढे। श्रवणें विषयांचे वोढे। तुटोन जाती ॥ १० ॥ श्रवणें विचार कळे। श्रवणें ज्ञान हें प्रबळे। श्रवणें वस्तु निवळे। साधकासी ॥ ११ ॥ श्रवणें सद्बुद्धि लागे। श्रवणें विवेक जागे। श्रवणें मन हें मागे। भगवंतासी ॥ १२ ॥ श्रवणें कुसंग तुटे। श्रवणें काम वोहटे। श्रवणें क्रोध

असा अहंकार वाढतो. लोक साधक म्हणतील अशी याला लाज वाटते, पण ब्रह्मादिदेव साधनच करीत आहेत हें याला माहीत नाहीं. 'अभ्याससारिणी' विद्या हें तत्त्व सन्मान्य आहे. अभ्यास तो कोणता करायचा हें पुढें सांगतात (६४–७४). [द० ७, स० ७]

समाधान देणारें परमार्थाचें साधन म्हणजे श्रवण होय. श्रवणाच्या योगानें भक्ति व विरक्ति (वैराग्य) उत्पन्न होते व विषयांकडची आसक्ति तुटून जाते. श्रवणानें चित्ताची शुद्धि होते (मल, विक्षेप व आवरण हे मनाचे दोष जातात). आत्मबुद्धि दृढ होते व ज्या अहंकाराच्या उपाधीनें जीव संसाराशीं जखडला गेला आहे ती उपाधि तुटते. देहसंबंधीं 'अहं व मम' हे पाश तुटणें, आत्मनिश्चय होणें व निश्चयाचें समाधान प्राप्त होणें हे लाभ श्रवणानेंच घडतात. श्रवणानें मन आवरायचा अभ्यास होतो, अनेक अपाय नाहींसे होतात व समाधान (समाधि) मिळते. सत्संगांत श्रवण घडल्यानें निरूपण उमजतें व तदाकारता होते. श्रवणानें प्रबोध वाढतो, प्रज्ञा विकास पावते, विषयांचे ओढे (पाश) ढिले होऊन तुटून जातात, व साधक श्रोत्याचा विचार जागृत राहून वस्तुलाभ होतो. श्रवणानें सद्बुद्धि

ाटे । येकसरां ॥ १३ ॥ श्रवणें मोह नासे । श्रवणें स्फूर्ति प्रकाशे । श्रवणें द्वस्तु भासे । निश्चयात्मक ॥ १४ ॥ श्रवणें होय उत्तम गती । श्रवणें आतुडे ांती । श्रवणें पाविजे निवृत्ती । अचळ पद ॥ १५ ॥ श्रवणाऐसें सार ाहीं । श्रवणें घडे सर्व कांहीं । भवनदीचा प्रवाहीं । तरणोपाव श्रवणें ॥ १६ ॥ वण भजनाचा आरंभ । श्रवण सर्वीं सर्वारंभ । श्रवणें होय स्वयंभ । सर्व कांहीं ॥ १७ ॥ प्रवृत्ती अथवा निवृत्ती । श्रवणेंविण न घडे प्राप्ती । हे तों सकळांस प्रचीती । प्रत्यक्ष आहे ॥ १८ ॥ ऐकिल्याविण कळेना । हें ठाउकें आहे जना । याकारणें मूळ प्रेत्ना । श्रवण आधीं ॥ १९ ॥ जें जन्मीं ऐकिलेंचि नाहीं । तेथें पडिजे संदेहीं । म्हणोनियां दुजें कांहीं । साम्यता न घडे ॥ २० ॥ बहुत साधनें पाहातां । श्रवणास न घडे साम्यता । श्रवणेंविण तत्वता । कार्य न चले ॥ २१ ॥ न देखतां दिनकर । पडे अवघा अंधकार । श्रवणेंविण प्रकार । तैसा होय ॥ २२ ॥ कैसी नवविधा भक्ती । कैसी चतुर्विधा मुक्ती । कैसी आहे सहजस्थिती । हें श्रवणेंविण न कळे ॥ २३ ॥ न कळे षट्कर्माचरण । न कळे कैसें पुरश्चरण । न कळे कैसें उपासन । विधियुक्त ॥ २४ ॥ नाना व्रतें नाना दानें । नाना तपें नाना साधनें । नाना योग तीर्थाटणें । श्रवणेंविण न कळती ॥ २५ ॥ नानाविद्या पिंडज्ञान । नाना तत्वांचें शोधन । नाना कळा ब्रह्मज्ञान । श्रवणेंविण न कळे ॥ २६ ॥ अठराभार वनस्पती । येका जळें प्रबळती । येका रसें उत्पत्ती । सकळ जीवांची ॥ २७ ॥ सकळ जीवां येक पृथ्वी । सकळ जीवां येक रवी । सकळ जीवां वर्तवी । येक वायो ॥ २८ ॥ सकळ जीवां येकपैस । जयास बोलिजे आकाश । सकळ जीवांचा वास । येका परब्रह्मीं ॥ २९ ॥ तैसें सकळ जीवांस मिळोन । सार येकचि साधन । तें हें जाणावें श्रवण । प्राणीमात्रांसी ॥ ३० ॥ नाना देश

वाढते, कामक्रोधादिकांचे धोके (अपाय) दूर होतात, मोहनाश होऊन बुद्धीला स्फूर्ति होते व निश्चयाचें आत्मसमाधान मिळतें. शांति, निवृत्ति, सद्गति, श्रवणानें होते. श्रवणासारखें सारभूत साधन दुसरें नाहीं. भवतरणोपाय म्हणजे अध्यात्मश्रवण होय. प्रवृत्ति असो, निवृत्ति असो, श्रवणावांचून इष्ट लाभ होत नाहीं, हा अनुभव सर्वांस आहेच. ऐकल्यावांचून कांहींच कळत नाहीं म्हणून सर्व प्रयत्नांचें मूळ श्रवण होय. जें जन्मांत कधीं ऐकलेंच नाहीं त्याविषयीं संदेह असतो, तो जाऊन निश्चयात्मक ज्ञान देणारें श्रवणापरतें दुसरें कोणतेंच साधन नाहीं. सूर्यदर्शन नाहीं तोंवर सारा अंधार, तसाच प्रकार श्रवणावांचून होतो, म्हणून श्रवण हें मुख्य साधन आहे (१–२२). नवविधा भक्ति, चतुर्विधा मुक्ति, सत्कर्माचरण, उपासना, व्रततपतीर्थाटण, योगयाग, पिंडज्ञान, तत्त्वज्ञान, सहजसमाधि हें सर्व श्रवणावांचून कांहीं कळत नाहीं २३–२६). सर्व वनस्पति एका जळानें वाढतात, सर्व जीवांची उत्पत्ति एका रसानें होते, सर्व जीवांना एक आकाश पैस, पसरण्याची वावरण्याची जागा) आहे, सर्वांना एक पृथ्वी, एक रवि, एक वायु व सर्वांचा वास एका परब्रह्माच्या अधिष्ठानीं आहे, तसें सर्व जीवांस सारभूत असें साधन एकच म्ह० श्रवण हें आहे. पृथ्वीवर अनेक देश, भाषा व मतें

भाषा मतें। भूमंडळीं असंख्यातें। सर्वांस श्रवणापरतें। साधनचि नाहीं ॥ ३१ ॥ श्रवणें घडे उपरती। बद्धाचे मुमुक्ष होती। मुमुक्षाचे साधक अती। नेमेंसि चालती ॥ ३२ ॥ साधकाचे होती सिद्ध। आंगीं बाणतां प्रबोध। हें तों आहे प्रसिद्ध। सकळांस ठाउकें ॥ ३३ ॥ ठाईंचे खळ चांडाळ। तेचि होती पुण्यसीळ। ऐसा गुण तत्काळ। श्रवणाचा ॥ ३४ ॥ जो दुर्बुद्धि दुरात्मा। तोचि होय पुण्यात्मा। अगाध श्रवणाचा महिमा। बोलिला न वचे ॥ ३५ ॥ तीर्थांव्रतांची फळश्रुती। पुढें होणार सांगती। तैसें नव्हे, हातीचा हातीं। सप्रचित श्रवण ॥ ३६ ॥ नाना रोग नाना व्याधी। तत्काळ तोडिजे औषधी। तैसी आहे श्रवणसिद्धी। अनुभवी जाणती ॥ ३७ ॥ श्रवणाचा विचार कळे। तरीच भाग्यश्री प्रगटे बळें। मुख्य परमात्माच आकळे। स्वानुभवासी ॥ ३८ ॥ या नांव जाणावें मनन। अर्थालागीं सावधान। निजध्यासें समाधान। होत असे ॥ ३९ ॥ बोलिल्याचा अर्थ कळे। तरीच समाधान निवळे। अकस्मात अंतरीं वोळे। निःसंदेहता ॥ ४० ॥ संदेह जन्माचें मूळ। तें श्रवणें होये निर्मूळ। पुढें सहजचि प्रांजळ। समाधान ॥ ४१ ॥ जेथें नाहीं श्रवण मनन। तेथें कैचें समाधान। मुक्तपणाचें बंधन। जडलें पाईं ॥ ४२ ॥ मुमुक्ष साधक अथवा सिद्ध। श्रवणेंविण तो अबद्ध। श्रवणमननें शुद्ध। चित्तवृत्ति होय ॥ ४३ ॥ जेथें नाहीं नित्य श्रवण। तें जाणावें विलक्षण। तेथें साधकें येक क्षण। क्रमूं नये सर्वथा ॥ ४४ ॥ जेथें नाहीं श्रवणस्वार्थ। तेथें कैंचा हो परमार्थ। मागें तितुकें व्यर्थ। श्रवणेंविण होय ॥ ४५ ॥ तस्मात् श्रवण करावें। साधन मनीं धरावें। नित्यनेमें तरावें। संसारसागरीं ॥ ४६ ॥ सेविलेंच सेवावें अन्न।

असलीं तरी सर्वांना श्रवणापरतें दुसरें साधनच नाहीं (२७–३१). श्रवणानें बद्धांना उपरति होऊन ते मुमुक्षु होतात, श्रवणानेंच मुमुक्षूंचे साधक होऊन नियमांनीं चालतात व ज्ञान बाणून साधकांचे सिद्ध होतात. श्रवण घडल्यानें मूळचे खळचांडाळही पालटून पुण्यशीळ होतात, दुरात्मा असेल तोच पुण्यात्मा होतो. असा श्रवणसाधनाचा थोर महिमा आहे (३२–३५). तीर्थव्रतें उधारीचें फळ सांगतात पण श्रवणाचें फळ तत्काळ हातीं पडतें. उत्तम औषधि रोगव्याधि तत्काळ दूर करितात तसाच श्रवणाचा महिमा आहे. श्रवणाचें महत्त्व कळेल तर भाग्यश्री प्राप्त होते, फार काय सांगावें – श्रवणानें मुख्य परमात्माच अंगीं जडतो. यालाच मनन म्हणतात. अर्थाला सावधान असणें यालाच मनन म्हणतात. श्रवण, मनन, निदिध्यास व साक्षात्कार हा क्रमच आहे (३६–३९). बोलल्याचा अर्थ कळल्यानें समाधान होतें व जीव निःसंदेह होतो. जन्माचें मूळ संदेह (संशय, विकल्प), तो श्रवणानें तुटतो व आभाळ गेल्यावर आकाश जसें निर्मळ होतें तसें समाधानसुख सहजच प्राप्त होतें. श्रवण मनन नाहीं तेथें समाधान कसचें ? ‘ मी मुक्त आहें, मला श्रवणादि साधनें नकोत ’ असें कोणी म्हणेल तर त्याचा मुक्तपणा हेंच त्याला बंधन होईल. मुमुक्षु, साधक व सिद्ध या तिघांनाही श्रवणमननाचा अभ्यास ठेवला पाहिजे, त्यानें चित्ताची शुद्धि होते. हा अभ्यास किंवा निदिध्यास जो ठेवणार नाहीं तो अबद्ध म्ह० अनर्गळ होय. जेथें नित्यश्रवण नाहीं (निरंतर श्रवण किंवा नित्य म्ह० शाश्वत वस्तूंचें श्रवण) तेथें साधकानें एक क्षणही बसूं नये. ज्याला श्रवणस्वार्थ नाहीं त्याला परमार्थ कसला ? म्हणून श्रवण करावें, साधन मनीं

घेत ऐचि घ्यावें जीवन । तैसें श्रवणमनन । केलेंचि करावें ॥ ४७ ॥ श्रवणाचा अनादर । आळसें करी जो नर । त्याचा होय अपहार । स्वहिताविषईं ॥४८॥ आत्मसाचें संरक्षण । परमार्थाची बुडवण । या कारणें नित्य श्रवण । केलेंचि पाहिजे ॥ ४९ ॥ आतां श्रवण कैसें करावें । कोण्या ग्रंथासी पाहावें । पुढिले समासीं आघवें । सांगिजेल ॥ ५० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे श्रवणनिरूपणनाम समास अष्टम ॥ ८ ॥

॥ श्रीराम ॥ आतां श्रवण कैसें करावें । तेंहि सांगिजेल आघवें । श्रोतां अवधान द्यावें । येकचित्तें ॥ १ ॥ येक वक्तृत्व श्रवणीं पडे । तेणें जालें समाधान मोडे । केला निश्चयो विघडे । अकस्मात ॥ २ ॥ तें वक्तृत्व त्यागावें । जें माईक स्वभावें । जेथें निश्चयाच्या नांवें । शून्याकार ॥ ३ ॥ येक्या ग्रंथें निश्चय केला । तो दुजयानें उडविला । तेणें संशयोचि वाढला । जन्मवरी ॥ ४ ॥ जेथें संशय तुटती । होय आशंकानिवृत्ती । अद्वैतग्रंथ परमार्थीं । श्रवण करावें ॥ ५ ॥ जो मोक्षाचा अधिकारी । तो परमार्थपंथ धरी । प्रीति लागली अंतरीं । अद्वैतग्रंथाची ॥ ६ ॥ जेणें सांडिला इहलोक । जो परलोकींचा साधक । तेणें पाहावा विवेक । अद्वैतशास्त्रीं ॥ ७ ॥ जयास पाहिजे अद्वैत । तयापुढें ठेवितां द्वैत । तेणें क्षोभलें उठे चित्त । तया श्रोतयाचें ॥ ८ ॥ आवडीसारिखें मिळे । तेणें सुखचि उचंबळे । नाहीं तरी कंटाळे । मानस ऐकतां ॥ ९ ॥ ज्यासी उपासना जैसी । त्यासी प्रीति वाटे तैसी । तेथें वर्णितां दुजयासी । प्रशस्त न वाटे ॥ १० ॥ प्रीतिचें लक्षण ऐसें । अंतरीं उठे अनायासें । पाणी पाणवाटें जैसें । आपणचि धांवे ॥ ११ ॥ तैसा

धरावे व नित्यनेमानें वागून संसारांतून तरून जावें. शरीरपोषणासाठीं अन्नोदक रोज रोज सेवन करावें लागतें त्याप्रमाणें आत्मनिश्चय स्थिर रहावा म्हणून प्रत्यहीं श्रवणमनन करावें. श्रवणाचा आळस करील तो स्वहिताला मुकेल. आळस नसावा व परमार्थबुद्धि सतत जागृत असावी यासाठीं नित्य श्रवण करावें (४०–५०). [द० ७, स० ८]

आतां श्रवण कसें करावें, कोणते ग्रंथ पहावे हें सांगतों (१). कोणाचें वक्तृत्व असें असतें कीं तें ऐकतांच थोडेंफार झालेलें समाधान मोडून जातें. ज्यांत निश्चयात्मक ज्ञान नाहीं सारेंच मायेचें म्ह० संशयाचें बोलणें– असे वक्तृत्व ऐकूंच नये. एक ग्रंथ एक सिद्धान्त मांडतो, दुसरा ग्रंथ त्याचें खंडण करितो व दोन्ही ऐकणारा किंवा वाचणारा अधिकाधिक संशयांतच बुडत जातो (२–४). म्हणून जेथें संशय नष्ट होऊन सर्व आशंकांची निवृत्ति होते, असेच अद्वैताचे ग्रंथच परमार्थी जनांनीं श्रवण करावे. मोक्षाधिकारी जीवांना अद्वैत ग्रंथाचीच गोडी लागते, व ज्याला संसार नको–परलोकच पाहिजे त्यानें अद्वैत शास्त्रच पहावें (५-७). ज्याला अद्वैत पाहिजे त्यापुढें द्वैताची पोथी सोडली तर त्याला रुचत नाहीं. आवडतें तेंच मिळालें तर सुख होतें, नाहीं तर कंटाळा येतो असा मनुष्यस्वभाव आहे. ज्याची जी उपासना त्याला तिची प्रीति वाटते, तेथें दुसऱ्याची स्तुति केली तर त्याला गोड वाटत नाहीं. पाणी पायवाटेनें जसें सहज वाहत जातें तशी प्रीति अंतरांत अनायासें उठत असते–प्रेमाचें हें लक्षणच आहे. आत्मज्ञानी

जो आत्मज्ञानी नर । तयास नावडे इतर । तेथें पाहिजे सारासार । विचारणा ते ॥ १२ ॥ जेथें कुळदेवी भगवती । तेथें पाहिजे सप्तशती । इतर देवांची स्तुती । कामा नये सर्वथा ॥ १३ ॥ घेतां अनंताच्या व्रता । तेथें नलगे भगवद्गीता । साधुजनासी वार्ता । फळाशेची नाहीं ॥ १४ ॥ वीरकंकण घालितां नाकीं । परी तें शोभा पावेना कीं । जेथील तेथें आणिकीं । कामा नये सर्वथा ॥ १५ ॥ नाना माहात्में बोलिलीं ॥ जेथील तेथें वंद्य जालीं । विपरीत करून वाचिलीं । तरी तें विलक्षण ॥ १६ ॥ मल्हारीमाहात्म्य द्वारकेसी । द्वारकामाहात्म्य नेलें कासीं । कासीमाहात्म्य वेंकटेसीं । शोभा न पावे ॥ १७ ॥ ऐसें सांगतां असे वाड । परी जेथील तेथेंचि गोड । तैसी ज्ञानीयांस चाड । अद्वैतग्रंथाची ॥ १८ ॥ योगीयांपुढें राहाण । परीक्षवंतांपुढें पाषाण । पंडितांपुढें डफगाण । शोभा न पावे ॥ १९ ॥ वेदज्ञापुढें जती । निस्पृहापुढें फळश्रुती । ज्ञानीयांपुढें पोथी । कोकशास्त्राची ॥ २० ॥ ब्रह्मचर्यापुढें नाचणी । रासक्रीडा निरूपणीं । राजहंसापुढें पाणी । ठेविलें जैसें ॥ २१ ॥ तैसें अंतर्निष्ठांपुढें । ठेविलें शृंगारिक टिपडें । तेणें त्याचें कैसें घडे । समाधान ॥ २२ ॥ रायास रंकाची आशा । तक्र सांगणें पीयूषा । संन्याशासी वोवसा । उच्छिष्ट चांडाळी ॥ २३ ॥ कर्मनिष्ठां वशीकरण । पंचाक्षरी निरूपण । तेथें भंगे अंतःकरण । सहजचि त्याचें ॥ २४ ॥ तैसे परमार्थिक जन । तयांस नस्तां आत्मज्ञान । ग्रंथ वाचितां समाधान । होणार नाहीं ॥ २५ ॥ आतां असो हें बोलणें । जया स्वहित करणें । तेणें सदा विचरणें ।

मनुष्याला सारासार विचार सांगितला तरच रुचतो. देवीभक्तांना सप्तशती आवडते, अन्य देवांची त्यांना तितकी प्रीति वाटत नाहीं. कामनेच्या गोष्टी साधूंना आवडत नाहींत. वीरकंकण हातांत घातलें पाहिजे तें नाकांत घालून चालत नाहीं, वस्तु जेथल्या तेथेंच शोभते. ज्या त्या देवतेचें, तीर्थाचें, क्षेत्राचें माहात्म्य त्या त्या स्थळींच विशेष असतें. मल्हारीमाहात्म्य द्वारकेला, द्वारकामाहात्म्य काशीला व काशीमाहात्म्य व्यंकटेशाच्या गिरीला नेलें तर तें साजत नाहीं. अनंतव्रत घेतलेल्या पुढें अनंताचीच कथा सांगावी, तेथें गीता सोडूं नये. जेथल्या तेथेंच गोड असतें. असो. याप्रमाणें ज्ञात्याला अद्वैत ग्रंथाचीच आवड असते (८–१८). योग्यापुढें राहाणें (अंगांत एखादें दैवत आणून बोलवणें), रत्नपारख्यापुढें पाषाण, विद्वान शास्त्र्यांपुढें डफगाणें, वेदज्ञपुरुषापुढें यती, निरिच्छापुढें फळश्रुति, ज्ञान्यापुढें कोकशास्त्राचें पुस्तक (कोक म्ह० चक्रवाकांची जोडी. या नरमादींचें अन्योन्य प्रेम अत्यंत असतें. यावरून कोकशास्त्र म्ह० शृंगारशास्त्र, प्रेमकहाणी), ब्रह्मचाऱ्यांपुढें नाचणारणींचे ताफे, असें अनौचित्य करणें म्हणजे राजहंसांपुढें निव्वळ पाणी ठेवण्यासारखें अरसिकपणाचें काम आहे. असेंच अंतर्निष्ठापुढें एखादें शृंगारिक चोपडें (नाटक, कादंबरी इ०) ठेवलें तर त्याचें समाधान होणार नाहीं. राजाला रंकास योग्य अशी क्षुद्र आशा दाखविणें, अमृताला ताकाचा नैवेद्य दाखविणें, संन्याशाला 'उच्छिष्ट चांडाळी' चा क्षुद्र मंत्र सांगणें, कर्मनिष्ठाला वशीकरण मंत्र उपदेशणें, पंचाक्षऱ्याला अध्यात्म बोधणें म्हणजे त्याचा मनोभंग करून त्याला दुःख देणें होय. त्याप्रमाणें पारमार्थिक म्हणविण्यास आत्मज्ञानाची आस्था नसेल तर त्यापुढें अद्वैतग्रंथ वाचल्यानें त्याचें समाधान होणार नाहीं (१९–२५). सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, ज्याला खरोखर आत्महित पाहिजे असेल त्यानें नित्य अद्वैतग्रंथांची चाळणा

अं तग्रंथीं ॥ २६ ॥ आत्मज्ञानी येकचित्त । तेणें पाहाणें अद्वैत । येक तस्थळीं निवांत । समाधान ॥ २७ ॥ बहुत प्रकारें पाहातां । ग्रंथ नाहीं अ तापरता । परमार्थास तत्त्वता । तारूंच कीं ॥ २८ ॥ इतर जे प्रपंचिक । हा य विनोद नवरसिक । हित नव्हे तें पुस्तक । परमार्थासी ॥ २९ ॥ जेणें पर ार्थ वाढे । आंगीं अनुताप चढे । भक्तिसाधन आवडे । त्या नांव ग्रंथ ॥ ३० ॥ जो ऐकताच गर्व गळे । कां ते भ्रांतीच मावळे । नातरी येकसरें वोळे । मन भगवंतीं ॥ ३१ ॥ जेणें होय उपरती । अवगुण पालटती । जेणें चुके अधोगती । त्या नांव ग्रंथ ॥ ३२ ॥ जेणें धारिष्ट चढे । जेणें परोपकार घडे । जेणें विषयवासना मोडे । त्या नांव ग्रंथ ॥ ३३ ॥ जेणें परत्रसाधन । जेणें ग्रंथें होय ज्ञान । जेणें होईजे पावन । या नांव ग्रंथ ॥ ३४ ॥ ग्रंथ बहुत असती । नाना विधानें फळश्रुती । जेथें नुपजे विरक्ती भक्ती । तो ग्रंथचि नव्हे ॥ ३५ ॥ मोक्षेंविण फळश्रुती । ते दुराशेची पोथी । ऐकतां ऐकतां पुढती । दुराशाचि वाढे ॥ ३६ ॥ श्रवणीं लोभ उपजेल जेथें । विवेक कैंचा असेल तेथें । बैसलीं दुराशेचीं भूतें । तया अधोगती ॥ ३७ ॥ ऐकोनिच फळश्रुती । पुढें तरी पावों म्हणती । तयां जन्म अधोगती । सहजचि जाली ॥ ३८ ॥ नाना फळें पक्षी खाती । तेणेंचि तयां होय तृप्ति । परी त्या चकोराचे चित्तीं । अमृत वसे ॥ ३९ ॥ तैसें संसारी मनुष्य । पाहे संसाराची वास । परी ते भगवंताचे अंश । भगवंतचि इच्छिती ॥ ४० ॥ ज्ञानियांस पाहिजे ज्ञान । भजकांस पाहिजे भजन । साधकांस पाहिजे साधन । इच्छेसारिखें ॥ ४१ ॥ परमार्थ्यास परमार्थ । स्वार्थ्यास पाहिजे

करावी, एकांतांत एकचित्तानें ते पाहून समाधान पावावें, अनेक दृष्टींनीं विचार करून पाहिलें तर असें ठरतें कीं, अद्वैत ग्रंथांसारखा दुसरा ग्रंथच नाहीं. परमार्थाची ती नौका आहे. प्रपंचपोषणाचे अनेक ग्रंथ असतात, हास्यविनोदप्रचुर कांहीं पुस्तकें असतात, शृंगारवीरकरुणादि नवरसांचे नाना ग्रंथ असतात, पण ते परमार्थाच्या उपयोगाचे नाहींत (२६–२९). ज्या ग्रंथांच्या परिशीलनानें किंवा श्रवणानें परमार्थबुद्धि वाढते, अनुताप उत्पन्न होतो, भक्तिसाधन सांपडतें, अवगुण पालटतात, सात्त्विक धैर्य उत्पन्न होतें, परोपकार बुद्धि जडते, विषयवासना मोडते, ज्ञानमार्ग सुलभ होतो, अहंकार व भ्रांति मोडून चित्त भगवंताकडे लागतें व अधोगति चुकून मोक्षाधिकार प्राप्त होतो त्यालाच आम्ही ‘ ग्रंथ ’ म्हणतों. (३०–३४). अनेक प्रकारचीं विधानें सांगून फलश्रुतिरूपानें दुराशा वाढविणाऱ्या पोथ्या या ‘ ग्रंथ ’ नव्हत. ज्या ग्रंथानें विरक्ति भक्ति वाढत नाहीं, जो मोक्षलाभ देत नाहीं तो ग्रंथच नव्हे. ज्याच्या श्रवणानें लोभ वाढतो तो ग्रंथ ‘ विवेक ’ कसा जागृत करणार ? फळश्रुति ऐकतांच तोंडाला पाणी सुटून हें मला मिळावें अशी दुराशा उत्पन्न होणें हीच अधोगति (३५–३८). अनेक प्रकारचीं फळें खाऊन पक्षी तृप्त असतात पण चकोर त्याविषयीं सस्पृह न होतां अमृताची इच्छा करून असतो, त्याप्रमाणें संसारी माणसें संसारांतल्या अनेक गोष्टींच्या वासना धरितात, पण देवाचे निष्काम देवाचीच वासना धरितात (३९–४०). ज्ञान्याला ज्ञान, भक्ताला भजन, साधकाला कोणतेंही आवडतें साधन पाहिजे असतें. परमार्थ्यास परमार्थ,

स्वार्थ । कृपणास पाहिजे अर्थ । मनापासुनी ॥ ४२ ॥ योगीयांस पाहिजे योग । भोगियांस पाहिजे भोग । रोगियांस पाहिजे रोग-। हर्ति मात्रा ॥४३॥ कवीस पाहिजे प्रबंद । तार्किकांस तर्कवाद । भाविकांस संवाद । गोड वाटे ॥ ४४ ॥ पंडितांस पाहिजे व्युत्पत्ती । विद्वानांस अध्ययनप्रीति । कळावंतां आवडती । नाना कळा ॥ ४५ ॥ हरिदासा आवडे कीर्तन । शुचिष्मंतां संध्यास्नान । कर्मनिष्ठां विधिविधान । पाहिजे तें ॥ ४६ ॥ प्रेमळास पाहिजे करुणा । दक्षता पाहिजे विचक्षणा । चातुर्य पाहे शाहाणा । आदरेंसी ॥४७॥ भक्त पाहे मूर्तिध्यान । संगीत पाहे ताळज्ञान । रागज्ञानी तानमान । मूर्छना पाहे ॥ ४८ ॥ योगाभ्यासी पिंडज्ञान । तत्वज्ञानी तत्वज्ञान । नाडिज्ञासी मात्राज्ञान । पाहातसे ॥ ४९ ॥ कामिक पाहे कोकशास्त्र । चेटकी पाहे चेटकमंत्र । यंत्री पाहे नाना यंत्र । आदरेंसी ॥ ५० ॥ टवाळां आवडे विनोद । उन्मत्तास नाना छंद । तामसास अप्रमाद । गोड वाटे ॥ ५१ ॥ मूर्ख होय नादलुब्धी । निंदक पाहे उणी संधी । पापी पाहे पापबुद्धि । लावून आंगीं ॥ ५२ ॥ येकां पाहिजे रसाळ । येकां पाहिजे पाल्हाळ । येकां पाहिजे केवळ । साबडी भक्ती ॥ ५३ ॥ आगमी पाहे आगम । शूर पाहे संग्राम । येक पाहाती नाना धर्म । इच्छेसारिखे ॥ ५४ ॥ मुक्त पाहे मुक्तलीळा । सर्व पाहे सर्व कळा । जोंतिषी भविष्य पिंगळा । वर्णू पाहे ॥ ५२ ॥ ऐसें सांगावें तें किती । आवडीसारिखें ऐकती । नाना पुस्तकें वाचिती । सर्वकाळ ॥ ५६ ॥ परी परत्र साधनेंविण । म्हणों नये तें श्रवण । जेथें नाहीं आत्मज्ञान । तया नांव कर्मणुक ॥ ५७ ॥ गोडीविण गोडपण । नाकेंविण सुलक्षण । ज्ञानेंविण निरूपण । बोलोंचि नये ॥ ५८ ॥ आतां असो हें बहुत । ऐकावा परमार्थग्रंथ । परमार्थग्रंथेंविण व्यर्थ । गथागोवी ॥ ५९ ॥ म्हणोनी नित्यानित्यविचार । जेथें बोलिला सारासार ।

स्वार्थ्यास स्वार्थ, कृपणास अर्थ मनापासून पाहिजे असतो. योग्याला योग, भोग्याला भोग, रोग्याला रोगहर्ती मात्रा हवी असते. कवीला काव्य, तार्किकाला तर्कवाद, भाविकाला संवाद, पंडिताला व्युत्पत्ति, विद्वानाला अध्ययन, कळावंताला कळा, हरिदासाला कीर्तन, कर्मनिष्ठाला स्नानसंध्या, प्रेमळाला करुणास्तोत्रें, चतुराला चातुर्य, गायकाला राग, योग्याभ्यासीयाला पिंडज्ञान, तत्वज्ञाला तत्वज्ञान, वैद्याला औषधेंमात्रा, कामिकाला शृंगार, टवाळांस हास्यविनोद, निंदकास परन्यून, पाप्याला विषय, भोळ्याला साबडी भक्ति, तंत्रज्ञाला तंत्रशास्त्र, शूराला संग्राम, बहुश्रुताला बहुविषय, मुक्ताला मोक्ष याप्रमाणें प्रत्येकाची आपापल्या प्रिय विषयाच्या ठिकाणीं आवड असते. लोक आपापल्या आवडीप्रमाणें पुस्तकांची निवड करून वाचीत असतात (४१–५६). तथापि ज्यांत कांहीं मोक्षसाधन हातीं लागत नाहीं तें श्रवण नव्हे. ज्यापासून आत्मज्ञान होत नाहीं तें श्रवण नव्हे. ती क्रमणा (करमणूक किंवा कालक्रमणेचा मार्ग) होय. गोडीवांचून गोड, नाकावांचून सुलक्षण, तसें ज्ञानावांचून निरूपण व्यर्थ होय. थोडक्यांत सांगायचें म्हणजे परमार्थ ग्रंथाचेंच श्रवण करावें,

तोचि ग्रंथ पैलपार । पाववी विवेकें ॥ ६० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे श्रवणनिरूपणनाम समास नवम ॥ ९ ॥

॥ श्रीराम ॥ मिथ्या तेंचि जालें सत्य । सत्य तेंचि जालें असत्य । मायावि भ्रमाचें कृत्य । ऐसें असे ॥ १ ॥ सत्य कळायाकारणें । बोलिलीं नाना निरूपणें । तरी उठेना धरणें । असत्याचें ॥ २ ॥ असत्य अंतरीं बिंबलें । न सांगतां तें दृढ जालें । सत्य असोन हारपलें । जेथील तेथें ॥ ३ ॥ वेदशास्त्रें पुराणें सांगती । सत्याचा निश्चय करिती । तरी नये आत्मप्रचीती । सत्यस्वरूप ॥ ४ ॥ सत्य असोन आच्छादलें । मिथ्या असोन सत्य जालें । ऐसें विपरीत वर्तलें । देखत देखतां ॥ ५ ॥ ऐसी मायेची करणी । कळों आली तत्क्षणीं । संतसंगें निरूपणीं । विचार घेतां ॥ ६ ॥ मागां जालें निरूपण । देखिलें आपणासि आपण । तेणें बाणली खूण । परमार्थाची ॥ ७ ॥ तेणें समाधान जालें । चित्त चैतन्यीं मिळालें । निजस्वरूपें वोळखिलें । निजवस्तूसी ॥८॥ प्रारब्धीं टाकिला देहो । बोधें फिटला संदेहो । आतांचि पडो अथवा राहो । मिथ्या कळेवर ॥ ९ ॥ ज्ञानियांचें जें शरीर । तें मिथ्यत्वें निर्विकार । जेथें पडे तेंचि सार । पुण्यभूमी ॥ १० ॥ साधुदर्शनें पावन तीर्थ । पुरती त्यांचे मनोरथ । साधु न येतां जिणें व्यर्थ । तयां पुण्यक्षेत्रांचें ॥ ११ ॥ पुण्यनदीचें जें तीर । तेथेंचि पडावें शरीर । हा इतर जनांचा विचार । साधु नित्यमुक्त ॥ १२ ॥ उत्तरायण तें उत्तम । दक्षणायण तें अधम । हा संदेहीं वसे भ्रम । साधु तो निःसंदेह ॥ १३ ॥ शुक्लपद उत्तरायण । गृहीं दीप दिवा मरण । अंतीं राहावें स्मरण । गतीकारणें ॥ १४ ॥ इतुकें नलगे योगियांसी । तो जीतचि

परमार्थ ग्रंथावांचून इतर पुस्तकें वाचणे व्यर्थ आहे. जेथें नित्यानित्यविवेक किंवा सारासार विचार स्फुरतो तोच ग्रंथ तारक होय (५७–६०). [द. ७, स. ९]

जग मिथ्या असून सत्य वाटतें व ब्रह्म सत्य असून मिथ्या वाटतें हा मायेचा विभ्रम आहे. सत्य कळण्यासाठीं नाना निरूपणें बोलावीं लागलीं तरी चित्तांत असत्य दृढ झालें तें जात नाहीं. वेदशास्त्रपुराणांनींच सत्यब्रह्माचा निश्चय सांगितला आहे पण 'सत्य असोन आच्छादिलें । मिथ्या असोन सत्य जालें' अशी मायेची विपरीत करणी आहे. पण हे सर्व सत्संगीं निरूपणीं विचार घेतां कळों येतें (१–६). असो. आपणासि आपण पहावें तेव्हां समाधान होतें, चित्त चैतन्यीं मिळतें, हा अनुभव झाला. 'निजस्वरूपें वोळखिलें, निजवस्तूसीं,' प्रारब्धावर देह सोंपविला व बोधानें संदेह मावळला, मग ज्ञात्याचें शरीर केव्हांही कोठेंही पडलें म्हणून काय झालें ? 'जेथें पडे तेचि सार पुण्य भूमी' पुण्यक्षेत्रीं शरीर पडावें हा सामान्यांचा विचार असतो, उत्तरायण उत्तम – दक्षिणायन वाईट असें त्यांना वाटतें. उत्तरायण असावें, शुक्लपक्ष असावा, गृहीं दीप असतां दिवसा मरण यावें व अंतीं स्मरण रहावें म्हणजे सद्गति मिळते असा त्यांचा विश्वास असतो. पण इतुकें ज्ञानीभक्ताला नको. कां कीं, तो 'जीतचि मुक्त पुण्यरासी' असतो. अंतीं भगवंत भेटेल या कल्पनेनें जिवंतपणीं देहाचें सार्थक केलें नाहीं

मुक्त पुण्यरासी । तिळांजुळी पापपुण्यासी । दिधली तेणें ॥ १५ ॥ देहाचा अंत बरा आला । देह सुखरूप गेला । त्यासी म्हणती धन्य जाला । अज्ञान जन ॥ १६ ॥ जनाचें विपरीत मत । अंतीं भेटतो भगवंत । ऐसें कल्पून घात । करिती आपुला स्वयें ॥ १७ ॥ जितां सार्थक नाहीं केलें । व्यर्थ आयुष्य निघोन गेलें । मुळीं धान्यचि नाहीं पेरिलें । तें उगवेल कैंचें ॥ १८ ॥ जरी केलें ईश्वरभजन । तरीच होईजे पावन । जैसें वेव्हारितां धान्य । रासि माथां लाभे ॥ १९ ॥ दिधल्याविण पाविजेना । पेरिल्याविण उगवेना । ऐसें हें वाक्य जना । ठाउकेंचि आहे ॥ २० ॥ न करितां सेवेच्या व्यापारा । स्वामीस म्हणे कोठें मुशारा । तैसें अंतीं अभक्त नरां । स्वहित न घडे ॥ २१ ॥ जितां नाहीं भगवद्भक्ती । मेल्यां कैंची होईल मुक्ती । असो जे जे जैसें करिती । ते ते पावती तैसेंचि ॥ २२ ॥ एवं न करितां भगवद्भजन । अंतीं नव्हिजे पावन । जरी आलें बरें मरण । परी भक्तीविण अधोगति ॥ २३ ॥ म्हणोन साधूनें आपलें । जीत अस्तांच सार्थक केलें । शरीर कारणीं लागलें । धन्य त्याचें ॥ २४ ॥ जे कां जीवन्मुक्त ज्ञानी । त्यांचें शरीर पडो रानीं । अथवा पडो स्मशानीं । तरी धन्य जालें ॥ २५ ॥ साधूचा देह खितपतला । अथवा श्वानादिकीं भक्षिला । हें प्रशस्त न वाटे जनाला । मंदबुद्धीस्तव ॥ २६ ॥ अंत बरा नव्हेचि म्हणोन । कष्टी होती इतर जन । परी बापुडे अज्ञान । नेणती वर्म ॥ २७ ॥ जो जन्मलाच नाहीं ठाईंचा । त्यास मृत्य येईल कैंचा । विवेकबळें जन्ममृत्याचा । घोट भरिला जेणें ॥ २८ ॥ स्वरूपानुसंधानबळें । सगळी मायाच नाडळे । तयाचा पार न कळे । ब्रह्मादिकांसी ॥ २९ ॥ तो जीत असतांचि मेला । मरणास मारून ज्याला । जन्ममृत्य न स्मरे त्याला । विवेकबळें ॥ ३० ॥ तो जनीं दिसतो परी वेगळा । वर्ततां भासे निराळा । दृश्य पदार्थ त्या निर्मळा । स्पर्शलाचि नाहीं ॥ ३१ ॥ असो ऐसे साधुजन । त्यांचें घडलियां भजन । तेणें भजनें

तर हें व्हावें कसें ? मुळीं धान्य पेरलें नाहीं तर तें उगवेल कसें ? ईश्वरभजनानेंच सार्थकता होते. ‘जितां नाहीं भगवद्भक्ती । मेल्यां कैंची होईल मुक्ती ?’ असो. जे जसें करितात तसें फळ पावतात. जीवन्मुक्त ज्ञात्याचें शरीर रानीं पडो वा स्मशानीं पडो, तें खितपत पडलें किंवा श्वानादिकांनीं भक्षिलें तरी तें धन्य होय. अज्ञजन वृथा शीण पावतात. जो जन्मलाच नाहीं त्याला मृत्यु येईल कसा ? ज्याला ‘स्वस्वरूपानुसंधान बळें । सगळी मायाच नाडळे’ त्याला जन्ममरणाचें भय काय ? जो जिवंतपणींच असतां मेला, मरणास मारून ज्याला (जगला) तो सुटलाच आहे. ‘तो जनीं दिसतो – परी वेगळा । वर्ततां भासे निराळा । दृश्यपदार्थ त्या निर्मळा । स्पर्शलाचि नाहीं’ अशा साधूच्या भजनानेंही इतर जन पावन

वन । इतर जन होती ॥ ३२ ॥ सद्गुरूचा जो अंकित साधक । तेणें
लाचि करावा विवेक । विवेक केलियां तर्क । फुटे निरूपणीं ॥ ३३ ॥ हेंचि
ाधकांसी निरवणें । अद्वैत प्रांजळ निरूपणें । तुमचेंहि समाधान बाणे ।
ाधूच ऐसें ॥ ३४ ॥ जो संतांसी शरण गेला । तो संतचि होऊन ठेला ।
तर जनांसी उपेगा आला । कृपाळूपणें ॥ ३५ ॥ ऐसें संतांचें महिमान ।
ंतसंगें होतें ज्ञान । सत्संगापरतें साधन । आणीक नाहीं ॥ ३६ ॥ गुरुभजना-
चेनि आधारें । निरूपणाचेनि विचारें । क्रियाशुद्ध निर्धारें । पाविजे पद ॥ ३७ ॥
परमार्थाचें जन्मस्थान । तेंचि सद्गुरूचें भजन । सद्गुरुभजनें समाधान । अकस्मात
बाणे ॥ ३८ ॥ देह मिथ्या जाणोनि जीवें । याचें सार्थकचि करावें । भजनभावें
तोषवावें । चित्त सद्गुरूचें ॥ ३९ ॥ शरणागतांची वाहे चिंता । तो येक सद्गुरु
दाता । जैसें बाळक वाढवी माता । नाना यत्नेंकरुनी ॥ ४० ॥ म्हणोन सद्गुरूचें
भजन । जयासि घडे तोचि धन्य । सद्गुरुविण समाधान । आणीक नाहीं
॥ ४१ ॥ सरली शब्दाची खटपट । आला ग्रंथाचा सेवट । येथें सांगितलें स्पष्ट ।
सद्गुरुभजन ॥ ४२ ॥ सद्गुरुभजनापरतें कांहीं । मोक्षदायक दुसरें नाहीं । जयास न
मने त्यांहीं । अवलोकावी गुरुगीता ॥ ४३ ॥ तेथें निरोपिलें बरवें । पार्वतीप्रति
सदाशिवें । या कारणें सद्भावें । सद्गुरुचरण सेवावे ॥ ४४ ॥ जो ये ग्रंथींचा
विवेक । विवंचूनि पाहे साधक । तयास सांपडे येक । निश्चय ज्ञानाचा ॥ ४५ ॥
जे ग्रंथीं बोलिलें अद्वैत । तो म्हणों नये प्राकृत । सत्य जाणावा वेदांत ।
अर्थविषईं ॥ ४६ ॥ प्राकृतें वेदांत कळे । सकळ शास्त्रीं पाहातां मिळे । आणी
समाधान निवळे । अंतर्यामीं ॥ ४७ ॥ तें प्राकृत म्हणों नये । जेथें ज्ञानाचे

होतात (७–३२). सद्गुरूचा जो अंकित त्यानें विवेकपूर्वक अध्यात्मश्रवण करावें म्हणजे मननानें तो अर्थरूप होईल. सच्छिष्यांना – साधकांना – शेवटचें हेंच सांगणें आहे कीं संतांना शरण जा व तन्मुखांनीं अध्यात्मश्रवण करा म्हणजे तुम्हीही संतच होऊन लोकोद्धारास समर्थ व्हाल. सत्संगापरतें दुसरें साधन नाहीं. गुरुभक्तीच्या आधारानें, निरूपणाच्या विचारानें व क्रियाशुद्ध (आचारशुद्ध) निर्धारानें (निश्चयात्मक ज्ञानानें) तुम्ही स्वरूप पावाल – सद्गुरुभजनानें परमार्थबुद्धि विकास पावते व सहज समाधान प्राप्त होतें. देह नश्वर जाणून सार्थकीं लावावा व सद्गुरु संतोषवावे. आई लेंकराला अनेक सायास करून वाढविते तसे सद्गुरु अनन्यभक्तांची चिंता वाहतात. म्हणून सद्गुरुभजन करील तो धन्य होय. सद्गुरुभजनापरतें दुसरें समाधान नाहीं. शब्दांनीं सांगायचें तें संपलें (३३–४१). ग्रंथाचा शेवट आला. सत्संग, अध्यात्मश्रवण व सद्गुरु-भजन या तिहींत सर्व आलें ; त्यांतही सद्गुरुभजनापेक्षां मोक्षदायक दुसरें कांहींच नाहीं. ज्याला कळणार नाहीं त्यानें गुरुगीता पहावी. तेथें सदाशिवानें पार्वतीला सद्गुरुभजनच सांगितलें आहे म्हणून तेंच करावें (४२–४४). या ग्रंथाचें विवेकपूर्वक जो कोणी मनन करील त्याला यांत आत्मनिश्चय सांगितला आहे हेंच कळून येईल. ज्या ग्रंथांत अद्वैतज्ञान स्पष्ट सांगितलें आहे तो ग्रंथ प्राकृत म्हणून हेळसूं नये. वेदांताचें संपूर्ण रहस्य सांगितलं असून श्रुतिशास्त्राला जो पूर्णपणें धरून आहे व ज्याच्या परिशीलनानें आत्मबोधाचें समाधान लाभतें तो ग्रंथ प्राकृत म्हणून कमी समजूं नये. मर्कटाच्या

उपाये । मूर्खासि हें कळे काये । मर्कटा नारिकेळ जैसें ॥ ४८ ॥ आतां असो हें बोलणें । अधिकारपरत्वें घेणें । शिंपीमधील मुक्त उणें । म्हणोंचि नये ॥ ४९ ॥ जेथें नेति नेति श्रुती । तेथें न चले भाषाव्युत्पत्ती । परब्रह्म आदिअंतीं । अनिर्वाच्य ॥ ५० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देहांत निरूपणनाम समास दशम ॥ १० ॥

हातीं नारळ दिल्याप्रमाणें मूर्खाला हें म्हणणं कळलें नाहीं तर न कळो. शिंपींत मोतीं सांपडलें म्हणून शहाणा तें तुच्छ मानीत नाहीं. जेथें वेद ' नेति नेति ' म्हणून हात टेकतात तेथें भाषाव्युत्पत्तीचा अभिमान काय कामाचा ? आदिअंतीं परब्रह्म अनिर्वाच्य आहे, तें शब्दातीत आहे (४५-५०). [द० ७, स० १०]

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ सार्थ श्रीदासबोध ॥

॥ ज्ञानदशक मायोद्भवनाम अष्टम ॥ ८ ॥

॥ श्रीराम ॥ श्रोतीं व्हावें सावध । विमळ ज्ञान बाळबोध । गुरुशिष्यांचा संवाद । अतिसुगम परियेसा ॥ १ ॥ नाना शास्त्रें धांडोळितां । आयुष्य पुरेना सर्वथा । अंतरीं संशयाची व्यथा । वाढोंचि लागे ॥ २ ॥ नाना तीर्थें थोरथोरें । सृष्टीमध्यें अपारें । सुगमें दुर्गमें दुष्करें । पुण्यदायकें ॥ ३ ॥ ऐसीं तीर्थें सर्वहि करी । ऐसा कोण रे संसारीं । फिरों जातां जन्मवरी । आयुष्य पुरेना ॥ ४ ॥ नाना तपें नाना दानें । नाना योग नाना साधनें । हें सर्वहि देवाकारणें । करिजेत आहे ॥ ॥ ५ ॥ पावावया देवाधिदेवा । बहुविध श्रम करावा । तेणें देव ठाईं पाडावा । हें सर्वमत ॥ ६ ॥ पावावया भगवंतातें । नाना पंथ नाना मतें । तया देवाचें स्वरूप तें । कैसें आहे ॥ ७ ॥ बहुत देव सृष्टीवरी । त्यांची गणना कोण करी । येक देव कोणेपरी । ठाईं पडेना ॥ ८ ॥ बहुविध उपासना । ज्याची जेथें पुरे कामना । तो तेथेंचि राहिला मना । सदृढ करूनि ॥ ९ ॥ बहु देव बहु भक्त । इछया जाले आसक्त । बहु ऋषी बहु मत । वेगळालें ॥ १० ॥ बहु निवडितां निवडेना । येक निश्चय घडेना । शास्त्रें भांडती पडेना । निश्चय ठाईं ॥ ११ ॥ बहुत शास्त्रीं बहुत भेद । मतां-मतांस विरोध । ऐसा करितां विवाद । बहुत गेले ॥ १२ ॥ सहस्त्रांमध्यें कोणी येक । पाहे देवाचा विवेक । परी त्या देवाचें कौतुक । ठाईं न पडे ॥ १३ ॥ ठाईं न पडे कैसें म्हणतां । तेथेंचि लागली अहंता । देव राहिला परता । अहंतागुणें ॥ १४ ॥

बाळांना म्ह० मतिमंद अज्ञान्यांना कळेल असा बोध – विमल ज्ञान – येथें सांगायचा आहे. शास्त्रें अनंत अपार आहेत, तीं सर्व धांडोळावीं तर आयुष्य पुरत नाहीं व मन अधिकाधिक संशयारूढ होतें. जन्मभर तीर्थयात्रा कराव्या तर संसारीं सर्व तीर्थें कोणाला होतात ? व कोणी करूं म्हणेल तर आयुष्यही पुरावयाचें नाहीं व कांहीं तीर्थक्षेत्रें दुर्गम व दुष्करही आहेत. नाना तपें, दानें, योगयाग, नाना पंथ, नाना मतें हीं सर्व देवाच्या शोधासाठीं आहेत व नाना श्रम केल्याविना देव पावत नाहीं असें सर्वांचें मत आहे. तर तो देव कसा आहे ? ह्या सृष्टींत अनेक देव आहेत, पण एक देव कसा मिळावा ? अनेक उपासना, अनेक पंथ, अनेक देव व अनेक भक्त परस्परांशीं भांडणारीं अनेक शास्त्रें, अनेक ऋषी व त्यांचीं अनेक मतें, अशा स्थितींत एका देवाचा निश्चय व्हावा कसा ? सहस्त्रावधि मनुष्यांत एखादा देवाचा विचार करितो, पण देवाचें कौतुक

आतां असो हें बोलणें । नाना योग ज्या कारणें । तो देव कोण्या गुणें । ठाईं पडे ॥ १५ ॥ देव कोणासी म्हणावें । कैसें तयासी जाणावें । तेंचि बोलणें स्वभावें । बोलिजेल ॥ १६ ॥ जेणें केलें चराचर । केलें सृष्ट्यादि व्यापार । सर्वकर्ता निरंतर । नाम ज्याचें ॥ १७ ॥ तेणें केल्या मेघमाळा । चंद्रबिंबीं अमृतकळा । तेज दिधलें रविमंडळा । जया देवें ॥ १८ ॥ ज्याची मर्यादा सागरा । जेणें स्थापिलें फणिवरा । जयाचेनि गुणें तारा । अंतरिक्ष ॥ १९ ॥ च्यारी खाणी च्यारी वाणी । चौऱ्यांसि लक्ष जीवयोनी । जेणें निर्मिले लोक तिनी । तया नांव देव ॥ २० ॥ ब्रह्मा विष्णु आणी हर । हे जयाचे अवतार । तोचि देव हा निर्धार । निश्चयेसीं ॥ २१ ॥ देव्हारांचा उठोनि देव । करूं नेणे सर्व जीव । तयाचेनि ब्रह्मकटाव । निर्मिला न वचे ॥ २२ ॥ ठाईं ठाईं देव असती । तेंहि केली नाहीं क्षिती । चंद्र सूर्य तारा जीमूती । तयांचेनि नव्हे ॥ २३ ॥ सर्वकर्ता तोचि देव । पाहों जातां निरावेव । ज्याचि कळा लीळा लाघव । नेणती ब्रह्मादिक ॥ २४ ॥ येथें आशंका उठिली । ते पुढिलीये समासीं फिटली । आतां वृत्ती सावध केली । पाहिजे श्रोतीं ॥ २५ ॥ पैस अवकाश आकाश । कांहींच नाहीं जें भकास । तये निर्मळीं वायोस । जन्म जाला ॥ २६ ॥ वायोपासून जाला वन्ही । वन्हीपासुनी जालें पाणी । ऐसी जयाची करणी । अघटित घडली ॥ २७ ॥ उदकापासून सृष्टि जाली । स्तंभेंविण उभारली । ऐसी विचित्र कळा केली । त्या नांव देव ॥ २८ ॥ देवें निर्मिली हे क्षिती । तिचे पोटीं पाषाण होती । तयासचि देव म्हणती । विवेकहीन ॥ २९ ॥ जो सृष्टिनिर्माणकर्ता । तो ये सृष्टीपूर्वीं होता । मग हे तयाची सत्ता । निर्माण जाली ॥ ३० ॥ कुलाल पात्रापूर्वीं आहे । पात्रें कांहीं

कळणें दुर्घट आहे; असें म्हटलें तरी अहंता जडते व देव दूरच राहतो. देव कोणाला म्हणावें व त्याला कसें जाणावें? (१–१६). ज्यानें ही चराचर सृष्टि केली, जो सृष्ट्यादि व्यापार चालवितो म्हणून ज्याला सर्वकर्ता म्हणतात, ज्यानें मेघमाळा केल्या, चंद्रबिंबीं अमृतकळा ठेविल्या, रविमंडळाला तेज दिलें, सागराला मर्यादा घालून दिली, पृथ्वीला शेषाच्या मस्तकावर ठेविली, अंतरिक्षांत नक्षत्रतारांना स्थानें देऊन कामास लावलें, चारी खाणी चारी वाणीचे अनंत जीव निर्माण केलें, ज्यानें त्रैलोक्य निर्मिलें, हरिहरब्रह्म हे ज्याचे अवतार, तो देव होय (१७–२१). देव्हाऱ्यांतला देव उठून कांहीं सर्व जीव उत्पन्न करीत नाहीं, त्याला अनंत ब्रह्मांडांचे गोळ कांहीं निर्मितां येत नाहींत. ठिकठिकाणीं अनेक देव आहेत त्यांचेंही हें काम नाहीं; चंद्र, सूर्य, तारा, मेघ त्यांच्या केल्यापैकीं नव्हत. तोच सर्वकर्ता देव पाहूं जावें तों तो निरवयव (निराकार) आहे. (आतां निरवयवी चराचर कसें झालें याचा विचार पुढें करूं) पैस – अवकाश – कांहीं नाहीं (शून्य) भकाश (निर्मळ) असें आकाश. त्या आकाशापासून वायु, वायूपासून अग्नि, अग्नीपासून पाणी व पाण्यापासून पृथ्वी अशी अघटित घटना झाली. उदकापासून सृष्टि झाली व स्तंभावांचून उभी राहिली. हें ज्यानें केलें तो देव. देवानें सृष्टि केली, सृष्टीच्या पोटीं पाषाण झाले, त्या पाषाणांसच अविवेकी देव म्हणतात! सृष्टि निर्माणकर्ता सृष्टीच्या पूर्वीं हें तर उघड आहे ना? मडकीं

कुलाल नव्हे । तैसा देव पूर्वींच आहे । पाषाण नव्हे सर्वथा ॥ ३१ ॥ मृत्तिकेचें सैन्य केलें । कर्तें वेगळे राहिले । कार्य कारण येक केलें । तरी होणार नाहीं ॥ ३२ ॥ तथापी होईल पंचभूतिक । निर्गुण नव्हे कांहीं येक । कार्यकारणाचा विवेक । भूतांपरता नाहीं ॥ ३३ ॥ अवघी सृष्टि जो कर्ता । तो ते सृष्टीहूनि पर्ता । तेथें संशयाची वार्ता । काढूंचि नये ॥ ३४ ॥ खांबसूत्रींची बाहुली । जेणें पुरुषें नाचविली । तोचि बाहुली हे बोली । घडे केवीं ॥ ३५ ॥ छायामंडपीची सेना । सृष्टिसारिखीच रचना । सूत्रें चाळी परी तो नाना – । व्यक्ति नव्हे ॥ ३६ ॥ तैसा सृष्टिकर्ता देव । परी तो नव्हे सृष्टिभाव । जेणें केले नाना जीव । तो जीव कैसेनी ॥ ३७ ॥ जें जें जया करणें पडे । तें तें तो हें कैसें घडे । म्हणोनि वार्यांचि बापुडे । संदेहीं पडती ॥ ३८ ॥ सृष्टि ऐसेंचि स्वभावें । गोपुर निर्मिलें बरवें । परी तो गोपुरकर्ता नव्हे । निश्चयेंसी ॥ ३९ ॥ तैसें जग निर्मिलें जेणें । तो वेगळा पूर्णपणें । येक म्हणती मूर्खपणें । जग तोचि जगदीश ॥ ४० ॥ एवं जगदीश तो वेगळा । जगनिर्माण त्याची कळा । तो सर्वांमध्यें परी निराळा । असोन सर्वीं ॥ ४१ ॥ म्हणोनि भूतांचा कर्दमु । यासी अलिप्त आत्मारामु । अविद्यागुणें मायाभ्रमु । सत्यचि वाटे ॥ ४२ ॥ मायोपाधी जगडंबर । आहे सर्वहि साचार । ऐसा हा विपरीत विचार । कोठेंचि नाहीं ॥ ४३ ॥ म्हणोनि जग मिथ्या साच आत्मा । सर्वांपर जो परमात्मा । अंतर्बाह्य अंतरात्मा । व्यापूनि असे ॥ ४४ ॥ तयास म्हणावें देव । येर हें अवघेंचि वाव । ऐसा आहे अंतर्भाव । वेदांतींचा ॥ ४५ ॥ पदार्थवस्तु नासिवंत । हें तों अनुभवास येत ।

घडणारा कुंभार (कुलाल) मडक्यापूर्वीं तसा देव सृष्टीपूर्वीं, सृष्टीच्या पोटीं निघणाऱ्या पाषाणांपूर्वींचा होय. मृत्तिकेचें सैन्य कर्त्यांहून वेगळें तसा सृष्टिकर्ता देव सृष्टीहून वेगळा. कार्य कारण एक होत नाहींत व तीं दोन्ही पंचभूतात्मक असल्यामुळें एक म्हणावींत हवीं तर, पण कार्यकारण संबंध पंचभूतांपलीकडे – निर्गुण ब्रह्माकडे – नेतां येत नाहीं. सृष्टिकर्ता सृष्टीपलीकडचा याविषयीं संशय बाळगूं नये. कळसूत्री बाहुली वेगळी व ती नाचविणारा वेगळा. छायामंडपीची सेना (पडद्याच्या आंतल्या दिव्याच्या प्रकाशानें पडद्यावर कातरून लावलेलीं चित्रें मोठीं हुबेहुब मूळच्यासारखीं दिसतात, सिनेमाच्या खेळांतल्या-सारखीं) ही वेगळी व सूत्रधार वेगळा. तसा सृष्टिकर्ता सृष्टिभावांतला नव्हे. नाना जीव निर्माण करणारा तो स्वतः जीव कसा असेल ? जो जें करितो तो त्याहून वेगळा असतो. गोपूर उभारणारा कांहीं गोपुर नव्हे (देवळाच्या पुढील दरवाज्यावरच्या मजल्यांना गोपुर म्हणतात). तसा जगनिर्माणकर्ता जगदीश नव्हे. जगदीश सर्व जगांत (सृष्टींत) असतो, पण तो जगाहून वेगळा आहे. तात्पर्य, पंचभूतांचा सृष्टिरूप जो कर्दम (मिश्रण, चिखल) त्याहून आत्माराम वेगळा (अलिप्त) आहे. अविद्येमुळें मायाभ्रम सत्य वाटतो, पण मायोपाधि जगडंबर सत्य आहे असें कोठेंही म्हटलेलें नाहीं. म्हणून जग मिथ्या व ब्रह्म सत्य आहे. तो परमात्मा सर्वांपर आहे, सृष्टीला व अंतरात्म्याला (प्रतिबिंबभूत जीवसृष्टीला) व्यापून आहे. त्याला देव म्हणावें, त्यावांचून बाकी सर्व मिथ्या आहे, हा वेदांताचा निष्कर्ष आहे. पदार्थ नाशवंत आहेत हें

या कारणें भगवंत । पदार्थावेगळा ॥ ४६ ॥ देव विमळ आणी अचळ । शास्त्रें बोलती सकळ । तया निश्चळास चंचळ । म्हणों नये सर्वथा ॥ ४७ ॥ देव आला देव गेला । देव उपजला देव मेला । ऐसें बोलतां दुरिताला । काय उणें ॥ ४८ ॥ जन्ममरणाची वार्ता । देवास लागेना सर्वथा । देव अमर ज्याची सत्ता । त्यासी मृत्यु कैसेनी ॥ ४९ ॥ उपजणें आणी मरणें । येणें जाणें दुःख भोगणें । हें त्या देवाचें करणें । तो कारण वेगळा ॥ ५० ॥ अंतःकरण पंचप्राण । बहुतत्वीं पिंडज्ञान । या सर्वांस आहे चळण । म्हणोनि देव नव्हेती ॥ ५१ ॥ येवं कल्पनेरहित । तया नांव भगवंत । देवपणाची मात । तेथें नाहीं ॥ ५२ ॥ तव शिष्यें आक्षेपिलें । तरी कैसें ब्रह्मांड केलें । कर्तेपणें कारण पडिलें । कार्यामध्यें ॥ ५३ ॥ द्रष्टेपणें द्रष्टा दृश्यीं । जैसा पडे अनायासीं । कर्तेपणें निर्गुणासी । गुण तैसे ॥ ५४ ॥ ब्रह्मांडकर्ता कवण । कैसी त्याची वोळखण । देव सगुण किं निर्गुण । मज निरोपावा ॥ ५५ ॥ येक म्हणती त्या ब्रह्मातें । इच्छामात्रें सृष्टिकर्तें । सृष्टिकर्तें त्यापर्तें । कोण आहे ॥ ५६ ॥ आतां असो हे बहु बोली । सकळ माया कोठून जाली । ते हे आतां निरोपिली । पाहिजे स्वामी ॥ ५७ ॥ ऐसें ऐकोनि वचन । वक्ता म्हणे सावधान । पुढिले समासीं निरूपण । सांगिजेल ॥ ५८ ॥ ब्रह्मीं माया कैसी जाली । पुढें असे निरोपिली । श्रोतीं वृत्ति सावध केली । पाहिजे आतां ॥ ५९ ॥ पुढें हेंचि निरूपण । विशद केलें श्रवण । जेणें होये समाधान । साधकांचें ॥ ६० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देवदर्शननाम समास प्रथम ॥ १ ॥

सर्वांस दिसतेंच आहे, म्हणून परमात्मा सर्व पदार्थांहून वेगळा आहे (२२–४६). देव विमल व अचळ आहे असा शास्त्रसिद्धान्त आहे. त्या निश्चळास चंचळ म्हणूं नये. देव आला व गेला, देव जन्मला व मेला ही भाषा देवासंबंधीं वापरण्यांत पाप आहे. ज्याच्या सत्तेनें इंद्रादि देव अमर आहेत त्या देवाधिदेवाला जन्ममृत्यु कोठचा ? अंतःकरण, पंचप्राण, पिंडाचीं अनेक तत्त्वें हीं देव नव्हेत, कारण हीं चंचळ व देव निश्चळ आहे. कल्पना तेथें शिवत नाहीं (४७–५२). तेथें प्रश्न उद्भवला. ‘ तुम्ही कर्ताही (कारण) कार्यांत घातला. निर्गुण कर्ता म्हणावा (कारण, कर्तृत्व हा गुण आहे व ज्याच्या ठिकाणीं गुण आहे तें कार्य होतें) तर द्रष्टा जसा द्रष्टेपणामुळेंच (हा गुण आहे) दृश्यांत सामील होतो त्याप्रमाणेंच निर्गुणही सगुणांत (कार्यांत) येतो. मग ब्रह्मांडकर्ता देव सगुण कीं निर्गुण, व निर्गुण-असल्यास निर्गुण ब्रह्मीं माया कशी झाली ? (५३–६०). [द० ८, स० १]

॥ श्रीराम ॥ मागां श्रोतीं आक्षेपिलें । तें पाहिजे निरोपिलें । निरावेवीं कैसें जालें । चराचर ॥ १ ॥ याचें ऐसें प्रतिवचन । ब्रह्म जें कां सनातन । तेथें माया मिथ्याभान । विवर्तरूप भासे ॥ २ ॥ आदि येक परब्रह्म । नित्यमुक्त अक्रिय परम । तेथें अव्याकृत सूक्ष्म । जाली मूळमाया ॥ ३ ॥

॥ श्लोक ॥ आद्यमेकं परब्रह्म नित्यमुक्तमविक्रियम् । तस्य माया समावेशो जीवमव्याकृतात्मकम् ॥

आशंका ॥ येक ब्रह्म निराकार । मुक्त अक्रिय निर्विकार । तेथें मायावोडंबर । कोठून जाली ॥ ४ ॥ ब्रह्म अखंड निर्गुण । तेथें इच्छा धरी कोण । निर्गुणीं सगुणेंविण । इच्छा नाहीं ॥ ५ ॥ मुळीं असेचिना सगुण । म्हणोनि नामें निर्गुण । तेथें जालें सगुण । कोणेपरी ॥ ६ ॥ निर्गुणचि गुणा आलें । ऐसें जरी अनुवादलें । लागों पाहे येणें बोलें । मूर्खपण ॥ ७ ॥ येक म्हणती निरावेव । करून अकर्ता तो देव । त्याची लीळा बापुडे जीव । काय जाणती ॥ ८ ॥ येक म्हणती तो परमात्मा । कोण जाणे त्याचा महिमा । प्राणी बापुडा जीवात्मा । काय जाणे ॥ ९ ॥ उगाच महिमा सांगती । शास्त्रार्थ अवघा लोपिती । बळेंचि निर्गुणास म्हणती । करूनि अकर्ता ॥ १० ॥ मुळीं नाहीं कर्तव्यता । कोण करून अकर्ता । कर्ता अकर्ता हे वार्ता । समूळ मिथ्या ॥ ११ ॥ जें ठाईंचें निर्गुण । तेथें कैचें कर्तेपण । तरी हे इच्छा धरी कोण । सृष्टि रचावयाची ॥ १२ ॥ इच्छा परमेश्वराची । ऐसी युक्ती बहुतेकांची । परी त्या निर्गुणास इच्छा कैंची । हें कळेना ॥ १३ ॥ तरी हें इतुकें कोणें केलें । किंवा आपणचि जालें । देवेंविण उभारलें । कोणेपरी ॥ १४ ॥ देवेंविण जालें सर्व । मग देवास कैंचा ठाव । येथें देवाचा अभाव । दिसोन आला ॥ १५ ॥ देव म्हणों सृष्टिकर्ता । तरी येवों पाहे सगुणता । निर्गुणपणाची वार्ता । देवाची बुडाली ॥ १६ ॥ देव ठाईंचा निर्गुण । तरी सृष्टिकर्ता कोण । कर्तेपणाचें सगुण ।

प्रश्न—निराकार निर्गुण ब्रह्मापासून सगुण साकार माया कशी निर्माण झाली ?

उत्तर—जसा दोरीवर सर्प तशी ब्रह्मावर माया विवर्तरूप भासते. आदि एक नित्यमुक्त अक्रिय परब्रह्म; तेथें अव्याहत सूक्ष्म मूळमाया झाली (१-३). प्रश्न—ब्रह्म सत्य व निर्विकार, तेथें ही लटकी माया कोठून आली ? ब्रह्माला सृष्टि रचावयाची इच्छा झाली असें सांगतात, पण निर्गुणाला इच्छा झाली कशी ? निर्गुण गुणाला कसें आलें ? तें देव करून अकर्तें आहे 'याची लीला बापुडे मानव काय जाणती ? तुम्ही म्हणाल हें आम्हांला पटत नाहीं. ' इच्छा परमेश्वराची । ऐसी युक्ती बहुतेकांची । परी त्या निर्गुणास इच्छा कैंची । हें कळेना. ' हें ब्रह्मांड काय आपणच झालें, पण हें ' देवेंवीण उभारलें । कोणेपरी ?' देवेंवीण उभारलें म्हणावें तर देवाचा अभाव दिसून येतो. देव सृष्टिकर्ता म्हणाल तर देवाकडे सगुणपणा येतो, पण देव निर्गुण असें वेदशास्त्र व सर्व संत सांगतात. शिवाय सगुण तितकें नाशवंत या न्यायानें अविनाशी

नासिवंत ॥ १७ ॥ येथें पडिले विचार । कैसें जालें सचराचर । माया म्हण
स्वतंतर । तरी हेंहि विपरीत दिसे ॥ १८ ॥ माया कोणी नाहीं केली ।
आपणचि विस्तारली । ऐसें बोलतां बुडाली । देवाची वार्ता ॥ १९ ॥ दे
निर्गुण स्वतः सिद्ध । त्यासी मायेसि काय संबंध । ऐसें बोलतां विरुद्ध ।
दिसोन आलें ॥ २० ॥ सकळ कांहीं कर्तव्यता । आली मायेच्याचि माथां ।
तरी भक्तांस उद्धरिता । देव नाहीं कीं ॥ २१ ॥ देवेंविण नुस्ती माया । कोण
नेईल विलया । आम्हां भक्तां सांभाळाया । कोणीच नाहीं ॥ २२ ॥ म्हणोन
माया स्वतंतर । ऐसा न घडे कीं विचार । मायेस निर्मिता सर्वेश्वर । तो
येकचि आहे ॥ २३ ॥ तरी तो कैसा आहे ईश्वर । मायेचा कैसा विचार । तरी
हें आतां सविस्तर । बोलिलें पाहिजे ॥ २४ ॥ श्रोतां व्हावें सावधान । येकाग्र
करूनियां मन । आतां कथानुसंधान । सावध ऐका ॥ २५ ॥ येके आशंकेचा
भाव । जनीं वेगळाले अनुभव । तेहि बोलिजेती सर्व । येथानुक्रमें ॥ २६ ॥
येक म्हणती देवें केली । म्हणोनि हे विस्तारली । देवास इच्छा नस्ती
जाली । तरी हे माया कैंची ॥ २७ ॥ येक म्हणती देव निर्गुण । तेथें
इच्छा करी कोण । माया मिथ्या हे आपण । जालीच नाहीं ॥ २८ ॥ येक
म्हणती प्रत्यक्ष दिसे । तयेसी नाहीं म्हणतां कैसें । माया हे अनादि असे ।
शक्ती ईश्वराची ॥ २९ ॥ येक म्हणती साच असे । तरी हे ज्ञानें कैसी
निरसे । साचासारिखीच दिसे । परी हे मिथ्या ॥ ४० ॥ येक म्हणती
मिथ्या स्वभावें । तरी साधन कासया करावें । भक्तिसाधन बोलिलें देवें ।
मायात्यागाकारणें ॥ ३१ ॥ येक म्हणती मिथ्या दिसतें । भय अज्ञान

देवाकडे सगुणपण येतें असें म्हणवत नाहीं. देव सृष्टिकर्ता नाहीं म्हणाल तर देवाचा अभाव दिसून येतो, निदान त्याचें महत्त्व उरत नाहीं. माया कोणीं केली नाहीं, आपणच स्वतंत्रपणें उभारली असें म्हणाल तर देवाचा व मायेचा संबंध नसल्यामुळें देवाची वार्ताच उडाली ; आणि देवाची वार्ता उडाली तर भक्तांचा उद्धार कोण करील ? ' देवेंवीण नुस्ती माया । कोण नेईल विलया । आम्हां भक्तां सांभाळाया । कोणीच नाहीं ' अशी आपत्ति मग उद्भवेल ! म्हणून माया स्वतंत्र नसली पाहिजे. माया स्वतंत्र जर नाहीं तर मायेचा निर्मिता ईश्वर कोण व कोठें आहे ? (४–२४). उत्तर–ह्या प्रश्नाचीं उत्तरें ' जनीं वेगळाले अनुभव ' असल्यामुळें वेगवेगळीं कशीं देतात तें आधीं सांगतों, मग शेवटीं सिद्धान्त सांगूं. एक म्हणतात– ' माया देवानें केली म्हणून झाली, देवाला इच्छा झाली नसती तर ही झाली नसती. ' दुसरे म्हणतात–' देव निर्गुण, त्याला इच्छा कोठून होणार ? म्हणून माया मिथ्या आहे, ही झालीच नाहीं. ' तिसरे विद्वान् सांगतात–' वा ! नाहीं कशी म्हणतां ? ही प्रत्यक्ष दिसते आणि नाहीं कशी ? माया ही ईश्वराची अनादि अशी शक्ति आहे. ' चवथे पंडित म्हणतात ' माया साच असती तर हिचा ज्ञानानें निरास कसा झाला असता ? म्हणून ही साचासारखी दिसली तरी ही मिथ्या आहे. ' पांचवे गृहस्थ म्हणतात–' अज्ञानसंनिपातामुळें मायेचें भय वाटतें, तें भय जाण्यास साधनरूप औषध घेत म्हणजे दृश्य मिथ्या आहे हें समजतें. ' सहावे पंडित बोलतात–' मायेच्या निरसनार्थ अनंत साधनें ग्रंथांतरीं सांगितले

सन्निपातें । साधनऔषधही घेईजेतें । परी तें दृश्य मिथ्या ॥ ३२ ॥ अनंत साधनें बोलिलीं । नाना मतें भांबावलीं । तरी माया नवचे त्यागिली । ते मिथ्या कैसी म्हणावी ॥ ३३ ॥ मिथ्या बोले योगवाणी । मिथ्या वेदशास्त्रीं पुराणीं । मिथ्या नाना निरूपणीं । बोलिली माया ॥ ३४ ॥ माया मिथ्या म्हणतां गेली । हे वार्ता नाहीं ऐकिली । मिथ्या म्हणतांच लागली । समागमें ॥ ३५ ॥ जयाचे अंतरीं ज्ञान । नाहीं ओळखिले सज्जन । तयास माया मिथ्याभान । सत्यचि वाटे ॥ ३६ ॥ जेणें जैसा निश्चय केला । तयासी तैसाचि फळला । पाहे तोचि दिसे बिंबला । तैसी माया ॥ ३७ ॥ येक म्हणती माया कैंची । आहे तें सर्व ब्रह्मची । थिजल्या विघुरल्या घृताची । ऐक्यता न मोडे ॥ ३८ ॥ थिजलें आणि विघुरलें । हें स्वरूपीं नाहीं बोलिलें । साहित्य भंगलें येणें बोलें । म्हणती येक ॥ ३९ ॥ येक म्हणती सर्व ब्रह्म । हें न कळे जयास वर्म । तयाचे अंतरींचा भ्रम । गेलाच नाहीं ॥ ४० ॥ येक म्हणती येकचि देव । तेथें कैंचें आणिलें सर्व । सर्व ब्रह्म हें अपूर्व । आश्चर्य वाटे ॥ ४१ ॥ येक म्हणती येकचि खरें । आनुहि नाहीं दुसरें । सर्व ब्रह्म येणें प्रकारें । सहजची जालें ॥ ४२ ॥ सर्व मिथ्या येकसरें । उरलें तेंचि ब्रह्म खरें । ऐसीं वाक्यें शास्त्राधारें । बोलती येक ॥ ४३ ॥ अळंकार आणि सुवर्ण । तेथें नाहीं भिन्नपण । आटाआटी व्यर्थ सीण । म्हणती येक ॥ ४४ ॥ हीन उपमा येकदेसी । कैसी साहेल वस्तूसी । वर्णव्यक्ती अव्यक्तासी । साम्यता न घडे ॥ ४५ ॥ सुवर्णी दृष्टी घालितां । मुळींच आहे व्यक्तता । अळंकार सोनें पाहातां । सोनेंचि असे ॥ ४६ ॥ मुळीं सोनेंचि हें व्यक्त । जड येकदेसी पीत । पूर्णास अपूर्णाचा दृष्टांत । केंवी घडे ॥ ४७ ॥ दृष्टांत तितुका येकदेसी । देणें घडे कळायासी । सिंधु आणि लहरीसी । भिन्नत्व कैंचें ॥ ४८ ॥ उत्तम मध्यम कनिष्ठ । येका

आहेत, व नाना मतें भांबावलीं आहेत तरी मायेचा त्याग होत नाहीं, मग तिला उगीच मिथ्या म्हणून काय म्हणतां ?' सातवे गृहस्थ जबाब देतात–' वेदशास्त्रपुराणांनीं माया मिथ्या असें स्पष्ट सांगितलें असून माया मिथ्या याबद्दल तुम्ही शंका घेतां, तुम्हांला म्हणावें तरी काय ?' आठवे पंडित विचारतात:–' मिथ्या मिथ्या काय करितां ? मिथ्या म्हणतां गेली असें होत नाहीं ना ? उलट ' मिथ्या म्हणतांच लागली । समागमें.'–नववे विद्वान् बोलतात–' जयाचे अंतरीं ज्ञान । नाहीं व ज्याला सत्संग झाला नाहीं त्याला माया मिथ्याभाव सत्य वाटते. ' दहावे गृहस्थ म्हणतात–' उगीच वाद कशाला ? ज्याचा निश्चय त्याला फलद्रूप होतो. आरशांत पाहणारा असतो तसें त्याला प्रतिबिंब दिसतें. अशीच माया आहे !' अकरावे विद्वान् म्हणतात–' अहो ! माया कसली ? सर्व ब्रह्मच आहे.' ' थिजल्या विघुरल्या घृताची । ऐक्यता

दृष्टांतें कळे स्पष्ट । येका दृष्टांतें नष्ट । संदेह वाढे ॥ ४९ ॥ कैंचा सिंधु कैंची लहरी । अचळास चळाची सरी । साचाऐसी वोडंबरी । मानूंच नये ॥ ५० ॥ वोडंबरी हे कल्पना । नाना भास दाखवी जना । येरवी हे जाणा । ब्रह्मची असे ॥ ५१ ॥ ऐसा वाद एकमेकां । लागतां राहिली आशंका । तेचि आतां पुढें ऐका । सावध होउनी ॥ ५२ ॥ माया मिथ्या कळों आली । परी ते ब्रह्मीं कैसी जाली । म्हणावी ते निर्गुणें केली । तरी ते मुळींच मिथ्या ॥ ५३ ॥ मिथ्या शब्दीं कांहींच नाहीं । तेथें केलें कोणें काई । करणें निर्गुणाचा ठाईं । हेंहि अघटित ॥ ५४ ॥ कर्ता ठाईंचा अरूप । केलें तेंही मिथ्यारूप । तथापी फेडूं आक्षेप । श्रोतयांचा ॥ ५५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सूक्ष्मआशंकानाम समास द्वितीय ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥ अरे जें जालेंचि नाहीं । त्याची वार्ता पुससी काई । तथापि सांगों जेणें कांहीं । संशय नुरे ॥ १ ॥ दोरीकरितां भुजंग । जळाकरितां तरंग । मार्तंडाकरिता चांग । मृगजळ वाहे ॥ २ ॥ कल्पनेकरितां स्वप्न दिसे । सिंपीकरितां रुपें भासे । जळाकरितां गार वसे । निमिष येक ॥ ३ ॥ मातीकरितां भिंती जाली । सिंधुकरितां लहरी आली । तिळाकरितां पुतळी । दिसों लागे ॥ ४ ॥ सोन्याकरितां अळंकार । तंतूकरितां जालें चीर । कासवाकरितां विस्तार । हातापायांचा ॥ ५ ॥ तूप होतें तरी थिजलें । तरीकरितां मीठ जालें । बिंबाकरितां बिंबलें । प्रतिबिंब ॥ ६ ॥ पृथ्वीकरितां जालें झाड । झाडाकरितां छाया वाड । धातुकरितां पवाड । उंच नीच वर्णाचा ॥ ७ ॥ आतां असो हे दृष्टांत । अद्वैतास कैंचें द्वैत । द्वैतेंविण

न मोडे.' बारावे पंडित बोलतात — ' एकच निर्गुण देव आहे तेथें सर्व ब्रह्म कोठचें आणतां ?' असे माया सत्य कीं मिथ्या याबद्दल अनेक वाद निघतात (२५–५२). माया मिथ्या आहे हें स्पष्ट आहे, ' ती ब्रह्मीं कैसी झाली ?' हा मुख्य प्रश्न आहे. त्याला उत्तर हेंच आहे कीं निर्गुण ब्रह्माकडे कर्तेपण लावतां येत नाहीं व माया ' मिथ्या ' ह्या शब्दानेंच ' ती कांहीं नाहीं ' असें उघड होत आहे. मग जी नाहींच तिचा कर्ता कोण म्हणून काय विचारतां. ' कर्ता ठायींचा अरूप ' व ' केलें तेंही मिथ्यारूप ' कर्त्याला मुळीं नांव ना रूप, व जें केलें म्हणतां तेंही ' मिथ्यारूप ' आहे तथापि आक्षेप काढलाच आहे तर त्याला उत्तरही देऊं (५३–५५). [द० ८, स० २]

' अरे ! माया (सृष्टि) जी झालीच नाहीं तिची वार्ता काय पुसतोस ? तथापि विचारलेंस तर निःसंदेहता होईल असें उत्तर देऊं. दोरी आहे म्हणून सर्प दिसतो, जळामुळें तरंग उठतो, सूर्यास्तव मृगजळ भासतें, कल्पनेपासून स्वप्न उद्भवतें, शिंप आहे म्हणून रुपें चमकतें; जळासाठीं गार, मातीसाठीं भिंत, सिंधुसाठीं तरंग, डोळ्यांतील तीळ आहे म्हणून पुतळी, सोन्याकरितां अलंकार; तंतूसाठीं वस्त्र, कासवासाठीं हातापायांचा विस्तार, पातळ तुपाचें घट्ट तूप, खाडीपासून मीठ, बिंबामुळें प्रतिबिंब, पृथ्वीमुळें झाड; झाडाकरितां छाया, धातूमुळें उच्चनीच वर्ण — हे दृष्टांत आतां पुरेत. हे सारे द्वैतांतले दृष्टांत अद्वैतसिद्धीच्या काय कामाचे ! पण द्वैतावांचून अद्वैत बोलतांच येत नाहीं. भासामुळें भास (जग) भासतो,

अद्वैत । बोलतांच नये ॥ ८ ॥ भासाकरितां भास भासे । दृश्याकरितां दृश्य दिसे । अदृश्यास उपमा नसे । म्हणोनि निरोपम ॥ ९ ॥ कल्पनेविरहित हेत । दृश्यावेगळा दृष्टांत । द्वैतावेगळें द्वैत । कैसें जालें ॥ १० ॥ विचित्र भगवंताची करणी । वर्णवेणा सहस्रफणी । तेणें केली उभवणी । अनंत ब्रह्मांडाची ॥ ११ ॥ परमात्मा परमेश्वरु । सर्वकर्ता जो ईश्वरु । तयापासूनि विस्तारु । सकळ जाला ॥ १२ ॥ ऐसीं अनंत नामें धरी । अनंत शक्ती निर्माण करी । तोचि जाणावा चतुरीं । मूळपुरुष ॥ १३ ॥ त्या मूळपुरुषाची वोळखण । ते मूळमायाचि आपण । सकळ कांहीं कर्तेपण । तेथेंचि आलें ॥ १४ ॥

॥ श्लोक ॥ कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ॥ ६ ॥

हें उघड बोलतां नये । मोडों पाहातो उपाये । येरवीं हें पाहातां काय । साच आहे? ॥ १५ ॥ देवापासून सकळ जालें । हें सर्वांस मानलें । परी त्या देवास वोळखिलें । पाहिजे कीं ॥ १६ ॥ सिद्धांचें जें निरूपण । तें साधकांस न मने जाण । पक्व नाहीं अंतःकरण । म्हणोनियां ॥ १७ ॥ अविद्यागुणें बोलिजे जीव । मायागुणें बोलिजे शिव । मूळमायागुणें देव । बोलिजेतो ॥ १८ ॥ म्हणोनि कारण मूळमाया । अनंत शक्ती धरावया । तेथींचा अर्थ जाणावया । अनुभवी पाहिजे ॥ १९ ॥ मूळमाया तोचि मूळपुरुष । तोचि सर्वांचा ईश । अनंत नामी जगदीश । तयासीच म्हणावें ॥ २० ॥ अवघी

दृश्यामुळें दृश्य दिसतें पण अदृश्याला (ब्रह्माला) उपमा नाहीं. म्हणून तें अनुपम आहे. कल्पना सोडून हेतु (कारण) सांगतां येत नाहीं, दृश्याला सोडून दृष्टांत देतां येत नाहीं, त्याप्रमाणें द्वैतावांचून (द्वैताचा अंगीकार केल्यावांचून) ही द्वैतरूप सृष्टि कशी झाली हें सांगतां येत नाहीं (१–१०). भगवंताची करणी विलक्षण आहे, ती शेषाला वर्णितां येत नाहीं. ही अनंत ब्रह्मांडांची उभारणी त्यानें केली आहे. परमात्मा, परमेश्वर, सर्वकर्ता, ईश्वर, अनंतनामी, अनंतशक्ति जो मूळपुरुष त्याच्यापासून सारा विस्तार झाला आहे. त्यालाच मूळमाया म्हणतात. कार्यकारणाचा हेतु ती आहे. तीच प्रकृति होय. हें उघड सांगतां येत नाहीं, कारण हें सांगितल्यास अनधिकारी पुरुष साधनें सोडून ब्रह्मप्राप्तीचा मार्गच सोडून देईल (अद्वैत ब्रह्माच्या ठिकाणीं द्वैत झालेंच नाहीं हा सिद्धांत, तथापि संशय मोडण्यासाठीं द्वैताची उभारणी करून दाखवीत आहेत व मूळमाया व तेथून पुढील सृष्टिरचनेची गोष्ट सांगत आहेत). तथापि (स्वानुभवाच्या बाजूनें विचाराल तर) मूळमाया व तिची गोष्ट (आम्ही पुढें सांगणार आहोंत ती) काय खरी आहे ? सृष्टि नसून सृष्टि झाली असा ग्रह करून घेणाऱ्यांसाठीं सृष्टीच्या उभारणीची गोष्ट सांगावयाची आहे. खरोखर ‘ अरे जें जालेंचि नाहीं ’ हाच सिद्धांत आहे. देवापासून सकळ झालें या लोकांच्या समजुतीप्रमाणेंच आम्हीं बोलतों, पण त्या देवाला ओळखलें पाहिजे. सिद्धांचें निरूपण (त्यांच्या भूमिकेवरून असतें पण तें) साधकाचें अंतःकरण परिपक्वतेस न आल्यामुळें त्याला कळत नाहीं (कांहीं झालेंच नाहीं हा सिद्धानुभव, पण झालें आहे व त्याचा कर्ता देव आहे या त्याच्या समजुतीप्रमाणेंच सध्यां आम्हीं बोलतों.) ‘ कर्तो ठाईंचा अरूप । केलें तें ही मिथ्यारूप ’ ‘ अरे जें झालेंचि नाहीं ’ ही भाषा कळत नाहीं तोंवर पुढील उभारणी खरी मानावी. (पुढें प्रसंगानें संहारणी येईलच). पिंडाच्या उपाधीमुळें ‘ जीव ’ व ब्रह्मांडाच्या उपाधीमुळें ‘ शिव ’ व मूळमायेच्या उपाधीमुळें ‘ देव ’ असें म्हटलें जातें. म्हणून सृष्टिरचनादि कार्याला लागणाऱ्या अनंत शक्ति धारण करणारी मूळमाया हेंच सर्वांचें मूळ होय ; मूळपुरुष ईश, जगदीश तिलाच म्हणतात (११–२०). सारें जगत् मूळमायेचा विस्तार

माया विस्तारली। परी हे निशेष नाथिली। ऐसीया वचनाची खोली। विरळा जाणे ॥ २१ ॥ ऐसें अनिर्वाच्य बोलिजे। परी हें स्वानुभवें जाणिजे। संतसंगेंविण नुमजे। कांहीं केल्या ॥ २२ ॥ माया तोचि मूळपुरुष। साधकां न मने हें निशेष। परी अनंतनामीं जगदीश। कोणास म्हणावें ॥ २३ ॥ नामरूप माये लागलें। तरी हें बोलणें नीटचि जालें। येथें श्रोतीं अनुमानिलें। कासयासी ॥ २४ ॥ आतां असो हे सकळ बोली। मागील आशंका राहिली। निराकारीं कैसी जाली। मूळमाया ॥ २५ ॥ दृष्टीबंधन मिथ्या सकळ। परी तो कैसा जाला खेळ। हेंचि आतां अवघें निवळ। करून दाऊं ॥ २६ ॥ आकाश असतां निश्चळ। मध्यें वायो जाला चंचळ। तैसी जाणावी केवळ। मूळमाया ॥ २७ ॥ रूप वायोचें जालें। तेणें आकाश भंगलें। ऐसें हें सत्य मानलें। न वचे किं कदा ॥ २८ ॥ तैसी मूळमाया जाली। आणी निर्गुणता संचली। येणें दृष्टांतें फिटली। मागील आशंका ॥ २९ ॥ वायु नव्हता पुरातन। तैसी मूळमाया जाण। साच म्हणतां पुन्हा लीन। होतसे ॥ ३० ॥ वायो रूपें कैसा आहे। तैसी मूळमाया पाहें। भासे परी तें न लाहे। रूप तयेचें ॥ ३१ ॥ वायो सत्य म्हणों जातां। परी तो नये दाखवितां। तयाकडे पाहों जातां। धुळीच दिसे ॥ ३२ ॥ तैसी मूळमाया भासे। भासे परी ते न दिसे। पुढें विस्तारली असे। माया अविद्या ॥ ३३ ॥ जैसें वायोचेनि योगें। दृश्य उडे गगनमार्गें। मूळमायेच्या संयोगें। तैसें जग ॥ ३४ ॥ गगनीं आभाळ नाथिलें। अकस्मात उद्भवलें। मायेचेनि गुणें जालें। तैसें जग ॥ ३५ ॥ नाथिलेंचि गगन नव्हतें। अकस्मात आलें तेथें।

आहे पण तीच मुळीं मिथ्या आहे, पण हें बोलणें स्वानुभवी महात्म्यालाच कळणारें आहे, किंवा हें तिचें अनिर्वाच्यपण एखाद्या भाग्यवंताला सत्संगतींतच उमगणारें आहे. मूळमाया तोच मूळपुरुष, अनंतनामो जगदीश तोच. तीच नामरूपात्मक आहे (२१–२४). आतां 'निराकारीं कैसी जाली। मूळमाया?' ही शंका अजून ज्याला असेल त्याच्या समाधानासाठीं कांहीं बोललें पाहिजे. दृष्टिबंधनें (गारुड्याचे खेळ वगैरे) जेवढीं आहेत तेवढीं मिथ्या असून खेळ तर होत असतात कीं नाहीं? तसाच मूळमायेचा प्रकार आहे. आकाश निश्चळ असून त्यांत चंचळ वायु होतो, तशी निर्गुण निराकार ब्रह्माच्या ठिकाणीं सगुण, साकार व चंचळ माया झाली. वायुरूपामुळें आकाश भंगलें असें होत नाहीं, तसें मूळमायेमुळें निर्गुण ब्रह्माच्या व्यापकत्वाला बाध येत नाहीं. वायु पुरातन नव्हता, तशी मूळमायाहि नाहीं, वायु किंवा मूळमाया सत्य म्हणाल तर वायु आकाशांत व माया ब्रह्मांत लीन होते. वायूचें रूप जसें आहे तसेंच मूळमायेचें आहे. वायु भासतो पण सांपडत नाहीं, तशी माया भासते पण आढळत नाहीं. वायु सत्य म्हणाल तर दाखवितां येत नाहीं, तसाच प्रकार मूळमायेचा, ती भासते पण दिसत नाहीं, माया (शिवाची उपाधि) व अविद्या (जीवाची उपाधि) या उभयरूपांनीं ती विस्तारली आहे. वायूच्या योगानें आकाशांत जसें दृश्य आभाळ उद्भवलेलें दिसतें, तसें मूळमायेपासून जग झालेलें दिसतें. आकाशाच्या ठिकाणीं नसलेले ढग एकाएकीं उद्भवतात तशी ब्रह्मीं लटिकी माया उत्पन्न होते. गगनाची निश्चळता

तैसें दृश्य जालें येथें । तैसियापरी ॥ ३६ ॥ परी त्या आभाळाकरितां । गगनाची गेली निश्चळता । वाटे परी ते तत्वता । तैसीच आहे ॥ ३७ ॥ तैसें मायेकरितां निर्गुण । वाटे जालें सगुण । परी तें पाहातां संपूर्ण । जैसें तैसें ॥ ३८ ॥ आभाळ आलें आणि गेलें । तरी गगन तें संचलें । तैसें गुणा नाहीं आलें । निर्गुण ब्रह्म ॥ ३९ ॥ नभ माथां लागलें दिसे । परी तें जैसें तैसें असे । तैसें जाणावें विश्वासें । निर्गुण ब्रह्म ॥ ४० ॥ ऊर्ध्व पाहातां आकाश । नीळिमा दिसे सावकास । परी तो जाणिजे मिथ्या भास । भासलासे ॥ ४१ ॥ आकाश पालथें घातलें । चहूंकडे आटोपलें । वाटे विश्वास कोंडिलें । परी तें मोकळेंचि असे ॥ ४२ ॥ पर्वतीं निळा रंग दिसे । परी तो तया लागला नसे । अलिप्त जाणावें तैसें । निर्गुण ब्रह्म ॥ ४३ ॥ रथ धांवतां पृथ्वी चंचळ । वाटे परी ते असे निश्चळ । तैसें परब्रह्म केवळ । निर्गुण जाणावें ॥ ४४ ॥ आभाळाकरितां मयंक । वाटे धांवतो निशंक । परी तें अवघें माईक । आभाळ चळे ॥ ४५ ॥ झळे अथवा अग्निज्वाळ । तेणें कंपित दिसे अंतराळ । वाटे परी तें निश्चळ । जैसें तैसें ॥ ४६ ॥ तैसें स्वरूप हें संचलें । असतां वाटे गुणा आलें । ऐसें कल्पनेसि गमलें । परी तें मिथ्या ॥ ४७ ॥ दृष्टिबंधनाचा खेळ । तैसी माया हे चंचळ । वस्तु शाश्वत निश्चळ । जैसी तैसी ॥ ४८ ॥ ऐसी वस्तु निरावेव । माया दाखवी अवेव । ईचा ऐसाच स्वभाव । नाथिलीच हे ॥ ४९ ॥ माया पाहातां मुळींच नसे । परी हे साचाऐसी भासे । उद्भवे आणि निरसे । आभाळ जैसें ॥ ५० ॥ ऐसी माया उद्भवली । वस्तु निर्गुण संचली । अहं ऐसी स्फूर्ति जाली । तेचि माया ॥ ५१ ॥ गुणमायेचे पवाडे । निर्गुणीं हें कांहींच न घडे । परी हें घडे आणी मोडे । सस्वरूपीं ॥ ५२ ॥ जैसी दृष्टी तरळली । तेणें सेनाच भासली ।

ढगांच्या येण्यानें ढळल्यासारखी वाटली तरी तें निश्चळ आहे, तसें मायेच्या योगानें ब्रह्म सगुण व चंचळ झालेंसें वाटतें पण ब्रह्म निश्चळ व निर्गुण आहे तसेंच आहे. आकाश डोक्याला लागल्यासारखें वाटतें पण तें अलिप्त, तसेंच ब्रह्मही मायेनें अस्पृष्ट आहे. आकाशाच्या नीळिमा भासमान आहे सत्य नाहीं. पाण्यांत आकाश पालथें दिसलें कीं वाटतें कीं, आतां जग संपलें पण आकाश आहे तसेंच आहे. पर्वतावर निळा रंग दिसतो पण तो त्याला लागलेला नसतो. रथ धांवतां पृथ्वी चंचल चालतेशी वाटते; पण ती हालत नाहीं तसें परब्रह्म निश्चळ जाणावें. आभाळाबरोबर चंद्र धावतांना दिसतो, झळे म्हणजे उष्ण वारे किंवा अग्निज्वाळा यांनीं अंतराळ कंपित झालेंसें वाटतें, त्याप्रमाणें ब्रह्म सगुण झालेलें वाटतें! पण त्याची निर्गुणता अखंड आहे. दृष्टिबंधनाच्या खेळासारखी माया चंचळ आहे; पण ब्रह्म आहे तसेंच निर्गुण निश्चळ आहे (२५–४९). वस्तु निरावयव असून मायेमुळें सावयव वाटते, मिथ्यामायेचा हा स्वभावच आहे. आकाशांत आभाळ येतें व जातें, तशी माया नसून खऱ्यासारखी भासते. असो. निर्गुण वस्तु संचलेली असतांना मूळमाया अशी उद्भवली. ‘मी एकाकी आहें तो बहुविध व्हावें’ अशी जी अहंस्फूर्ति ती माया. निर्गुणाच्या ठिकाणीं हें कांहींच नाहीं पण गुणमायेच्या योगें घडतें व

पाहातां आकाशींच जाली। परी ते मिथ्या ॥ ५३ ॥ मिथ्या मायेचा खेळ। उद्भव बोलिला सकळ। नाना तत्वांचा पाल्हाळ। सांडूनियां ॥ ५४ ॥ तत्वें मुळींच आहेती। ॐकार वायोची गती। तेथीचा अर्थ जाणती। दक्ष ज्ञानी ॥ ५५ ॥ मूळमायेचें चळण। तेंचि वायोचें लक्षण। सूक्ष्म तत्वें तींनि जाण। जडत्वा पावलीं ॥ ५६ ॥ ऐसीं पंचमहाभूतें। पूर्वीं होतीं अव्यक्तें। पुढें जालीं व्यक्तें। सृष्टिरचनेसी ॥ ५७ ॥ मूळमायेचें लक्षण। तेंचि पंचभूतिक जाण। त्याची पाहे वोळखण। सूक्ष्म दृष्टी ॥ ५८ ॥ आकाशवायोविण। इच्छाशब्द करी कोण। इच्छाशक्ति तेचि जाण। तेजस्वरूप ॥ ५९ ॥ मृदपण तेंचि जळ। जडत्व पृथ्वी केवळ। ऐसी मूळमाया सकळ। पंचभूतिक जाणावी ॥ ६० ॥ येक येक भूतांपोटीं। पंचभूतांची राहाटी। सर्व कळे सूक्ष्म दृष्टी। घालून पाहातां ॥ ६१ ॥ पुढें जडत्वास आलीं। तरी असतीं कालवलीं। ऐसी माया विस्तारली। पंचभूतिक ॥ ६२ ॥ मूळमाया पाहातां मूळीं। अथवा अविद्या भूमंडळीं। स्वर्ग मृत्य पाताळीं। पांचचि भूतें ॥ ६३ ॥

॥ श्लोक ॥ स्वर्गे मृत्यौ पाताले वा यत्किंचित्सचराचरम्। सर्वं पंचभूतकं राम षष्ठं किंचिन्न दृश्यते ॥

सत्य स्वरूप आदिअंतीं। मध्यें पंचभूतें वर्तती। पंचभूतिक जाणिजे श्रोतीं। मूळमाया ॥ ६४ ॥ येथें उठिली आशंका। सावध होऊन ऐका। पंचभूतें जालीं येका। तमोगुणापासुनी ॥ ६५ ॥ मूळमाया गुणापरती। तेथें भूतें कैचीं होतीं। ऐसी आशंका हे श्रोतीं। घेतली मागां ॥ ६६ ॥ ऐसें श्रोतीं आक्षेपिलें। संशयास उभें केलें। याचें उत्तर दिधलें। पुढिले समासीं ॥ ६७ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सूक्ष्मआशंकानाम समास तृतीय ॥ ३ ॥

मोडतें. दृष्टि चंचळ झाली. आकाशांत नसून सेना (गंधर्व नगरी) दिसते पण ती तेथें नसते (५०–५३). मायेचा व तिजपासून गुणमायेचा व तत्त्वांचा पाल्हाळ सांगण्यांत येतो पण हा सारा मिथ्या मायेचा खेळ आहे. तत्त्वें मूळमायेच्या ठिकाणींच आहेत, तीं मागून प्रगट झालीं असें नाहीं – त्रिगुणपंचभूतें हीं सर्व मूळमायेंतच बीजरूपानें आहेत. ‘ तत्त्वें मूळींच (मूळमायेंतच) आहेत.’ ॐ हा शब्द आकाशांत उत्पन्न झाला (शब्द हा आकाशाचा गुण आहे) म्हणून ‘ ओंकार वायूची गती,’ वायूचें चळण हाच ओंकार. मूळमायेचें चळण तोच वायु – सूक्ष्म तत्त्वें तेथेंच बीजरूपानें असलेलीं जडरूपाला येतात. याप्रमाणें मूळमायाच पंचभूतात्मक आहे – मात्र तींत असलेलीं सूक्ष्मभूतें पुढें व्यक्त होऊन सृष्टिरचनेच्या कार्यास येतात. आकाशांत वायूवांचून इच्छा शब्द झाला नाहीं, इच्छाशक्ति तेजोरूप आहे, तेजांतलें मृदुत्व तोच जळांश व जडत्व ती पृथ्वी – या दृष्टीनें मूळमायेंतच पंचभूतें सूक्ष्म आहेत म्हणून मूळमायाच पंचभौतिक आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश हीं पंचभूतें अगदीं पृथक् नव्हत, तर यांपैकीं एकेक भूतांत पांचही भूतें आहेत. सूक्ष्मदृष्टीनें हें पहावें. पुढें भूतें जडत्वास येतात पण कालवलेलींच असतात. मूळमाया मूळांतच पंचभौतिक आहे, तीच अविद्येच्या रूपानें अवतरली तरी पंचभौतिकच आहे. स्वर्ग, मृत्यु, पाताळ – त्रैलोक्यांत धुंडून पाहिलें तरी पंचभूतांचाच खेळ दिसतो. मूळमाया पंचभौतिकांमध्येंच दिसते, आदि अंतीं सत्यस्वरूप संचलेलें आहे (५४–६४). येथें प्रश्न उद्भवला;—पंचभूतें तमोगुणापासून निघालीं व तो गुण (म्ह० तीनही गुण) तर मागूनचे, मूळमाया गुणांपलीकडची आहे, मग तेथें गुण कसे आले याचें उत्तर ऐका (६५–६७). [द० ८, स० ३]

॥ श्रीराम ॥ मागील आशंकेचें मूळ । आतां होईल प्रांजळ । वृत्ति करावी निवळ । निमिष येक ॥ १ ॥ ब्रह्मीं मूळमाया जाली । तिच्या पोटीं माया आली । मग ते गुणा प्रसवली । म्हणोनि गुणक्षोभिणी ॥ २ ॥ पुढें तिजपासाव कोण । सत्वरजतमोगुण । तमोगुणापासून निर्माण । जालीं पंचभूतें ॥ ३ ॥ ऐसीं भूतें उद्भवलीं । पुढें तत्वें विस्तारलीं । एवं तमोगुणापासून जालीं । पंचमहाभूतें ॥ ४ ॥ मूळमाया गुणापरती । तेथें भूतें कैंचीं होतीं । ऐसी आशंका हे श्रोतीं । घेतली मागां ॥ ५ ॥ आणीक येक येके भूतीं । पंचभूतें असती । तेहि आतां कैसी स्थिती । प्रांजळ करूं ॥ ६ ॥ सूक्ष्मदृष्टीचें कौतुक । मूळमाया पंचभूतिक । श्रोतीं विमळ विवेक । केला पाहिजे ॥ ७ ॥ आधीं भूतें तों जाणावीं । रूपें कैसीं वोळखावीं । मग तें शोधून पाहावीं । सूक्ष्मदृष्टीं ॥८॥ वोळखी नाहीं अंतरीं । ते वोळखावी कोणेपरी । म्हणोनि भूतांची वोळखी चतुरीं । नावेक परिसावी ॥ ९ ॥ जें जें जड आणी कठिण । तें तें पृथ्वीचें लक्षण । मृद आणी वोलेपण । तितुकें आप ॥ १० ॥ जें जें उष्ण आणी सतेज । तें तें जाणावें पैं तेज । आतां वायोही सहज । निरोपिजेल ॥ ११ ॥ चैतन्य आणी चंचळ । तो हा वायोचि केवळ । शून्य आकाश निश्चय । आकाश जाणावें ॥ १२ ॥ ऐसीं पंचमहाभूतें । वोळखी धरावी संकेतें । आतां येकीं पांच भूतें । सावध ऐका ॥ १३ ॥ जें त्रिगुणाहूनि पर । त्याचा सूक्ष्म विचार । यालागीं अतितत्पर । होऊन ऐका ॥ १४ ॥ सूक्ष्म आकाशीं कैसी पृथ्वी । तेचि आधीं निरोपावी । येथें धारणा धरावी । श्रोतेजनीं ॥ १५ ॥ आकाश म्हणजे अवकाश शून्य । शून्य म्हणिजे तें अज्ञान । अज्ञान म्हणिजे जडत्व जाण । तेचि पृथ्वी ॥ १६ ॥ आकाश स्वयें

ब्रह्मीं मूळमाया झाली हा विचार सांगितला. मूळमायाच पुढें गुणांना प्रसवती झाली म्हणून गुणक्षोभिणी नाम पावली. गुणमायेपासून सत्वरजतम हे त्रिगुण कोण म्ह० उत्पन्न झाले (कोण हें भूतकालवाचक क्रियापद आहे. औरंगाबाद अगर नगरच्या सीमेवर हा शब्दप्रयोग रूढ आहे तिकडे कोण निघाली = बाळंतीण झाली). व तमोगुणापासून पंचभूतें निर्माण झालीं. तमोगुणापासून सूक्ष्म पंचभूतें झालीं व तींच पुढें सृष्टिरूपानें जडत्व पावलीं (१–४). मूळमाया गुणापरती आहे मग तेथें पंचभूतें कशीं झालीं अशी शंका निघाली होती त्याचा विचार करूं. प्रत्येक भूतांत पांचही भूतें असतात याचाही विचार करूं. मूळमायेंत पंचभूतें कशीं आहेत याचा विचार करूं. पंचभूतांचीं रूपें काय आहेत तीं पहावींत (५–९). जड आणि कठिण ती पृथ्वी; मृदु आणि ओलें तें आप; उष्ण आणि सतेज तो अग्नि; चैतन्य आणि चंचळ तो वायु; व शून्य आणि निश्चळ तें आकाश हीं पंचभूतांचीं लक्षणें लक्षांत ठेवावीं. आतां प्रत्येक भूतांत बाकीचीं भूतें कशीं तें पहा. मूळमाया त्रिगुणातीत आहे म्हणून हा विचार अति सूक्ष्म आहे (१०–१४). १ आकाशांत पंचभूतें — आकाश म्हणजे अवकाश, शून्य; शून्य म्हणजे अज्ञान; 'अज्ञान म्हणजे जडत्व जाण । तेचि पृथ्वी;' आकाश स्वयें मृदु आहे व

आहे मृद । तेंचि आप स्वतः सिद्ध । आतां तेज तेंहि विशद । करून दावूं ॥ १७ ॥ अज्ञानें भासला भास । तोचि तेजाचा प्रकाश । आतां वायो सावकाश । साकल्य सांगों ॥ १८ ॥ वायुआकाशा नाहीं भेद । आकाशाइतुका असे स्तब्ध । तथापी आकाशीं जो निरोध । तोचि वायो ॥ १९ ॥ आकाशीं आकाश मिसळलें । हें तों नलगे कीं बोलिलें । येणें प्रकारें निरोपिलें । आकाश पंचभूत ॥ २० ॥ वायोमध्यें पंचभूतें । तेंहि ऐका येक चित्तें । बोलिजेती तें समस्तें । यथान्वयें ॥ २१ ॥ हळु फूल तरी जड । हळु वारी तरी निबिड । वायो लागतां कडाड । मोडती झाडें ॥ २२ ॥ तोलेंविण झाड मोडे । ऐसें हें कहिंच न घडे । तोल तोचि तये जडे । पृथ्वीचा अंश ॥ २३ ॥ येथें श्रोते आशंका घेती । तेथें कैचीं झाडें होतीं । झाडें नव्हतीं तरी शक्ती । कठिणरूप आहे ॥ २४ ॥ वन्हीस्फुलिंग लहान । कांहीं तऱ्हीं असे उष्ण । तैसें सूक्ष्मीं जडपण । सूक्ष्मरूपें ॥ २५ ॥ मृदपण तेंचि आप । भासे तेजाचें स्वरूप । वायो तेथें चंचळरूप । सहजचि आहे ॥ २६ ॥ सकळांस मिळोन आकाश । सहजचि आहे अवकाश । पंचभूतांचे अंश । वायोमध्यें निरोपिले ॥ २७ ॥ आतां तेजाचें लक्षण । भासलेंपण तें कठिण । तेजीं ऐसी वोळखण । पृथ्वीयेची ॥ २८ ॥ भासला भास वाटे मृद । तेजीं आप तेंचि प्रसिद्ध । तेजीं तेज स्वतः सिद्ध । सांगणेंचि नलगे ॥ २९ ॥ तेजीं वायो तो चंचळ । तेजीं आकाश निश्चळ । तेजीं पंचभूतें सकळ । निरोपिलीं ॥ ३० ॥ आतां आपाचें लक्षण । आप तेंचि जें मृदपण । मृदपण ते कठिण । तेचि पृथ्वी ॥ ३१ ॥ आपीं आप सहजचि असे । तेज मृदपणें भासे । वायो स्तब्धपणें दिसे । मृदत्वाआंगीं ॥ ३२ ॥ आकाश नलगे सांगावें । तें व्यापकचि स्वभावें । आपीं पंचभूतांचीं नांवें । सूक्ष्में निरोपिलीं ॥ ३३ ॥ आतां पृथ्वीचें लक्षण ।

मृदुत्व हें आपाचें लक्षण असल्यामुळें आकाशांत आप आहे. ' अज्ञानें भासला भास । तोचि तेजाचा प्रकाश ' म्हणून आकाशांत तेज आहे. ' वायु आकाशा भेद नाहीं, दोनी स्तब्ध,' तथापि आकाशीं जो निरोध । तोचि वायु. ' आकाशीं आकाश मिसळलें आहे हें सांगणेंच नको. याप्रमाणें आकाशांत पांचही भूतें आहेत (१५–२०). २ **वायुपंचभूतें**—वायु लागतां कडाडा झाडें मोडतात त्यांत तोल तो पृथ्वीचा अंश, अथवा वायूच्या ठिकाणीं शक्ति आहे, शक्ति म्ह. काठिण्य तोच पृथ्वीचा अंश. सूक्ष्मांतलें हें जडपण सूक्ष्मरूपानेंच घ्यायचें आहे. वायूंत मृदुपण आहे तें आप, भास आहे तें तेज वायु चंचळरूपानें सहजच आहे. सकळांस मिळोन आकाश आहेच (२१–२७). ३ **तेजपंचभूतें**—भास तो कठिणपण अर्थात् पृथ्वी ; भासांत मृदुत्व तें आप ; तेजांत तेज सहजच आहे. तेजीं वायु चंचळ, आकाश निश्चळ आहेच (२८–३०). ४ **आपपंचभूतें**–आपाचें मृदुत्व तें कठिण - पृथ्वी आपीं आप सहजचि असे । तेज मृदुपणें भासे । वायु स्तब्धपणें दिसे । मृदुत्वाआंगीं ' आकाश व्यापक सर्वांत आहेच (३१–३३). ५ **पृथ्वीपंचभूतें**–कठिण ते पृथ्वी. कठिणत्वीं मृदुपण तें

कठिण पृथ्वी आपण । कठिणत्वीं मृदपण । तेंचि आप ॥ ३४ ॥ कठिणत्वाचा जो भास । तोचि तेजाचा प्रकाश । कठिणत्वीं निरोधांश । तोचि वायो ॥ ३५ ॥ आकाश सकळांस व्यापक । हा तों प्रगटचि विवेक । आकाशींच कांहीं येक । भास भासे ॥ ३६ ॥ आकाश तोडितां तुटेना । आकाश फोडितां फुटेना । आकाश परतें होयेना । तिळमात्र ॥३७ ॥ असो आतां पृथ्वीआंत । दाविला भूतांचा संकेत । येक भूतीं पंचभूत । तेंहि निरोपिलें ॥ ३८ ॥ परी हें आहाच पाहातां नातुडे । बळेंचि पोटीं संदेह पडे । भ्रांतिरूपें अहंता चढे । अकस्मात ॥ ३९ ॥ सूक्ष्मदृष्टीनें पाहातां । वायोचि वाटे तत्वतां । सूक्ष्म वायो शोधूं जातां । पंचभूतें दिसती ॥ ४० ॥ एवं पंचभूतिक पवन । तेचि मूळमाया जाण । माया आणी सूक्ष्म त्रिगुण । तेहि पंचभूतिक ॥ ४१ ॥ भूतें गुण मेळिविजे । त्यासी अष्टधा बोलिजे । पंचभूतिक जाणिजे । अष्टधा प्रकृती ॥ ४२ ॥ शोधून पाहिल्यावीण । संदेह धरणें मूर्खपण । याची पाहावी वोळखण । सूक्ष्मदृष्टी ॥ ४३ ॥ गुणापासुनी भूतें । पावलीं स्पष्ट दशेतें । जडत्वा येऊन समस्तें । तत्वें जालीं ॥ ४४ ॥ पुढें तत्वविवंचना । पिंडब्रह्मांड तत्वरचना । बोलिली असे ते जना । प्रगटचि आहे ॥ ४५ ॥ हा भूतकर्दम बोलिला । सूक्ष्म संकेतें दाविला । ब्रह्मगोळ उभारला । तत्पूर्वीं ॥ ४६ ॥ या ब्रह्मांडापैलीकडील गोष्टी । जें जाली नव्हती सृष्टी । मूळमाया सूक्ष्मदृष्टीं । वोळखावी ॥ ४७ ॥ सप्तकंचुक प्रचंड । जालें नव्हतें ब्रह्मांड । मायेअविद्येचें बंड । ऐलीकडे ॥ ४८ ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर । हा ऐलीकडिल विचार । पृथ्वी मेरु सप्त सागर । ऐलीकडे ॥ ४९ ॥ नाना लोक नाना स्थानें । चंद्र सूर्य तारांगणें । सप्त द्वीपें चौदा भुवनें । ऐलीकडे ॥ ५० ॥ शेष कूर्म सप्त पाताळ । येकविस स्वर्गें अष्ट दिक्पाळ । तेतिस कोटी देव सकळ । ऐलीकडे ॥ ५१ ॥ बारा आदित्य अक्रा रूद्र । नव नाग सप्त ऋषेश्वर । नाना देवांचे अवतार ।

आप. कठिणत्वाचा भास तें तेज. कठिणत्वीं निरोधांश तो वायु. आकाश आहेच (३४–३८). प्रत्येक भूतांत पंचभूतें कशीं आहेत तें सांगितलें, सूक्ष्म पंचभूतांचें हें निरूपण झालें. वायु सूक्ष्मपणें पाहिला तर पंचभौतिक आहे, तीच मूळमाया. सूक्ष्म त्रिगुण व सूक्ष्म पंचभौतिक म्ह. मूळमाया मिळून अष्टधा प्रकृति. तिचा सूक्ष्म दृष्टीनें विचार पहावा, मूळमायेंत पंचभूतें सूक्ष्मरूपानें आहेत. तिच्यापासून गुणमाया (त्रिगुण) हेही प्रथम सूक्ष्म व नंतर क्रमानें स्पष्ट झालें ; पुढें नाना तत्वें निर्माण होऊन पिंडब्रह्मांडात्मक स्थूल सृष्टिरचना झाली. मूळमायेंत पंचभूतांचा कर्दम झाल्याचें वर सांगितलें आहे, तो सूक्ष्म कर्दम ब्रह्मांडगोल उभारण्यापूर्वींचा आहे. तेव्हां सप्तकंचुक ब्रह्मांड (सप्तसागर, सप्तभुवनें, सप्तरस इ०) झालें नव्हतें. माया अविद्या, जीवशिव, ब्रह्माविष्णुहर, नाना लोक, नाना स्थानें, सप्तपाताळ, एकवीस स्वर्ग, तेहतीस कोटि देव (आठ वसु ऊर्फ दिक्पाळ, बारा आदित्य, अकरा रुद्र, प्रजापति व वषट्कार मिळून तेहतीस), मेघ, मनु, नाना देवांचे अवतार, नाना

ऐलीकडे ॥ ५२ ॥ मेघ मनु चक्रवर्ती । नाना जीवांची उत्पत्ती । आतां असो सांगों किती । विस्तार हा ॥ ५३ ॥ सकळ विस्ताराचें मूळ । ते मूळमायाच केवळ । मागां निरोपिली सकळ । पंचभूतिक ॥ ५४ ॥ सूक्ष्मभूतें जीं बोलिलीं । तींचि पुढें जडत्वा आलीं । तीं सकळही बोलिलीं । पुढिले समासीं ॥ ५५ ॥ पंचभूतें पृथगाकारें । पुढें निरोपिलीं विस्तारें । वोळखीकारणें अत्यादरें । श्रोतीं श्रवण करावीं ॥ ५६ ॥ पंचभूतिक ब्रह्मगोळ । जेणें कळे हा प्रांजळ । दृश्य सांडून केवळ । वस्तुच पाविजे ॥ ५७ ॥ महाद्वार वोलांडावें । मग देवदर्शन घ्यावें । तैसें दृश्य हें सांडावें । जाणोनियां ॥ ५८ ॥ म्हणोनि दृश्याचे पोटीं । आहे पंचभूतांची दाटी । येकपणें पडिली मिठी । दृश्य पंचभूतां ॥ ५९ ॥ एवं पंचभूतांचेंचि दृश्य । सृष्टी रचली सावकास । श्रोतीं करून अवकाश । श्रवण करावें ॥ ६० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सूक्ष्मपंचभूतेंनिरूपणनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ केवळ मूर्ख तें नेणे । म्हणौन लागलें सांगणें । पंचभूतांचीं लक्षणें । विशद करूनि ॥ १ ॥ पंचभूतांचा कर्दम जाला । आतां नवचे वेगळा केला । परंतु कांहीं येक वेगळाला । करून दावूं ॥ २ ॥ पर्वत पाषाण शिळा शिखरें । नाना वर्णें लाहान थोरें । खडे गुंडे बहु प्रकारें । जाणिजे पृथ्वी ॥ ३ ॥ नाना रंगांची मृत्तिका । नाना स्थळोस्थळीं जे कां । वाळुकें वाळु अनेका । मिळोन पृथ्वी ॥ ४ ॥ पुरें पट्टणें मनोहरें । नाना मंदिरें दामोदरें । नाना देवाळयें शिखरें । मिळोन पृथ्वी ॥ ५ ॥ सप्त द्वीपावती पृथ्वी । काय म्हणौनि सांगावी । नव खंडें मिळोन जाणावी । वसुंधरा ॥ ६ ॥ नाना देव नाना नृपती । नाना भाषा नाना रिती । लक्ष चौऱ्यासी उत्पत्ती । मिळोन पृथ्वी ॥ ७ ॥ नाना उद्वसें जें बनें । नाना तरुवरांचीं बनें ।

प्रकारचे जीव हे सर्व तेव्हां निर्माण झाले नव्हते ; म्हणून सकळ विस्ताराचें मूळ सूक्ष्मपंचभूतात्मक मूळमायाच होय. हीं सूक्ष्मभूतेंच पुढें जडत्वाला येऊन हा ब्रह्मगोळ उभारला. तो विचार पुढें सांगूं. मूळमाया हें महाद्वार ओलांडलें म्ह० मूळमायेच्या पलीकडे जावें, दृश्यातीत व्हावें तेव्हांच देवदर्शन होतें ! दृश्याच्या पोटीं पंचभूतांची दाटी पडली आहे, दृश्य व पंचभूतें एकच आहेत व तीच सृष्टि हें दृश्य सांडून वस्तु गांठावी (३९–६०). [द० ८, स० ४].

आतां स्थूल पंचमहाभूतांचें वर्णन करून त्यांतच आकाश व स्वरूप यांत काय भेद आहे तो दाखवूं. पंचभूतांचा मूळमायेंतच कर्दम झाला आहे तेव्हां स्थूल पंचभूतांत तो झाला आहे हें सांगायला नकोच. कोणतेंही भूत अगदीं पृथक् असें सांपडायचेंच नाहीं. तथापि सामान्य जनांच्या समजुतीसाठीं पांचही भूतांचें वर्णन करून सांगतों (१–२). (१) पृथ्वी — जडांश आणि कठिनांश तो पृथ्वीचा भाग. पर्वत, पाषाण, शिळा, शिखरें, नाना रंगाची मृत्तिका व वाळू : पुरें, पट्टणें, मंदिरें – तशींच ओसाड वनें – फार काय नवखंडें, सप्त द्वीपवती पृथ्वी ही पृथ्वीच – ' नाना रचना केली देवीं ।

गिरीकंदरें नाना स्थानें । मिळोन पृथ्वी ॥ ८ ॥ नाना रचना केली देवीं । जे जे निर्मिली मानवीं । सकळ मिळोन पृथ्वी । जाणिजे श्रोतीं ॥ ९ ॥ नाना धातु सुवर्णादिक । नाना रत्नें जे अनेक । नाना काष्ठवृक्षादिक । मिळोन पृथ्वी ॥ १० ॥ आतां असो हें बहुवस । जडांश आणी कठिनांश । सकळ पृथ्वी हा विश्वास । मानिला पाहिजे ॥ ११ ॥ बोलिलें पृथ्वीचें रूप । आतां सांगिजेल आप । श्रोतीं वोळखावें रूप । सावध होउनी ॥ १२ ॥ वापी कूप सरोवर । नाना सरितांचें जें नीर । मेघ आणी सप्त सागर । मिळोन आप ॥ १३ ॥

श्लोकार्ध—क्षारक्षीरसुरासर्पिर्दधि इक्षुर्जलं तथा ॥

क्षारसमुद्र दिसताहे । सकळ जन दृष्टीस पाहे । जेथें लवण होताहे । तोचि क्षारसिंधु ॥ १४ ॥ येक दुधाचा सागर । त्या नांव क्षीरसागर । देवें दिधला निरंतर । उपमन्यूसी ॥ १५ ॥ येक समुद्र मद्याचा । येक जाणावा घृताचा । येक निखळ दह्याचा । समुद्र असे ॥ १६ ॥ येक उसाच्या रसाचा । येक तो शुद्ध जळाचा । ऐसा सातां समुद्रांचा । वेढा पृथ्वीयेसी ॥ १७ ॥ एवं भूमंडळींचें जळ । नाना स्थळींचें सकळ । मिळोन अवघें केवळ । आप जाणावें ॥ १८ ॥ पृथ्वीगर्भी कितियेक । पृथ्वीतळीं आवर्णोदक । तिहीं लोकींचें उदक । मिळोन आप ॥ १९ ॥ नाना वल्ली बहुवस । नाना तरुवरांचे रस । मध पारा अमृत विष । मिळोन आप ॥ २० ॥ नाना रस स्नेहादिक । याहि वेगळे अनेक । जळावेगळें अवश्यक । आप बोलिजे ॥ २१ ॥ सार्द्र आणी सीतळ । जळासारिखें पातळ । शुक्लीत शोणीत मूत्र लाळ । आप बोलिजे ॥ २२ ॥ आप संकेतें जाणावें । पातळ वोलें वोळखावें । मृद सीतळ स्वभावें । आप बोलिजे ॥ २३ ॥ जाला आपाचा संकेत । पातळ मृद गुळगुळित । स्वेद श्लेष्मा अश्रु समस्त । आप जाणावें ॥ २४ ॥ तेज ऐका सावधपणें । चंद्र सूर्य तारांगणें । दिव्य देह सतेजपणें । तेज बोलिजे ॥ २५ ॥ वन्ही मेघीं विद्युल्लता । वन्ही सृष्टी संव्हारिता । वन्ही सागरा जाळिता । वडवानळु ॥ २६ ॥

जे जे निर्मिलीं मानवीं ' ती सकळ पृथ्वीसुवर्णादि धातु, नाना रत्नें, नाना काष्ठवृक्षादिक मिळोन पृथ्वी. तात्पर्य, जडांश आणि कठिनांश तो सर्व पृथ्वीचा अंश (३-११). (२) आप – वापी, कूप, सरोवरें, नाना सरिता, सप्तसागर व मेघ मिळोन आप. ज्यांत लवण होतें तो क्षारसिंधु, दुधाचा सागर तो क्षीरसिंधु, त्याचप्रमाणें मद्य, घृत, दहीं, उसांचा रस व शुद्ध जळ ' ऐसा सातासमुद्रांचा वेढा पृथ्वियेसी ' हें सर्व आप. कांहीं जळ पृथ्वीच्या पोटांत आहे, कांहीं पृथ्वीवर पसरलें आहे; त्याचप्रमाणें ' नानावल्ली बहुरस । नाना तरुवरांचे रस । मध पारा अमृत विष । मिळोन आप. तेलादिरस आपच होय. तात्पर्य, पातळ, ओलें, मृदु, शीतळ हे गुण ज्यांत आहेत तें सारें आप. शुक्र, शोणित, मूत्र, लाळ, स्वेद, श्लेष्मा, अश्रु, हें सारें आप. (१२-२३). (३) तेज – चंद्रसूर्यतारांगणें, दिव्य सतेज देह, आकाशांतली वीज व समुद्रांतला वडवानळ, शंकर-

वन्ही शंकराचे नेत्रींचा । वन्ही काळाचे क्षुधेचा । वन्ही परीघ भूगोलाचा । तेज बोलिजे ॥ २७ ॥ जें जें प्रकाशरूप । तें तें तेजाचें स्वरूप । शोषक उष्णादि आरोप । तेज जाणावें ॥ २८ ॥ वायो जाणावा चंचळ । चैतन्य चेतवी केवळ । बोलणें चालणें सकळ । वायोमुळें ॥ २९ ॥ हाले डोले तितुका पवन । कांहीं न चले पवनेंविण । सृष्टी चाळाया कारण । मूळ तो वायो ॥ ३० ॥ चळण वळण आणी प्रसारण । निरोध आणी आकुंचन । सकळ जाणावा पवन । चंचळरूपी ॥ ३१ ॥ प्राण अपान आणी व्यान । चौथा उदान आणी समान । नाग कूर्म कर्कश जाण । देवदत्त धनंजय ॥ ३२ ॥ जितुकें कांहीं होतें चळण । तितुकें वायोचें लक्षण । चंद्र सूर्य तारांगण । वायोचि धर्ता ॥ ३३ ॥ आकाश जाणावें पोकळ । निर्मळ आणि निश्चळ । अवकाशरूप सकळ । आकाश जाणावें ॥ ३४ ॥ आकाश सकळांस व्यापक । आकाश अनेकीं येक । आकाशामध्यें कौतुक । चहूं भूतांचें ॥ ३५ ॥ आकाशाऐसें नाहीं सार । आकाश सकळांहून थोर । पाहातां आकाशाचा विचार । स्वरूपासारिखा ॥ ३६ ॥ तंव शिष्यें केला आक्षेप । दोहींचें सारिखेंचि रूप । तरी आकाशचि स्वरूप । कां म्हणों नये ॥ ३७ ॥ आकाश-स्वरूपा कोण भेद । पाहातां दिसती अभेद । आकाश वस्तुच स्वतःसिद्ध । कां न म्हणावी ॥ ३८ ॥ वस्तु अचळ अढळ । वस्तु निर्मळ निश्चळ । तैसेंचि आकाश केवळ । वस्तुसारिखें ॥ ३९ ॥ ऐकोनि वक्ता बोले वचन । वस्तु निर्गुण पुरातन । आकाशाआंगीं सप्त गुण । शास्त्रीं निरोपिले ॥ ४० ॥ काम क्रोध शोक मोहो । भय अज्ञान शून्यत्व पाहो । ऐसा सप्तविध स्वभावो ।

नेत्रींचा वन्हि, क्षुधाग्नि हें सर्व तेज जाणावें. 'जें जें प्रकाशरूप । तें तें तेजाचें स्वरूप,' शोषक उष्ण तें तेज (२४–२८). (४) वायु–वायु म्ह० चंचळ. 'चैतन्य चेतवी केवळ,' हाले डोले तितुका पवन । कांहीं न चले पवनेंविण । सृष्टि चाळाया कारण । मूळ तो वायु;' चळण, वळण, प्रसारण, निरोध व आकुंचन हा सगळा वायु. प्राण, अपान, व्यान, उदान व समान हे पांच प्राण व नाग, कूर्म, कृकल, देवदत्त व धनंजय हे पांच उपप्राण हा सर्व वायुच. चंद्रसूर्यतारांगणांना धारणाकर्ता वायुच. तात्पर्य, 'जितुकें कांहीं होतें चळण । तितुकें वायूचें लक्षण.' (२९–३३). (५) आकाश—पोकळ, निर्मळ आणि निश्चळ तें आकाश. वरील चारही भूतांचें कौतुक सारें आकाशांत आहे. 'आकाशाऐसें नाहीं सार । आकाश सकळांहून थोर । पाहतां आकाशाचा विचार । स्वरूपासारिखा' (३४–३६). आकाश आणि परब्रह्म—आकाश परब्रह्मासारखेंच अचळ, अढळ, निर्मळ व निश्चळ आहे, मग आकाशालाच परब्रह्म कां म्हणूं नये ? उत्तर—वस्तु निर्गुण

१ प्राणवायूचें स्थान हृदय आहे. अष्टप्रहरांत २१६०० इतके याचे श्वासोच्छ्वास होतात. अपानवायूचें स्थान गुद, मलमूत्रोत्सर्गरूप क्रिया हा करितो. उदानवायूचें स्थान कंठ हें आहे, अन्नजलाचे विभाग करणें व स्वप्नदर्शनादि कार्य हा करितो. व्यानवायु सर्वांगांत आहे, शरीरांतील संधींतून हा आपलें काम करितो. समानवायूचें स्थान नाभि आहे, हा अन्नरस सर्व शरीरांत पोंचवितो. नाग = ढेकर, कूर्म = निमेषोन्मेष, कृकल = शिंक, देवदत्त = जांभई, धनंजय = देहपुष्टि.

आकाशाचा ॥ ४१ ॥ ऐसें शास्त्राधारें बोलिलें । म्हणोनि आकाश भूत जालें । स्वरूप निर्विकार संचलें । उपमेरहित ॥ ४२ ॥ काचबंदि आणि जळ । सारिखेंच वाटे सकळ । परी येक काच येक जळ । शाहाणे जाणती ॥ ४३ ॥ रुवामध्यें स्फटिक पडिला । लोकीं तद्रूप देखिला । तेणें कपाळमोक्ष जाला । कापुस न करी ॥ ४४ ॥ तंदुलामध्यें श्वेत खडे । तंदुलासारिखेच वांकुडे । चावूं जातां दांत पडे । तेव्हां कळे ॥ ४५ ॥ त्रिभागामध्यें खडा असे । त्रिभागासारिखाच भासे । शोधूं जातां वेगळा दिसे । कठिणपणें ॥ ४६ ॥ गुळासारिखा गुळ दगड । परी तो कठिण निचाड । नागकांडी आणि वेखंड । येक म्हणों नये ॥ ४७ ॥ सोनें आणि सोनपितळ । येकचि वाटती केवळ । परी पितळेसी मिळतां ज्वाळ । काळिमा चढे ॥ ४८ ॥ असो हे हीन दृष्टांत । आकाश म्हणिजे केवळ भूत । तें भूत आणी अनंत । येक कैसें ॥ ४९ ॥ वस्तुसी वर्णचि नसे । आकाश श्यामवर्ण असे । दोहींस साम्यता कैसे । करती विचक्षण ॥ ५० ॥ श्रोते म्हणती कैचें रूप । आकाश ठाईचें अरूप । आकाश वस्तुच तद्रूप । भेद नाहीं ॥ ५१ ॥ चहूं भूतांस नाश आहे । आकाश कैसें नासताहे । आकाशस न साहे । वर्णव्यक्तीविकार ॥ ५२ ॥ आकाश अचळ दिसतें । त्याचें काये नासों पाहातें । पाहातां आमुचेनि मतें । आकाश शाश्वत ॥ ५३ ॥ ऐसें ऐकोन वचन । वक्ता बोले प्रतिवचन । ऐक आतां लक्षण । आकाशाचें ॥ ५४ ॥ आकाश तमापासून जालें । म्हणोन कामक्रोधें वेष्टिलें । अज्ञान शून्यत्व बोलिलें । नाम तयाचें ॥ ५५ ॥ अज्ञानें कामक्रोधादिक । मोहो भये आणि शोक । हा अज्ञानाचा विवेक । आकाशगुणें ॥ ५६ ॥ नास्तिक नकारवचन । तेंचि शून्याचें लक्षण । तयास म्हणती हृदयशून्य । अज्ञान प्राणी ॥ ५७ ॥ आकाश स्तब्धपणें शून्य । शून्य म्हणिजे तें अज्ञान । अज्ञान म्हणिजे कठिण । रूप तयाचें ॥ ५८ ॥ कठिण शून्य विकारवंत । तयास कैसें म्हणावें संत । मनास वाटे हें तद्वत । आहाच दृष्टी ॥ ५९ ॥ अज्ञान

आहे व आकाशाचे अंगीं सप्तगुण आहेत. काम, क्रोध, शोक, मोह, भय, अज्ञान व शून्यत्व असा आकाशाचा सप्तविध स्वभाव आहे. शास्त्रांनींच आकाशाचे सात गुण सांगितले आहेत म्हणून आकाश भूत आहे व स्वरूप निर्विकार आहे असा त्यांत भेद असल्यामुळें आकाशाला ब्रह्म म्हणतां येत नाहीं. तांदुळ व पांढरे खडे, स्फटिक व रू (कापूस), जळ व कांच-बंदी (कांच बसविलेली जमीन) गूळ व गूळदगड, सोनें व सोनपितळ सारखें दिसलें म्हणून त्यांची साम्यता थोडीच होणार आहे ! आकाश म्हणजे भूत व ' भूत आणि अनंत एक कैसें ? ' शिवाय ' वस्तूसी वर्णचि नसे । आकाश श्यामवर्ण

कालवलें आकाशीं । तया कर्दमा ज्ञान नासी । म्हणोनियां आकाशासी । नाश आहे ॥ ६० ॥ तैसें आकाश आणि स्वरूप । पाहातां वाटती येकरूप । परी दोहींमध्यें विक्षेप । शून्यत्वाचा ॥ ६१ ॥ आहाच पाहातां कल्पनेसी । सारिखेंच वाटे निश्चयेंसी । परी आकाश स्वरूपासी । भेद आहे ॥ ६२ ॥ उन्मनी आणि सुषुप्ति अवस्था । सारिखेच वाटे तत्वता । परी विवंचून पाहों जातां । भेद आहे ॥ ६३ ॥ खोटें खऱ्यासारिखें भाविती । परी परीक्षवंत निवाडिती । कां कुरंगें देखोन भुलती । मृगजळासी ॥ ६४ ॥ आतां असो हा दृष्टांत । बोलिला कळाया संकेत । म्हणोनि भूत आणी अनंत । एक नव्हेती ॥ ६५ ॥ आकाश वेगळेपणें पाहावें । स्वरूपीं स्वरूपचि व्हावें । वस्तूचें पाहाणें स्वभावें । ऐसें असे ॥ ६६ ॥ येथें आशंका फिटली । संदेहवृत्ती मावळली । भिन्नपणें नवचे अनुभवली । स्वरूपस्थिती ॥ ६७ ॥ आकाश अनुभवा येतें । स्वरूप अनुभवापरतें । म्हणोनियां आकाशातें । साम्यता न घडे ॥ ६८ ॥ दुग्धासारिखा जळांश । निवडूं जाणती राजहंस । तैसें स्वरूप आणी आकाश । संत जाणती ॥ ६९ ॥ सकळ माया गथागोवी । संतसंगें हे उगवावी । पाविजे मोक्षाची पदवी । सत्समागमें ॥ ७० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे स्थूळपंचमहाभूतेंस्वरूपाकाशभेदो नाम समास पंचम ॥ ५ ॥

॥ श्रीराम ॥ श्रोता विनवी वक्तयासी । सत्संगाची महिमा कैसी । मोक्ष लाभे कितां दिवसीं । हें मज निरोपावें ॥ १ ॥ धरितां साधूची संगती । कितां दिवसां होते मुक्ती । हा निश्चय कृपामूर्ती । मज दीनास करावा ॥ २ ॥ मुक्ती लाभे तत्क्षणीं । विश्वासतां निरूपणीं । दुश्चीतपणें हानी । होत असे ॥ ३ ॥ सुचितपणें दुश्चीत । मन होतें अकस्मात । त्यास करावें

असे' असाही त्यांत भेद आहे, म्हणून आकाश ब्रह्म नाहीं.' आकाशालाही वर्णव्यक्तिविकार नाहीं व तें शाश्वत असें कोणी म्हणेल तर यावर असें उत्तर आहे कीं, आकाश मुळींच तमापासून झालें असल्यामुळें तें कामक्रोधानें वेष्टिलें आहे व अज्ञान, शून्य असें त्याचें नांव आहे. आकाश स्तब्धपणें शून्य आहे. शून्य = अज्ञान = कठिण. असें शून्य विकारवंत आकाश (कीं ज्याचा ज्ञानानें नाश होतो) आणि अनंत एक म्हणणें चुकीचें आहे. 'आकाश वेगळेपणें पाहावें । स्वरूपीं स्वरूपचि व्हावें । वस्तूचें पाहणें स्वभावें । ऐसें असे' स्वरूपस्थिति भिन्नपणानें अनुभवतांच येत नाहीं हा त्याचा विशेष. (३७–७०). (द० ८, स० ५)

प्रश्न — सत्संग धरिल्यापासून किती दिवसांत मोक्ष मिळतो ? उत्तर — विश्वासपूर्वक निरूपण ऐकल्यानें मोक्ष लाभतो दुश्चित चित्त ठेवल्यानें हानि होते (१–३). प्रतिप्रश्न — सुचित असतां मध्येंच चित्त दुश्चित होतें यास काय

निवांत । कोणेपरी ॥ ४ ॥ मनाच्या तोडून वोढी । श्रवणीं बैसावें आवडी । सावधपणें घडीनें घडी । काळसार्थक करावा ॥ ५ ॥ अर्थप्रमेय ग्रंथांतरीं । शोधून घ्यावें अभ्यंतरीं । दुश्चीतपण आलें तरी । पुन्हां श्रवण करावें ॥ ६ ॥ अर्थांतर पाहिल्यावीण । उगेंच करी जो श्रवण । तो श्रोता नव्हे पाषाण । मनुष्यवेषें ॥ ७ ॥ येथें श्रोते मानिती सीण । आम्हांस केलें पाषाण । तरी तया पाषाणाचें लक्षण । सावध ऐका ॥ ८ ॥ वांकुडा तिकुडा फोडिला । पाषाण घडून नीट केला । दुसरे वेळेसी पाहिला । तरी तो तैसाचि असे ॥ ९ ॥ टांकीनें खपली फोडिली । ते मागुती नाहीं जडली । मनुष्याची कुबुद्धि झाडिली । तरी ते पुन्हां लागे ॥ १० ॥ सांगतां अवगुण गेला । पुन्हां मागुता जडला । याकारणें महा भला । पाषाणगोटा ॥ ११ ॥ ज्याचा अवगुण झडेना । तो पाषाणाहून उणा । पाषाण आगळा जाणा । कोटिगुणें ॥ १२ ॥ कोटिगुणें कैसा पाषाण । त्याचेंहि ऐका लक्षण । श्रोतीं करावें श्रवण । सावध होउनी ॥ १३ ॥ माणीक मोतीं प्रवाळ । पाची वैडूर्य वज्रनीळ । गोमेदमणी परीस केवळ । पाषाण बोलिजे ॥ १४ ॥ याहिवेगळे बहुत । सूर्यकांत सोमकांत । नाना मोहरे सप्रचित । औषधाकारणें ॥ १५ ॥ याहि वेगळे पाषाण भले । नाना तीर्थी जे लागले । वापी कूप सेखीं जाले । हरिहरमूर्ती ॥ १६ ॥ याचा पाहातां विचार । पाषाणा ऐसें नाहीं सार । मनुष्य तें काय पामर । पाषाणापुढें ॥ १७ ॥ तरी तो ऐसा नव्हे पाषाण । जो अपवित्र निःकारण । तयासारिखा देह जाण । दुश्चीत अभक्तांचा ॥ १८ ॥ आतां असो हें बोलणें । घात होतो दुश्चीतपणें । दुश्चीतपणाचेनि गुणें । प्रपंच ना परमार्थ ॥ १९ ॥ दुश्चीतपणें कार्य नासे । दुश्चीतपणें चिंता वसे । दुश्चीतपणें स्मरण नसे । क्षण येक पाहातां ॥ २० ॥ दुश्चीतपणें शत्रुजिणें । दुश्चीतपणें जन्ममरणें । दुश्चीतपणाचेनि गुणें । हानीं होय ॥ २१ ॥

करावे ? प्रत्युत्तर — मनाच्या ओढी तोडून श्रवणास आवडीनें बसावें, व प्रतिक्षणीं सावध राहून काळसार्थक करावें. ऐकलेल्याचें मनन करून अर्थ मनांत धरावा. दुश्चितपण आलें तर पुन्हां श्रवण करावें. अर्थांतर पाहिल्याशिवाय (मननाशिवाय) जो नुसतें ऐकतो तो श्रोता नव्हे तर मनुष्यरूपी पाषाण होय. पाषाण म्हटल्याचा शीण मानूं नये. पाषाण वांकडा तिकडा फोडला, टांकली खपली काढली तर पुन्हां जडत नाहीं; मनुष्याची दुर्बुद्धि झाडली तर पुन्हा जडते. म्हणून त्यापेक्षां पाषाण कोटिगुणें श्रेष्ठ होय. पाषाणांतही मोतीं, पाच, वैडूर्य, वज्रनीळ, सोमकांत, सूर्यकांत, मोहरा (औषधीमणि), इ. उंची प्रकार आहेत. कित्येक पाषाणांचा हरिहरादि मूर्ति घडण्याच्या कामीं उपयोग होतो व कित्येक वापीकूप बांधण्याच्या कामीं लागून सार्थकीं लागतात. या दृष्टीनें पाहतां पाषाणासारखी लोकोपकारक वस्तु कोणती आहे ? मनुष्य त्यापुढें काय होय ? आतां एखादा पाषाण अपवित्र (शौचकूपादि) कामीं लागतो, त्यासारखा दुश्चित मनुष्याचा देह होय. दुश्चितपणामुळें प्रपंच व

दुश्चीतपणें नव्हे साधन । दुश्चीतपणें न घडे भजन । दुश्चीतपणें नव्हे ज्ञान । साधकांसी ॥ २२ ॥ दुश्चीतपणें नव्हे निश्चयो । दुश्चीतपणें न घडे जयो । दुश्चीतपणें होये क्षयो । आपुल्या स्वहिताचा ॥ २३ ॥ दुश्चीतपणें न घडे श्रवण । दुश्चीतपणें न घडे विवरण । दुश्चीतपणें निरूपण । हातींचें जाय ॥ २४ ॥ दुश्चीत बैसलाचि दिसे । परी तो असतचि नसे । चंचळ चक्रीं पडिलें असे । मानस तयाचें ॥ २५ ॥ वेडें पिशाच्य निरंतर । अंध मुकें आणी बधिर । तैसा जाणावा संसार । दुश्चीत प्राणियांचा ॥ २६ ॥ सावध असोन उमजेना । श्रवण असोन ऐकेना । ज्ञान असोन कळेना । सारासार ॥ २७ ॥ ऐसा जो दुश्चीत आळसी । परलोक कैंचा त्यासी । जयाचे जीवीं अहिर्निशीं । आळस वसे ॥ २८ ॥ दुश्चीतपणापासूनि सुटला । तरी तो सवेंच आळस आला । आळसाहातीं प्राणीयांला । उसंतचि नाहीं ॥ २९ ॥ आळसें राहिला विचार । आळलें बुडाला आचार । आळसें नव्हे पाठांतर । कांहीं केल्या ॥ ३० ॥ आळसें घडेना श्रवण । आळसें नव्हे निरूपण । आळसें परमार्थाची खूण । मळिन जाली ॥ ३१ ॥ आळसें नित्यनेम राहिला । आळसें अभ्यास बुडाला । आळसें आळस वाढला । असंभाव्य ॥ ३२ ॥ आळसें गेली धारणा धृती । आळसें मळिण जाली वृत्ती । आळसें विवेकाची गती । मंद जाली ॥ ३३ ॥ आळसें निद्रा वाढली । आळसें वासना विस्तारली । आळसें शून्याकार जाली । सद्बुद्धि निश्चयाची ॥ ३४ ॥ दुश्चितपणासवें आळस । आळसें निद्राविळास । निद्राविळासें केवळ नास । आयुष्याचा ॥ ३५ ॥ निद्रा आळस दुश्चितपण । हेंची मूर्खाचें लक्षण । येणेंकरितां निरूपण । उमजेचिना ॥ ३६ ॥ हीं तिन्हीं लक्षणें जेथें । विवेक कैचा असेल तेथें । अज्ञानास यापरतें ।

परमार्थ यांपैकीं कांहींच साधत नाहीं. दुश्चितपणानें कार्यनाश होतो, काळज्या लागतात, विस्मरणामुळें प्रमाद होतात, शत्रूंपुढें हार खावी लागते, जन्ममृत्यूच्या यातायातींतून सुटका होत नाहीं. दुश्चित मनुष्याला साधन, भक्ति, ज्ञान कांहींच साधत नाहीं. त्याचा निश्चय टिकत नाहीं, तो स्वहिताला आंचवतो, श्रवणमनन होत नाहीं, दुश्चित मनुष्य स्वस्थ बसलेला दिसतो पण त्याचें चित्त चंचळ चक्रावर सतत भ्रमण करीत फिरतें. वेडेपिसे, अंध, मुके, त्यांच्या सारखाच दुश्चित प्राण्याचा संसार नासून जातो. तो सावध असून त्याला उमजत नाहीं, तो श्रवणास बसून ऐकत नाहीं, त्याला कळत असून सारासार विचार तेवढा नसतो. असा जो दुश्चित त्याला परलोक कसचा साधतो ? (४–२८) दुश्चितपणाच्या हातून मनुष्य सुटला तर तो आळसाच्या स्वाधीन होतो. आळसाच्या हातीं मनुष्याला उसंतच (विश्रांति) मिळत नाहीं. आळसानें विचार स्फुरत नाहीं, आचारधर्म किंवा नित्यनेम पाळला जात नाहीं ; श्रवण, निरूपण, पाठांतर कांहींच होत नाहीं ; परमार्थबुद्धि मलिन होत जाते ; धारणा, विवेक राहत नाहीं ; आळसानें आळस वाढतो ; वासना मात्र वाढते पण बुद्धिनिश्चय होत नाहीं. आळसानें निद्रा प्रबळ होते व एकंदर आयुष्याचा नाश होतो. निद्रा, आळस व दुश्चितपण हें मूर्खाचें लक्षण होय व हीं तीन लक्षणें अंगीं असल्यावर श्रवण निरूपण कसचें घडतें ? तेथें विवेक उरतच नाहीं, भूक लागली कीं यथेच्छ जेवावें, व जेवल्यावर स्वस्थ निजावें,

मुखचि नाहीं ॥ ३७ ॥ क्षुधा लागतांच जेविला । जेवून उठतां आळस आला । आळस येतां निजेला । सावकास ॥ ३८ ॥ निजोन उठतांच दुश्चित । कदा नाहीं सावचित । तेथें कैचें आत्महित । निरूपणीं ॥ ३९ ॥ मर्कटापासीं दिल्हें रत्न । पिशाच्याहातीं निधान । दुश्चितापुढें निरूपण । तयापरी होये ॥ ४० ॥ आतां असो हे उपपत्ती । आशंकेची कोण गती । कितां दिवसां होते मुक्ती । सज्जनाचेनि संगें ॥ ४१ ॥ ऐका याचें प्रत्योत्तर । श्रोतीं व्हावें निरोत्तर । संतसंगाचा विचार । ऐसा असे ॥ ४२ ॥ लोहो परिसेसीं लागला । थेंबुटा सागरीं मिळाला । गंगे सरिते संगम जाला । तत्क्षणीं ॥ ४३ ॥ सावध साक्षेपी आणी दक्ष । तयास तत्काळचि मोक्ष । इतरांस तें अलक्ष । लक्षिलें नवचे ॥ ४४ ॥ येथें शिष्यप्रज्ञाच केवळ । प्रज्ञावंतां नलगे वेळ । अनन्यास तत्काळ । मोक्ष लाभे ॥ ४५ ॥ प्रज्ञावंत आणी अनन्य । तयास नलगे येक क्षण । अनन्य भावार्थेंविण । प्रज्ञा खोटी ॥ ४६ ॥ प्रज्ञेविण अर्थ न कळे । विश्वासेंविण वस्तु ना कळे । प्रज्ञाविश्वासें गळे । देहाभिमान ॥ ४७ ॥ देहाभिमानाचे अंतीं । सहजचि वस्तुप्राप्ती । सत्संगें सद्गती । विलंबचि नाहीं ॥ ४८ ॥ सावध साक्षेपी विशेष । प्रज्ञावंत आणी विश्वास । तयास साधनीं सायास । करणेंचि नलगे ॥ ४९ ॥ इतर भाविक साबडे । तयांसहि साधनें मोक्ष जोडे । साधुसंगें तत्काळ उघडे । विवेकदृष्टी ॥ ५० ॥ परी तें साधन मोडूं नये । निरूपणाचा उपाय । निरूपणें लागे सोय । सर्वत्रांसी ॥ ५१ ॥ आतां मोक्ष आहे कैसा । कैसी स्वरूपाची दशा । त्याचे प्राप्तीचा भरंवसा । सत्संगें केंवी ॥ ५२ ॥ ऐसें निरूपण प्रांजळ । पुढें बोलिलें असे सकळ । श्रोतीं होउनियां निश्चळ । अवधान द्यावें ॥ ५३ ॥ अवगुण

उठलें कीं दुश्चितपणाचा बंदी झाला. त्याला सावचित्त श्रवण घडायचें नाहीं व तें नाहीं म्हणजे आत्महिताला प्राणी मुकलाच. मर्कटाहातीं रत्न द्यावें किंवा पिशाच्या हातीं निधान (द्रव्य) द्यावें त्याप्रमाणें दुश्चिताला निरूपण अनुपयोगी होय (२९–४०). असो. सत्संगतींत किती दिवसांत मोक्ष होतो या प्रश्नाचें उत्तर देऊं. लोहाचा परिसाशीं स्पर्श झाल्यावर त्याचें सुवर्ण होण्यास जितका वेळ लागतो, किंवा पाण्याचा थेंब सागरास, अगर ओहोळ गंगेस मिळाल्यावर तद्रूप होण्यास जितका वेळ लागतो, तितकाच वेळ सावध (आत्महिताविषयीं तत्पर), साक्षेपी (उद्योगरत, निरलस) व दक्ष (शमदमादिकीं जागा) अशा मनुष्यास सत्संगांत मोक्ष मिळण्यास लागतो ! सत्संगीं अधिकारीजीवास तत्काळच मोक्ष मिळतो, इतरांस अलक्ष्य वस्तू लक्षितांच येत नाहीं. शिष्यप्रज्ञा ही मुख्य आहे. प्रज्ञावंत व अनन्य शिष्यास एक क्षणही लागत नाहीं, प्रज्ञेवांचून अर्थ कळत नाहीं, अनन्यतेवांचून वस्तु आकळत नाहीं, प्रज्ञा आणि विश्वास दोन्ही असले कीं देहाभिमान गळून तत्काळ ब्रह्मप्राप्ति होते. सत्संगांत सद्गति मिळायला विलंब लागत नाहीं, त्याला सायास पडत नाहींत. भाविक भाबडीं साधनांनीं शेवटीं मोक्षापर्यंत चढतात. पण सत्संगानें विवेकदृष्टि तत्काळ उघडते. तथापि साधन मोडूं नये.

त्यागावयाकारणें। न्यायनिष्ठुर लागे बोलणें। श्रोतीं कोप न धरणें। ऐसिया वचनाचा ॥ ५४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे दुश्चितनिरूपणनाम समासषष्ठ ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥ मागां श्रोतयांचा पक्ष। किती दिवसां होतो मोक्ष। तेचि कथा श्रोते दक्ष। होऊन ऐका ॥ १ ॥ मोक्षास कैसें जाणावें। मोक्ष कोणास म्हणावें। संतसंगें पावावें। मोक्षास कैसें ॥ २ ॥ तरी बद्ध म्हणिजे बांधला। आणी मोक्ष म्हणिजे मोकळा जाला। तो संतसंगें कैसा लाधला। तेंहि ऐका ॥ ३ ॥ प्राणी संकल्पें बांधला। जीवपणें बद्ध जाला। तो विवेकें मुक्त केला। साधुजनीं ॥ ४ ॥ मी जीव ऐसा संकल्प। दृढ धरितां गेले कल्प। तेणें प्राणी जाला अल्प। देहबुद्धीचा ॥ ५ ॥ मी जीव मज बंधन। मज आहे जन्म-मरण। केल्या कर्मांचें फळ आपण। भोगीन आतां ॥ ६ ॥ पापाचें फळ तें दुःख। आणी पुण्याचें फळ तें सुख। पापपुण्य अवश्यक। भोगणें लागे ॥ ७ ॥ पापपुण्य भोगणें सुटेना। आणी गर्भवासही तुटेना। ऐसी जयाची कल्पना। दृढ जाली ॥ ८ ॥ तया नांव बांधला। जीवपणें बद्ध जाला। जैसा स्वयें बांधोन कोसला। मृत्य पावे ॥ ९ ॥ तैसा प्राणी तो अज्ञान। नेणे भगवंताचें ज्ञान। म्हणे माझें जन्ममरण। सुटेचिना ॥ १० ॥ आतां कांहीं दान करूं। पुढिल्या जन्मास आधारु। तेणें सुखरूप संसारु। होईल माझा ॥ ११ ॥ पूर्वी दान नाहीं केलें। म्हणोन दरिद्र प्राप्त जालें। आतां तरी कांहीं केलें। पाहिजे कीं ॥ १२ ॥ म्हणोनी दिलें वस्त्र जुनें। आणीक येक तांब्र नाणें। म्हणे आतां कोटिगुणें। पावेन पुढें ! ॥ १३ ॥ कुशावर्ती कुरुक्षेत्रीं। महिमा

निरूपणाच्या मार्गानें सर्वांची सोय लागते. आतां मोक्षाचें स्वरूप काय, ब्रह्म काय, त्याच्या प्राप्तीचा भरंवसा सत्संगावर कसा ठेवावा हें सर्व सांगतों. अवगुणत्याग व्हावा म्हणून न्यायदृष्टीला योग्य दिसतें तें बोलावें लागतें त्याबद्दल श्रोत्यांनीं क्षमा करावी (४१–५४). [द० ८, स० ६]

मोक्षाचें स्वरूप काय व किती दिवसांत मोक्ष मिळतो या प्रश्नांचें आतां उत्तर देऊं. बंधापासून मोकळा होणें याचें नांव मोक्ष. प्राणी आपल्या संकल्पानें बांधला जातो, जीवपणानें बद्ध होतो, व साधु त्याचा विवेक जागृत करून त्याला मुक्त करितात. मी जीव या जन्मोजन्मींच्या संकल्पानें जीवाची देहबुद्धि वाढून तो अल्प होतो. मी जीव, मला बंधन आहे, जन्म-मरण आहे, केलेल्या बऱ्यावाईट कर्मांचें पापपुण्यात्मक फळ मला भोगावें लागतें, इत्यादि कल्पनांनीं जीव आपला आपल्यासच बांधून घेतो. कोसला म्ह० रेशमाचा किडा आपल्याभोंवतीं घर करून स्वतःच कोंडून घेऊन आंतल्या आंत मरतो, तसा जो आपल्याच कल्पनेनें आपणास बांधून घेऊन जन्ममरणाचे फेरे फिरत राहतो. ह्या अज्ञान प्राण्याला भगवंताचें ज्ञान नसतें, दानधर्मादिकरून केलेल्या पुण्यानें पुढील जन्मीं सुख भोगीन अशी तो आशा करीत असतो. पूर्वी दानधर्म न केल्यामुळें हें दारिद्य आलें आहे, आतां जुनें वस्त्र किंवा एखादा पैसा देऊन कोटपट मोबदला पुढें मिळवीन असे मनोरथ तो

ऐकोन दान करी । आशा धरिली अभ्यंतरीं । कोटिगुणांची ॥ १४ ॥ रुका आडका दान केला । अतीतास टुकडा घातला । म्हणे माझा ढीग जाला । कोटि टुकड्यांचा ॥ १५ ॥ तो मी खाईन पुढिलिये जन्मीं । ऐसें कल्पी अंतर्यामीं । वासना गुंगली जन्मकर्मीं । प्राणियांची ॥ १६ ॥ आतां मी जें देईन । पुढिले जन्मीं पावेन । ऐसें कल्पी तो अज्ञान । बद्ध जाणावा ॥ १७ ॥ बहुतां जन्माचे अंतीं । होय नरदेहाची प्राप्ती । येथें न होतां ज्ञानें सद्गती । गर्भवास चुकेना ॥ १८ ॥ गर्भवास नरदेहीं घडे । ऐसें हें सर्वथा न घडे । अकस्मात भोगणें पडे । पुन्हां नीच योनी ॥ १९ ॥ ऐसा निश्चयो शास्त्रांतरीं । बहुतीं केला बहुतांपरी । नरदेह संसारीं । परम दुर्लभ असे ॥ २० ॥ पापपुण्य समता घडे । तरीच नरदेह जोडे । येरवीं हा जन्म न घडे । हें व्यासवचन भागवतीं ॥ २१ ॥

॥ श्लोक ॥ नरदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभम् । प्लवं सुकल्पं गुरुकर्णधारम् ।
मयानुकूलेन नभस्वतेरितम् । पुमान्भवाब्धिं न तरेत्स आत्महा ॥

नरदेह दुर्लभ । अल्प संकल्पांचा लाभ । गुरुकर्णधारी स्वयंभ । सुख पाववी ॥ २२ ॥ देव अनुकूळ नव्हे जया । स्वयें पापी तो प्राणीया । भवाब्धी न तरवे तया । आत्महत्यारा बोलिजे ॥ २३ ॥ ज्ञानेंविण प्राणीयांसी । जन्মमृत्य लक्ष चौऱ्यांसी । तितुक्या आत्महत्या त्यासी । म्हणोन आत्महत्यारा ॥ २४ ॥ नरदेहीं ज्ञानेंविण । कदा न चुके जन्ममरण । भोगणें लागे दारुण । नाना नीच योनी ॥ २५ ॥ रीस मर्कट श्वान सूकर । अश्व वृषभ म्हैसा खर । काक कुर्कुट जंबुक मार्जर । सरड बेडुक मक्षिका ॥ २६ ॥ इत्यादिक नीच योनी । ज्ञान नस्तां भोगणें जनीं । आशा धरी मूर्ख प्राणी । पुढिलिया जन्माची ॥ २७ ॥ हा नरदेह पडतां । तोचि पाविजे मागुता । ऐसा विश्वास धरितां । लाज नाहीं ॥ २८ ॥ कोण पुण्याचा संग्रहो । जे पुन्हा पाविजे नरदेहो । दुराशा धरिली पाहो । पुढिलिया जन्माची ॥ २९ ॥ ऐसे मूर्ख अज्ञान जन ।

बांधीत असतो व रुका आडका किंवा एक भाकरीचा तुकडा देऊन पुढील जन्मीं अनंतपट सुख भोगायची वासना धरितो, तो बद्ध होय (१–१७). नरदेह मिळून ज्ञानानें सद्गती जर मिळाली नाहीं तर पुनः पुन्हां गर्भवास, जननमरण हें चुकत नाहीं. पापाधिक्यामुळें खालच्या योनींतही जन्म घ्यावा लागतो (पापपुण्य समान झालें कीं नरदेह मिळतो). अशा दुर्लभ नरदेहांत गुरु कर्णधार मिळाले तर स्वयंसुखी होतो. पाप्याला दुर्दैवयोगानें भवसागर तरून जातां येत नाहीं म्हणून तो आत्मघातकी होय, ज्ञानावांचून जितक्या दुःखद योनी तो फिरतो तितक्या आत्महत्या त्याला घडतात. रीस, मर्कट, श्वान, कावळा, कोंबडा, घोडा, बैल, म्हैस, सूकर इ० नीच योनींत ज्ञान मिळत नाहीं हें माहीत असून मूर्ख प्राणी प्राप्त झालेला नरदेह पडल्यावरही पुन्हां नरदेहच मिळेल अशी आशा करीत बसतो ! असे काय हा पुण्याचे डोंगर करीत असतो कीं पुन्हां

केलें संकल्पें बंधन । शत्रु आपणासि आपण । होऊन ठेला ॥ ३० ॥

॥ श्लोक ॥ आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥

ऐसें संकल्पाचें बंधन । संतसंगें तुटे जाण । ऐक तयाचें लक्षण । सांगिजेल ॥ ३१ ॥ पांचा भूतांचें शरीर । निर्माण जालें सचराचर । प्रकृतिस्वभावें जगदाकार । वर्तों लागे ॥ ३२ ॥ देह अवस्था अभिमान । स्थानें भोग मात्रा गुण । शक्ती आदिकरून लक्षण । चौपुटी तत्वांचें ॥ ३३ ॥ ऐसी पिंडब्रह्मांडरचना । विस्तारें वाढली कल्पना । निर्धारितां तत्वज्ञाना । मतें भांबावलीं ॥ ३४ ॥ नाना मतीं नाना भेद । भेदें वाढती वेवाद । परी तो ऐक्यतेचा संवाद । साधु जाणती ॥ ३५ ॥ तया संवादाचें लक्षण । पंचभूतिक देह जाण । त्या देहामध्यें कारण । आत्मा वोळखावा ॥ ३६ ॥ देह अंतीं नासोन जाये । त्यास आत्मा तोचि म्हणों नये । नाना तत्वांचा समुदाय । देहामध्यें आला ॥ ३७ ॥ अंतःकरण प्राणपंचक । विषये इंद्रियें दशक । हा सूक्ष्माचा विवेक । बोलिला शास्त्रीं ॥ ३८ ॥ घेतां सूक्ष्माची शुद्धी । भिन्न अंतःकरण मन बुद्धी । नाना तत्वांचे उपाधी–। वेगळा आत्मा ॥ ३९ ॥ स्थूळ सूक्ष्म कारण । महाकारण विराट हिरण्य । अव्याकृत मूळ प्रकृति जाण । ऐसे अष्टदेह ॥ ४० ॥ च्यारी पिंडीं च्यारी ब्रह्मांडीं । ऐसी अष्टदेहाची प्रौढी । प्रकृतिपुरुषांची वाढी । दशदेह बोलिजे ॥ ४१ ॥ ऐसें तत्वांचें लक्षण । आत्मा साक्षी विलक्षण । कार्य कर्ता कारण । दृश्य तयाचें ॥ ४२ ॥ जीवशिव पिंडब्रह्मांड । मायेअविद्येचें बंड । हें सांगतां असे उदंड । परी आत्मा तो वेगळा ॥ ४३ ॥ पाहों जातां आत्मे च्यारी । त्यांचें लक्षण अवधारीं । हें जाणोनि

नरदेहच मिळेल अशी यानें खात्री बाळगावी ? आपल्याच संकल्पानें आपल्यासच बांधून घेऊन हा आपला आपणच शत्रु होतो. हें संकल्पाचें बंधन सत्संगांत ज्ञानविवेकानेंच तुटतें (१८–३१). चराचर पंचभौतिक आहे, व जगदाकार, प्रकृतिस्वभावेंकरून वर्तूं लागतो. देह, अवस्था, अभिमान, स्थान, भोग, मात्रा, गुण, शक्ति, अशीं आठ तत्वें प्रत्येक देहाचीं, तीं चार देहाचीं मिळून ३२ होतात. (स्थूल देहाचीं २५ व सूक्ष्म देहाचीं २५ मिळून ५०. ३२+५०=८०+१ ज्ञान+१ अज्ञान अकंदर ८२ तत्वांची पिंडब्रह्मांड रचना आहे. द० १७ स० ९ ओंवी १–९ पहा.). तत्वांच्या संख्येसंबंधानें अनेक मतभेद असतील, पण ऐक्यतेचा संवाद संत करीत असतात. देहांत पंचभूतें असून आत्मा वेगळा आहे याविषयीं सर्वांचें एकमत आहे तेवढेंच ते घेतात. तत्वें किती हें भांडण व्यर्थ आहे. तत्वें नाशिवंत असून आत्मा शाश्वत आहे. देह म्हणजे अनेक तत्वांचा समुदाय. सूक्ष्मदेहांत अंत:करणपंचक, प्राणपंचक, विषयपंचक व इंद्रियदशक मिळून सूक्ष्म देहाचा विवेक होतो (हाही वरील समासांतच पहावा). सूक्ष्म देहाचा खोल विचार करून पाहतां हीं वेगळालीं असून आत्मा त्याहून वेगळा आहे असा निश्चय होतो. स्थूळ, सूक्ष्म, कारण व महाकारण असे चार देह पिंडीं व चार ब्रह्मांडीं मिळून आठ देह व प्रकृतिपुरुष मिळून दश देह होतात. हीं सर्व तत्वें नाशिवंत असून आत्मा त्यांचा साक्षी व त्यांहून वेगळा आहे. कार्य, कर्ता व कारण हें त्याचें दृश्य रूप आहे; तो त्याहून वेगळा आहे. जीवशिव, पिंडब्रह्मांड, मायाअविद्या असें हें पुष्कळच सांगण्यासारखें आहे. हा सर्व पंचीकरणाचा विषय आहे (३२-४३). आत्माही चार प्रकारांनीं सांगतां येतो.

अभ्यंतरीं । सदृढ धरावें ॥ ४४ ॥ येक जीवात्मा दुसरा शिवात्मा । तिसरा परमात्मा जो विश्वात्मा । चौथा जाणिजे निर्मळात्मा । ऐसे च्यारी आत्मे ॥४५॥ भेद उंच नीच भासती । परी च्यारी येकचि असती । येविषीं दृष्टांतसंमती । सावध ऐका ॥ ४६ ॥ घटाकाश मठाकाश । महदाकाश चिदाकाश । अवघे मिळोन आकाश । येकचि असे ॥ ४७ ॥ तैसा जीवात्मा आणी शिवात्मा । परमात्मा आणी निर्मळात्मा । अवघा मिळोन आत्मा । येकचि असे ॥ ४८ ॥ घटीं व्यापक जें आकाश । तया नांव घटाकाश । पिंडीं व्यापक ब्रह्मांश । त्यास जीवात्मा बोलिजे ॥ ४९ ॥ मठीं व्यापक जें आकाश । तया नांव मठाकाश । तैसा ब्रह्मांडीं जो ब्रह्मांश । त्यास शिवात्मा बोलिजे ॥ ५० ॥ मठाबाहेरील आकाश । तया नांव महदाकाश । ब्रह्मांडाबाहेरील ब्रह्मांश । त्यास परमात्मा बोलिजे ॥५१॥ उपाधीवेगळें आकाश । तया नांव चिदाकाश । तैसा निर्मळात्मा परेश । तो उपाधी वेगळा ॥ ५२ ॥ उपाधीयोगें वाटे भिन्न । परी तें आकाश अभिन्न । तैसा आत्मा स्वानंदघन । येकचि असे ॥ ५३ ॥ दृश्या सबाह्य अंतरीं । सूक्ष्मात्मा निरंतरीं । त्याची वर्णावया थोरी । समर्थ नव्हे ॥ ५४ ॥ ऐसें आत्मयाचें लक्षण । जाणतां नाहीं जीवपण । उपाधी शोधितां अभिन्न । मुळींच आहे ॥ ५५ ॥ जीवपणें येकदेसी । अहंकारें जन्म सोसी । विवेक पाहातां प्राणीयांसी । जन्म कैंचा ॥ ५६ ॥ जन्ममृत्यापासून सुटला । या नांव जाणिजे मोक्ष जाला । तत्वें शोधितां पावला । तत्वता वस्तु ॥ ५७ ॥ तेचि वस्तु ते आपण । हें महावाक्याचें लक्षण । साधु करिती निरूपण । आपुलेन मुखें ॥ ५८ ॥ जेचि क्षणीं अनुग्रह केला । तेचि क्षणीं मोक्ष जाला । बंधन कांहीं आत्मयाला । बोलोंचि नये ॥ ५९ ॥ आतां आशंका फिटली । संदेहवृत्ती मावळली । संतसंगें तत्काळ जाली । मोक्षपदवी ॥ ६० ॥ स्वप्ना-

जीवात्मा, शिवात्मा, परमात्मा किंवा विश्वात्मा व निर्मळात्मा. उपाधि भेदानें हे उच्चनीच वाटतात, पण चारी मिळून एकच आहे. घटांत व्यापक तें घटाकाश, मठांत व्यापक तें मठाकाश, मठाबाहेरचें तें महदाकाश व उपाधिवेगळें आकाश तें चिदाकाश याप्रमाणें आकाशांचे चार भेद सांगितले तरी आकाश एकच. त्याप्रमाणें पिंडांतल्या व्यापक ब्रह्मांशाला जीव म्हणतात, ब्रह्मांडांतल्या व्यापक ब्रह्मांशाला शिवात्मा म्हणतात, ब्रह्मांडाबाहेरील ब्रह्मांशाला परमात्मा म्हणतात व सकळ उपाधिवेगळ्या ब्रह्माला निर्मळात्मा म्हणतात. याप्रमाणें एका ब्रह्माचे चार प्रकार सांगितले तरी आत्मा एकच आहे. उपाधिभेदानें आकाश भिन्न वाटलें तरी आकाश एकच त्याप्रमाणें उपाधिभेदामुळें जीवशिवादि चार प्रकार समजुतीसाठीं वेगवेगळे करून सांगितले तरी आत्मा एकच आहे, तो स्वानंदघन आहे तो तत्वादि सकळांहून वेगळा आहे (४४–५३). आत्मा दृश्या सबाह्य आहे त्याचें वर्णन शेषही करूं शकत नाहीं. उपाधि सोडून पाहतां आत्मा अभिन्न व एक आहे. जीवात्मा एकदेशीपणानें अहंकाराच्या योगेंकरून जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडला आहे, पण विवेकानें पाहिल्यास त्याला जन्ममरण नाहीं. तत्वांचा शोध करून तत्वातीत जन्ममृत्युरहित निरंजन आत्मा ओळखणें व तोच मी आहें असें निःसंदेह जाणणें यालाच मोक्ष

मध्यें जो बांधला । तो जागृतीनें मोकळा केला । ज्ञानविवेकें प्राणीयाला । मोक्षप्राप्ती ॥ ६१ ॥ अज्ञान–निशीचा अंतीं । संकल्पदुःखें नासती । तेणें गुणें होय प्राप्ती । तत्काळ मोक्षाची ॥ ६२ ॥ तोडावया स्वप्नबंधन । नलगे आणीक साधन । तयास प्रेत्न जागृतीवीण । बोलोंचि नये ॥ ६३ ॥ तैसा संकल्पें बांधला जीव । त्यास आणीक नाहीं उपाव । विवेक पाहतां वाव । बंधन होय ॥ ६४ ॥ विवेक पाहिल्याविण । जो जो उपाव तो तो सीण । विवेक पाहातां आपण । आत्माच असे ॥ ६५ ॥ आत्मयाचा ठाईं कांहीं । बंध मोक्ष दोनी नाहीं । जन्ममृत्य हें सर्वही । आत्मत्वीं न घडे ॥ ६६ ॥ इति श्रीदास-बोधे गुरुशिष्यसंवादे मोक्षलक्षणनाम समास सप्तम ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥ मागां जालें निरूपण । परमात्मा तो तूंचि जाण । तया परमात्मयाचें लक्षण । तें हें ऐसें असे ॥ १ ॥ जन्म नाहीं मृत्य नाहीं । येणें नाहीं जाणें नाहीं । बद्ध मोक्ष दोनी नाहीं । परमात्मयासी ॥ २ ॥ परमात्मा निर्गुण निराकार । परमात्मा अनंत अपार । परमात्मा नित्य निरंतर । जैसा तैसा ॥ ३ ॥ परमात्मा सर्वांस व्यापक । परमात्मा अनेकीं येक । परमात्मयाचा विवेक । अतर्क्य आहे ॥ ४ ॥ ऐसी परमात्मयाची स्थिती । बोलताती वेद श्रुती । परमात्मा पाविजे भक्ती । येथें संशय नाहीं ॥ ५ ॥ तये भक्तीचें लक्षण । भक्ती नवविधा भजन । नवविधा भजनें पावन । बहु भक्त जाले ॥ ६ ॥ तया नवविधामध्यें सार । आत्मनिवेदन थोर । तयेचा करावा विचार । स्वानुभवें स्वयें ॥ ७ ॥ आपुलिया स्वानुभवें । आपणास निवेदावें । आत्म-निवेदन जाणावें । ऐसें असे ॥ ८ ॥ महत्पूजेचा अंतीं । देवास मस्तक वाहाती । तैसी आहे निकट भक्ती । आत्मनिवेदनाची ॥ ९ ॥ आपणांस निवेदिती ।

म्हणतात. तीच निरंजन वस्तु तूं आहेस असा महावाक्याचा बोध साधु करितात. ज्या क्षणीं त्यांचा अनुग्रह त्याच क्षणीं मोक्ष. आत्म्याला बंधन आहे असें मनांतच आणूं नये. सत्संगांत मोक्ष याप्रमाणें होतो. स्वप्नांत मी बांधलों आहें असें भीतीनें ओरडणाऱ्याला जागें करण्याप्रमाणें संसारस्वप्नांतून प्राण्याला ज्ञानविवेकानें संत स्वरूपजागृतीवर आणतात, व या स्वरूपजागृतीलाच मोक्ष म्हणतात. अज्ञानाची रात्र संपतांच संकल्पदुःखांचा नाश होऊन प्राणी तत्काळ मुक्त होतो. स्वप्न-बंधनांतून जागृतीशिवाय मुक्त करणारें दुसरें साधनच नाहीं. संकल्पानें बांधलेल्या जीवास विवेकानेंच मोकळें करितां येतें व हें कार्य स्वतः मुक्त झालेले संतच करूं शकतात. आत्मविवेकावांचून इतर उपाय म्ह० व्यर्थ शीण होय. आत्म्याच्या ठायीं बद्ध मुक्त हे दोन्ही नाहींत, जन्म-मरणांच्या कल्पनेपलीकडे तो आहे (५४–६६). [द० ८, स० ७]

जीव व परमात्मा एक आहेत, परमात्म्याला जन्ममृत्युबंधमोक्ष कांहीं नाहींत, तो निरंतर आहे, अनेकीं एक आहे, हें सांगितलें. तो भक्तीनें पावतो, भक्ति म्ह० नवविधा भक्ति व मुख्यतः आत्मनिवेदनभक्ति-आत्मनिवेदनाचा विचार स्वानुभवें स्वयें करावा, म्ह० आपणास निवेदावें. आत्मनिवेदनाचा विचार असा :- आधीं मी कोण याचा विचार करावा, मग

ऐसे भक्त थोडे असती । तयांस परमात्मा मुक्ती । तत्काळ देतो ॥ १० ॥ आपणास कैसें निवेदावें । कोठें जाऊन पडावें । किंवा मस्तक तोडावें । देवापुढें ॥ ११ ॥ ऐसें ऐकोन बोलणें । वक्ता वदे सर्वज्ञपणें । श्रोतां सावधान होणें । येकाग्र चित्तें ॥ १२ ॥ आत्मनिवेदनाचें लक्षण । आधीं पाहावें मी कोण । मग परमात्मा निर्गुण । तो वोळखावा ॥ १३ ॥ देवाभक्ताचें शोधन । करितां होतें आत्मनिवेदन । देव आहे पुरातन । भक्त पाहे ॥ १४ ॥ देवास वोळखों जातां । तेथें जाली तद्रूपता । देवभक्तविभक्तता । मुळींच नाहीं ॥ १५ ॥ विभक्त नाहीं म्हणोन भक्त । बद्ध नाहीं म्हणोनि मुक्त । अयुक्त नाहीं बोलणें युक्त । शास्त्राधारें ॥ १६ ॥ देवाभक्तांचें पाहतां मूळ । होय भेदाचें निर्मूळ । येक परमात्मा सकळ । दृश्यावेगळा ॥ १७ ॥ तयासि होतां मिळणी । उरी नाहीं दुजेपणीं । देव भक्त हे कडसणी । निरसोन गेली ॥ १८ ॥ आत्मनिवेदनाचे अंतीं । जे कां घडली अभेद भक्ती । तये नांव सायोज्यमुक्ती । सत्य जाणावी ॥ १९ ॥ जो संतांसी शरण गेला । अद्वैत-निरूपणें बोधला । मग जरी तो वेगळा केला । तरी होणार नाहीं ॥ २० ॥ नदी मिळाली सागरीं । ते निवडावी कोणेपरी । लोहो सोनें होतां माघारी । काळिमा न ये ॥ २१ ॥ तैसा भगवंतीं मिळाला । तो वेगळा नवचे केला । देव आपण भक्त जाला । विभक्त नव्हे ॥ २२ ॥ देव भक्त मुळीं येक । ज्यासी कळला हा विवेक । साधुजनीं मोक्षदायक । तोचि येक ॥ २३ ॥ आतां असो हें बोलणें । देव पाहावा भक्तपणें । तेणें त्याचें ऐश्वर्य बाणे । तत्काळ आंगीं ॥ २४ ॥ देहचि होऊन राहिजे । तेणें देहदुःख साहिजे । देहातीत होतां पाविजे । परब्रह्म तें ॥ २५ ॥ देहातीत कैसें होणें । कैसें परब्रह्म पावणें । ऐश्वर्याचीं लक्षणें । कवण सांगिजेजी ॥ २६ ॥ ऐसें श्रोतां आक्षेपिलें । याचें उत्तर काय बोलिलें । तेंचि आतां निरोपिलें । सावध ऐका ॥ २७ ॥ देहातीत वस्तु आहे । तें तूं परब्रह्म पाहें । देहसंग हा न साहे । तुज विदेहासी ॥ २८ ॥ ज्याची बुद्धि होय ऐसी । वेद वर्णिती तयासी । शोधितां नाना शास्त्रांसी । न पडे ठाईं ॥ २९ ॥

निर्गुण परमात्मा ओळखावा, ओळखतां तद्रूपता होऊन देवभक्त अभिन्न हा प्रत्यय येतो. देवाभक्तांचें मूळ पाहतां दुजेपण नाहीं. अभेदभक्ति म्ह० सायुज्यमुक्ति. संतांस शरण गेल्यानें अद्वैतबोध होतो व मग वेगळा केला तरी होत नाहीं. नदीसागर किंवा लोहपरिस याप्रमाणें देवभक्त एक झाल्यावर विभक्तपण नाहीं (१–२२). देव भक्तपणें म्ह० अभिन्नपणें पहावा, म्ह० त्याचें ऐश्वर्य अंगीं बाणतें. देहबुद्धीनें देहदुःख होतें, ती सोडतां ब्रह्मप्राप्ति होते. हेंच उलगडून दाखवूं. देहातीत

ऐश्वर्य ऐसें तत्वतां । बाणे देहबुद्धि सोडितां । देह मी ऐसें भावितां । अधोगती ॥ ३० ॥ याकारणें साधुवचन । मानूं नये अप्रमाण । मिथ्या मानितां दूषण । लागों पाहे ॥ ३१ ॥ साधुवचन तें कैसें । काय धरावें विश्वासें । येक वेळ स्वामी ऐसें । मज निरोपावें ॥ ३२ ॥ सोहं आत्मा स्वानंदघन । अजन्मा तो तूंचि जाण । हेंचि साधूचें वचन । सदृढ धरावें ॥ ३३ ॥ महावाक्याचें अंतर । तूंचि ब्रह्म निरंतर । या वचनाचा विसर । पडोंचि नये ॥ ३४ ॥ देहासि होईल अंत । मग मी पावेन अनंत । ऐसें बोलणें निभ्रांत । मानूंचि नये ॥ ३५ ॥ येक मूर्ख ऐसें म्हणती । माया नासेल कल्पांतीं । मग आम्हांस ब्रह्मप्राप्ती । येरवीं नाहीं ॥ ३६ ॥ मायेसी होईल कल्पांत । अथवा देहासी येईल अंत । तेव्हां पावेन निवांत । परब्रह्म मी ॥ ३७ ॥ हें बोलणें अप्रमाण । ऐसें नव्हे समाधान । समाधानाचें लक्षण । वेगळेंचि असे ॥ ३८ ॥ सैन्य अवघेंचि मरावें । मग राज्यपद प्राप्त व्हावें । सैन्य अस्तांचि राज्य करावें । हें कळेना ॥ ३९ ॥ माया असोनिच नाहीं । देह असतांच विदेही । ऐसें समाधान कांहीं । वोळखावें ॥ ४० ॥ राज्यपद हातासी आलें । मग परिवारें काय केलें । परिवारा देखतां राज्य गेलें । हें तों घडेना ॥ ४१ ॥ प्राप्त जालियां आत्मज्ञान । तैसें दृश्य देहभान । दृष्टीं पडतां समाधान । जाणार नाहीं ॥ ४२ ॥ मार्गीं मुळीं सर्पाकार । देखतां भय आलें थोर । कळतां तेथींचा विचार । मग मारणें काय ॥ ४३ ॥ तैसी माया भयानक । विचार पाहातां माइक । मग तयेचा धाक । कासया धरावा ॥ ४४ ॥ देखतां मृगजळाचे पूर । म्हणे कैसा पावों पैलपार । कळतां तेथींचा विचार । सांकडें कैंचें ॥ ४५ ॥ देखतां स्वप्न भयानक । स्वप्नीं वाटे परम धाक । जागृती आलियां साशंक । कासया व्हावें

परब्रह्मवस्तु तूंच आहेस, तुला विदेहाला देहसंग नाहीं, असें साधु सांगतात. 'सोऽहं आत्मा स्वानंदघन । अजन्मा तो तूंचि जाण' हा साधुबोध चित्तांत निरंतर वागवावा. तूंच ब्रह्म हें महावाक्याचें अंतर (रहस्य) आहे त्याचा विसर पडूं देऊं नये (३३-३४). देहाचा अंत झाल्यावर मी अनंतपद पावेन म्ह० मुक्त होईन हें बोलणें मानूं नये. कल्पांतीं माया नासेल आणि मग मीं अनायासेंच मुक्त होईन हेंहीं बोलणें मानूं नये. समाधानाचें लक्षण हें नाहीं, वेगळें आहे. सारें सैन्य मरावें आणि मग राज्यवैभव भोगावें यांत अर्थ नाहीं ; सैन्य असतांच राज्य करावें यांत शहाणपण आहे. तसें दृश्य देहभान जावें आणि मग आत्मसाम्राज्य भोगावें यापेक्षां दृश्य देहभान असतांही आत्मसमाधान रहावें यांत स्वारस्य आहे. माया असून ती मिथ्या म्हणून ओळखावी, देहांत असून विदेहीपणा भोगावा, यांत खरें समाधान आहे. राज्यपद प्राप्त झाल्यावर मग परिवार असला म्हणून काय बिघडतें ? परिवार डोळ्यांसमोर आला कीं राज्यपद जातें असें कांहीं घडत नाहीं. तद्वत् आत्मज्ञानाची बैठक स्थिर झाल्यावर प्रपंच दृश्य असला म्हणून काय करितो, तो कांहीं आत्मसमाधान हिरून नेत नाहीं. वाटेंत मुळी सर्पाकार पाहिली तेव्हां भय वाटलें, पण तो सर्प नसून मुळी आहे हें कळल्यावर मग तिला धोपटण्याचें कारणच उरत नाहीं. माया भयानक वाटली तरी मिथ्या कळल्यावर मग तिचें भय कोठें राहिलें ? मृगजळ हें मृगजळ आहे हें कळल्यावर बुडायचें भय नाहीं. भयानक स्वप्नांत जीव भ्याला असला तरी जागृत झाल्यावर

॥ ४६ ॥ तथापि माया कल्पनेसी दिसे। आपण कल्पनातीत असे। तेथें उद्वेग काईसे। निर्विकल्पासी ॥ ४७ ॥ अंतीं मती तेचि गती। ऐसें सर्वत्र बोलती। तुझा अंतीं तुझी प्राप्ती। सहजचि जाली ॥ ४८ ॥ चौंदेहाचा अंत। आणी जन्ममुळाचा प्रांत। अंतांप्रांतासी अलिप्त। तो तूं आत्मा ॥ ४९ ॥ जयासी ऐसी आहे मती। तयास ज्ञानें आत्मगती। गती आणि अवगती। वेगळाचि तो ॥ ५० ॥ मति खुंटली वेदांची। तेथें गती आणी अवगती कैंची। आत्मशास्त्रगुरुप्रचितीची। ऐक्यता आली ॥ ५१ ॥ जीवपणाची फिटली भ्रांती। वस्तु आली आत्मप्रचीती। प्राण पावला उत्तम गती। सद्गुरुबोधें ॥ ५२ ॥ सद्गुरुबोध जेव्हां जाला। चौंदेहांस अंत आला। तेणें निजध्यास लागला। सस्वरूपीं ॥५३॥ तेणें निजध्यासें प्राणी। ध्येयचि जाला निर्वाणीं। सायुज्यमुक्तीचा धनी। होऊन बैसला ॥ ५४ ॥ दृश्य पदार्थ वोसरतां। अवघा आत्माचि तत्वतां। नेहटून विचारें पाहातां। दृश्य मुळींच नाहीं ॥ ५५ ॥ मिथ्या मिथ्यत्वें पाहिलें। मिथ्यापणें अनुभवा आलें। श्रोतीं पाहिजे ऐकिलें। या नांव मोक्ष ॥ ५६ ॥ सद्गुरुवचन हृदईं धरी। तोचि मोक्षाचा अधिकारी। श्रवण मनन केलेंचि करी। अत्यादरें ॥ ५७ ॥ जेथें आटती दोनी पक्ष। तेथें लक्ष ना अलक्ष। या नांव जाणिजे मोक्ष। नेमस्त आत्मा ॥ ५८ ॥ जेथें ध्यान धारणा सरे। कल्पना निर्विकल्पीं मुरे। केवळ ज्ञप्तिमात्र उरे। सूक्ष्म ब्रह्म ॥ ५९ ॥ भवमृगजळ आटलें। लटिकें बंधन सुटलें। अजन्म्यास मुक्त केलें। जन्मदुःखापासुनी ॥ ६० ॥ निःसंगाची संगव्याधी। विदेहाची देहबुद्धी। विवेकें तोडिली उपाधी। निःप्रपंचाची ॥ ६१ ॥ अद्वैताचें तोडिलें द्वैत। येकांतास दिला येकांत। अनंतास दिला अंत। अनंताचा ॥ ६२ ॥ जागृतीस चेवविलें।

साशंक होण्याचें मुळींच कारण नाहीं. माया कल्पनेनें उभारलेली, आपण कल्पनातीत निर्विकल्प वस्तु, आपणास कल्पना काय करणार ? 'अंते मतिः सा गतिः' असें म्हणतात, ठीक आहे, तुझ्या अंतीं (मीपणाच्या, जीवदशेच्या अंतीं) तत्पदप्राप्ति सहजच आली (३५–४८). स्थूलसूक्ष्मादि चार देहांचा अंत व जन्माचें मूळ जो अहंकार त्याचा प्रांत (शेवट) यांच्याहून आत्मा अलिप्त आहे. ह्या ज्ञानानेंच त्याला गति मिळते, अथवा गति (मोक्ष) व अवगति (बंध) याहून तो वेगळाच आहे, तेथें तीनही प्रचीति एकरूप होतात. सद्गुरु बोधानें चार देहांचा अंत होऊन स्वरूपाचा निदिध्यास लागतो व प्राणी ध्येय (वस्तु) होऊन राहतो (४९–५४). नीट सूक्ष्मदृष्टीनें पाहिलें तर आत्मा शाश्वत आहे व दृश्य मुळींच नाहीं. मिथ्या (माया) मिथ्या आहे म्हणून ओळखणें व तसा अनुभव येणें याचें नांव मोक्ष. सद्गुरुवचन हृदयीं धरून श्रवणमननाभ्यास ठेवल्यानें मोक्षाधिकार येतो. बंधमोक्ष, मायाब्रह्म, लक्ष्यअलक्ष्य, ध्यानध्याता इ० दोन्ही पक्ष जेथें आटतात तो आत्मा मोक्षस्वरूप आहे. त्या निर्विकल्पांत कल्पना मुरून जाते व केवळ ज्ञप्तिमात्र सूक्ष्म ब्रह्म उरतें. झाल ! (५५-५९) भवमृगजळ आटलें, लटकें (खोटें, कल्पित) बंधन सुटलें, अजन्मा जन्मदुःखापासून मुक्त झाला, अद्वैताचें द्वैत तुटलें (कारण तें साक्षेप होतें), निःसंगाच्या मागची संगाची व्याधि संपली, निष्प्रपंचाचा प्रपंच (उपाधि) सुटली, एकांतास एकांत

चेईऱ्यास सावध केलें । निजबोधास प्रबोधिलें । आत्मज्ञान ॥ ६३ ॥ अमृतास केलें अमर । मोक्षास मुक्तीचें घर । संयोगास निरंतर । योग केला ॥ ६४ ॥ निर्गुणास निर्गुण केलें । सार्थकाचें सार्थक जालें । बहुतां दिवसां भेटलें । आपणासि आपण ॥ ६५ ॥ तुटला द्वैताचा पडदा । अभेदें तोडिलें भेदा । भूतपंचकाची बाधा । निरसोन गेली ॥ ६६ ॥ जालें साधनाचें फळ । केलें निश्चळास निश्चळ । निर्मळाचा गेला मळ । विवेकबळें ॥ ६७ ॥ होतें सन्निध चुकलें । ज्याचें त्यास प्राप्त जालें । आपणा देखतां फिटलें । जन्मदुःख ॥ ६८ ॥ दुष्ट स्वप्नें जाजावला । ब्राह्मण नीच याती पावला । आपणासि आपण सांपडला । जागेपणें ॥ ६९ ॥ ऐसें जयास जालें ज्ञान । तया पुरुषाचें लक्षण । पुढिले समासीं निरूपण । बोलिलें असे ॥ ७० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्य-संवादे आत्मदर्शननाम समास अष्टम ॥ ८ ॥

॥ श्रीराम ॥ अंतरीं गेलियां अमृत । बाह्य काया लखलखित । अंतर-स्थिति बाणतां संत । लक्षणें कैसीं ॥ १ ॥ जालें आत्मज्ञान बरवें । हें कैसेनि पां जाणावें । म्हणोनि बोलिलीं स्वभावें । साधुलक्षणें ॥ २ ॥ ऐक सिद्धांचें लक्षण । सिद्ध म्हणिजे स्वरूप जाण । तेथें पाहातां वेगळेपण । मुळींच नाहीं ॥ ३ ॥ स्वरूप होऊन राहिजे । तया नांव सिद्ध बोलिजे । सिद्धस्वरूपींच साजे । सिद्धपण ॥ ४ ॥ वेदशास्त्रीं जें प्रसिद्ध । सस्वरूप स्वतःसिद्ध । तयासिच बोलिजे सिद्ध । अन्यथा न घडे ॥ ५ ॥ तथापी बोलों कांहीं येक । साधकास कळाया विवेक । सिद्धलक्षणाचें कौतुक । तें हें ऐसें असे ॥ ६ ॥ अंतरस्थित स्वरूप जाली । पुढें काया कैसी वर्तली । जैसी स्वप्नींची नाथिली । स्वप्नरचना ॥ ७ ॥ तथापी सिद्धांचें लक्षण । कांहीं करूं निरूपण । जेणें बाणे अंतर्खूण । परमार्थाची ॥ ८ ॥ सदा स्वरूपानुसंधान । हें मुख्य साधूचें

मिळाला, अनंताला अनंताचा अंत (पैलपार) लाभला, अमृत अमर झालें, निर्गुण निर्गुण झालें, संन्निध असून चुकलें होतें तें प्राप्त झालें, दुःस्वप्नांत नीच याति पावलेला ब्राह्मण ब्राह्मणपणास आला म्ह० 'आपणासि आपण सांपडला' अशा पुरुषांचीं लक्षणें आतां सांगतों (६०–७०). [द० ८, स० ८]

सिद्धाला ओळखतां यावें म्हणून सिद्धलक्षणें सांगतों. आंत अमृत गेलेल्या पुरुषाच्या बाह्य शरीरावरही त्याचीं लक्षणें उमटतात. त्याची काया दिव्य होते. सिद्ध म्हणजे ब्रह्मस्वरूप. दोहोंत भेद मुळींच नाहीं. तें तसें हें अनिर्वचनीय तथापि कळावें म्हणून बोलतों. अखंड स्वरूपानुसंधान हें साधूचें मुख्य लक्षण होय. तो जनांत असून जनावेगळा वागतो. तो संसारचिंता वाहत नाहीं. निरूपणाचें प्रेम धरितो (हें साधकाचेंही लक्षण आहे). सिद्धाचें बाह्यवर्तन साधकासारखेंच असतें, मात्र तो अंतरीं अखंड स्वरूपाकार असतो. त्याची चंचळ वृत्ति स्वरूपीं लागून स्वरूपाकारच झालेली असते म्हणून तो निश्चळ असतो. त्याचा देह चंचळ असला (चंचळाच्या क्रिया करीत असला) त्याचा देह हालला चालला तरी तो निश्चळच

लक्षण । जनीं असोन आपण । जनावेगळा ॥ ९ ॥ स्वरूपीं दृष्टी पडतां । तुटोन गेली संसारचिंता । पुढें लागली ममता । निरूपणाची ॥ १० ॥ हें साधकाचें लक्षण । परी सिद्धाअंगीं असे जाण । सिद्धलक्षण साधकेंविण । बोलोंच नये ॥ ११ ॥ बाह्य साधकाचे परी । आणी स्वरूपाकार अंतरीं । सिद्धलक्षण तें चतुरीं । जाणिजे ऐसें ॥ १२ ॥ संदेहरहित साधन । तेंचि सिद्धाचें लक्षण । अंतर्बाह्य समाधान । चळेना ऐसें ॥ १३ ॥ अचळ जाली अंतरस्थिती । तेथें चळणास कैंची गती । स्वरूपीं लागतां वृत्ती । स्वरूपचि जाली ॥ १४ ॥ मग तो चळतांच अचळ । चंचळपणें निश्चळ । निश्चळ असोन चंचळ । देह त्याचा ॥ १५ ॥ स्वरूपीं स्वरूपचि जाला । मग तो पडोनिच राहिला । अथवा उठोनि पळाला । तरी चळेना ॥ १६ ॥ येथें कारण अंतरस्थिती । अंतरींच पाहिजे निवृत्ती । अंतर लागलें भगवंतीं । तोचि साधु ॥ १७ ॥ बाह्य भलतैसें असावें । परी अंतर स्वरूपीं लागावें । लक्षणें दिसती स्वभावें । साधुअंगीं ॥ १८ ॥ राज्यीं बैसतां अवलिळा । अंगीं बाणे राजकळा । स्वरूपीं लागतां जिव्हाळा । लक्षणें बाणती ॥ १९ ॥ येरव्हीं अभ्यास करितां । हाता न चढती सर्वथा । स्वरूपीं राहावें तत्वतां । स्वरूप होउनी ॥ २० ॥ अभ्यासाचा मुगुटमणी । वृत्ती राहावी निर्गुणीं । संतसंगें निरूपणीं । स्थिती बाणे ॥ २१ ॥ ऐसीं लक्षणें बरवीं । स्वरूपाकारें अभ्यासावीं । स्वरूप सोडितां गोसावी । भांबावती ॥ २२ ॥ आतां असो हें बोलणें । ऐका साधूचीं लक्षणें । जेणें समाधान बाणे । साधकाआंगीं ॥ २३ ॥ स्वरूपीं भरतां कल्पना । तेथें कैंची उरेल कामना । म्हणोनियां साधुजना । कामचि नाहीं ॥ २४ ॥ कल्पिला विषयो हातींचा जावा । तेणें गुणें क्रोध यावा । साधुजनाचा अक्षै ठेवा जाणार नाहीं ॥ २५ ॥ म्हणोनि ते क्रोधरहित । जाणती स्वरूप संत । नासिवंत हे पदार्थ । सांडुनियां ॥ २६ ॥ जेथें नाहीं दुसरी परी । क्रोध यावा कोणावरी । क्रोधरहित सचराचरीं । साधुजन वर्तती ॥ २७ ॥

खरा. अंतरस्थिति मुख्य आहे. ज्याचें चित्त भगवंतीं तो साधु बाहेर कसाही म्ह० चारचौघांसारखा वागला तरी साधूचें अंतर स्वरूपीं लागलेलें असतें. राजा राज्यावर असला म्ह० राजैश्वर्यादिकीं युक्त असतो तसा साधु स्वरूपाकार असला कीं सिद्धलक्षणें त्याच्या अंगीं उमटतात. स्वरूपानुसंधान सोडून इतर साधनांचा अभ्यास करून तीं लक्षणें कोणी अंगीं आणूं म्हणेल तर तें दुरापास्त आहे. निर्गुणस्वरूपीं रहाणें हा अभ्यासाचा मुकुटमणि आहे, मुख्याभ्यास हाच. साधकानें श्रवणादिकांनीं स्वरूपाकार होऊन या लक्षणांचा अभ्यास करावा (१-२२). हीं साधुलक्षणें ऐकून साधकांच्या अंगीं समाधान बाणेल. साधूची सर्व कामना स्वरूपाकडे भरली असल्यामुळें त्याला काम नसतो. आपला म्हटलेला विषय

आपुला आपण स्वानंद । कोणावरी करावा मद । या कारणें वादवेवाद । तुटोन गेला ॥ २८ ॥ साधुस्वरूप निर्विकार । तेथें कैंचा तिरस्कार । आपला आपण मत्सर । कोणावरी करावा ॥ २९ ॥ साधु वस्तु अनायासें । याकारणें मत्सर नसे । मदमत्सराचें पिसें । साधुसी नाहीं ॥ ३० ॥ साधु स्वरूप स्वयंभ । तेथें कैंचा असेल दंभ । जेथें द्वैताचा आरंभ । जालाच नाहीं ॥ ३१ ॥ जेणें दृश्य केलें विसंच । तयाचा कैंचा हो प्रपंच । याकारणें निःप्रपंच । साधु जाणावा ॥ ३२ ॥ अवघें ब्रह्मांड त्याचें घर । पंचभूतिक हा जोजार । मिथ्या जाणोन सत्वर । त्याग केला ॥ ३३ ॥ याकारणें लोभ नसे । साधु सदा निर्लोभ असे । जयाची वासना समरसे । शुद्धस्वरूपीं ॥ ३४ ॥ आपुला आपण आघवा । स्वाथ कोणाचा करावा । म्हणोनि साधु तो जाणावा । स्वार्थरहित ॥ ३५ ॥ दृश्य सांडून नासिवंत । स्वरूप सेविलें शाश्वत । याकारणें शोकरहित । साधु जाणावा ॥ ३६ ॥ शोकें दुखवावी वृत्ती । तरी ते जाहाली निवृत्ती । म्हणोनि साधु आदिअंतीं । शोकरहित ॥ ३७ ॥ मोहें झळंबावें मन । तरी तें जाहालें उन्मन । याकारणें साधुजन । मोहातीत ॥ ३८ ॥ साधु वस्तु अद्वय । तेथें कैंच वाटेल भय । परब्रह्म तें निर्भय । तोचि साधु ॥ ३९ ॥ याकारणें भयातीत । साधु निर्भय निवांत । सकळांस मांडेल अंत । साधु अनंतरूपी ॥ ४० ॥ सत्यस्वरूपें अमर जाला । भय कैंचें वाटेल त्याला । याकारणें साधुजनाला । भयचि नाहीं ॥ ४१ ॥ जेथें नाहीं द्वंदभेद । आपला आपण अभेद । तेथें कचा उठेल खेद । देहबुद्धीचा ॥ ४२ ॥ बुद्धीनें नेमिलें निगुणा । त्यास कोणीच नेईना । याकारणें साधुजना । खेदचि नाहीं ॥ ४३ ॥ आपण येकला ठाईंचा । स्वार्थ करावा

हातचा गेला तर क्रोध येतो, पण साधूचा अक्षय्य ठेवा कधींच जाणारा नाहीं म्हणून त्याला क्रोधही नसतो. नाशवंत पदार्थांविषयीं विवेकी पुरुषांला कामक्रोधलोभादि वाटत नाहींत. आपल्यावांचून दुसरें कोणीच नाहीं असा अद्वयभाव साधूचा असल्यामुळें त्याला क्रोधच नाहीं. आपण स्वानंदरूप आहोंत, आतां मद कोणावर म्हणून ? साधूला मद नसतां, व तो वादविवाद तटून जातो. साधुस्वरूप निर्विकार, म्हणून तेथें तिरस्कार, मत्सर, दंभ, इ० विकार नसतात. दृश्यच मिथ्या हा बोध दृढ असल्यामुळें व हें ब्रह्मांडच त्याचें घर झाल्यानें साधूला प्रपंच व पंचभौतिक जोजार (खटपट) नाहीं म्हणून साधु निष्प्रपंच. दृश्य मिथ्या हें जाणलेलें, वासना शुद्ध स्वरूपीं समरस होऊन गेलेली मग साधूला लाभ कशाचा होणार ? 'आपुला आपण आघवा' म्हणून स्वार्थ नाहीं. दृश्य विवेकानें सोडून स्वरूपीं स्थिरावलेला म्हणून शोक नाहीं. शोकानें वृत्ति दुखवते; या निवृत्त पुरुषाला शोक कुठला ? मोहानें मन झळंबावें, पण हा उन्मन झालेला म्हणून साधु निर्मोह. अद्वय झालेल्या साधूला द्वैत नाहीं व म्हणून भयही नाहीं, तो सदा निर्भय. सर्व चराचराचा अंत होईल पण परब्रह्म अनंत अमर; अनंतस्वरूपी साधुही तसाच. 'आपला आपण अभेद' म्हणून साधूला द्वंद्वभेद नाहीं व देहबुद्धीचा खेद नाहीं. बुद्धि निर्गुणाला झोंबलेली म्हणून गुणत्रयाचा साधूला बाध नाहीं, तो गुणातीत दृश्य नाहीं व आपलें आपण एक,

कोणाचा । दृश्य नस्तां स्वार्थाचा । ठावचि नाहीं ॥ ४४ ॥ साधु आपणचि येक । तेथें कैंचा दुःखशोक । दुजेविण अविवेक । येणार नाहीं ॥ ४५ ॥ आशा धरितां परमार्थाची । दुराशा तुटली स्वार्थाची । म्हणौन नैराश्यता साधूची । वोळखण ॥ ४६ ॥ मृदपणें जैसें गगन । तैसें साधूचें लक्षण । याकारणें साधुवचन । कठीण नाहीं ॥ ४७ ॥ स्वरूपाचा संयोगीं । स्वरूपचि जाला योगी । याकारणें वीतरागी । निरंतर ॥ ४८ ॥ स्थिति बाणतां स्वरूपाची । चिंता सोडिली देहाची । याकारणें होणाराची । चिंता नसे ॥ ४९ ॥ स्वरूपीं लागतां बुद्धी । तुटे अवघी उपाधी । याकारणें निरुपाधी । साधुजन ॥ ५० ॥ साधु स्वरूपींच राहे । तेथें संगचि न साहे । म्हणोनि साधु तो न पाहे । मानापमान ॥ ५१ ॥ अलक्षास लावी लक्ष । म्हणोन साधु परम दक्ष । वोढूं जाणे कैपक्ष । परमार्थाचा ॥ ५२ ॥ स्वरूपीं न साहे मळ । म्हणोन साधु तो निर्मळ । साधु स्वरूपचि केवळ । म्हणोनियां ॥ ५३ ॥ सकळ धर्मामध्यें धर्म । स्वरूपीं राहणें हा स्वधर्म । हेंचि जाणिजे मुख्य वर्म । साधुलक्षणाचें ॥ ५४ ॥ धरितां साधूची संगती । आपषाच लागे स्वरूपस्थिती । स्वरूपस्थितीनें बाणती । लक्षणें आंगीं ॥ ५५ ॥ ऐसीं साधूचीं लक्षणें । आंगीं बाणती निरूपणें । परंतु स्वरूपीं राहाणें । निरंतर ॥ ५६ ॥ निरंतर स्वरूपीं राहातां । स्वरूपचि होईजे तत्वतां । मग लक्षणें आंगीं बाणतां । वेळ नाहीं ॥ ५७ ॥ स्वरूपीं राहिल्या मती । अवगुण अवघेचि जाती । परंतु यासी सत्संगती । निरूपण पाहिजे ॥ ५८ ॥ सकळ सृष्टीचा ठाईं । अनुभव येकचि नाहीं । तो बोलिजेल सर्वही । पुढिले समासीं ॥ ५९ ॥ कोणें स्थितीनें राहाती । कैसा अनुभव पाहाती । रामदास म्हणे श्रोतीं । अवधान द्यावें ॥ ६० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सिद्धलक्षणनाम समास नवम ॥ ९ ॥

मग स्वार्थ, दुःखशोक, अविवेक हे कोठचे ? परमार्थाची वासना धरल्यामुळें साधु स्वार्थाच्या दुराशेपासून सुटलेला, म्हणून नैराश्यता ही साधूची खूण होय. साधु गगनासारखा मृदु, तसाच व्यापक व असंग असतो. स्वरूपीं त्याचा निरंतर योग म्हणून वीतराग म्ह० बाह्य विषयांचें प्रेम नाहीं. देहबुद्धि सोडली मग चिंता कोण करणार ? सदा स्वरूपीं राहणें म्हणून उपाधि नाहीं. साधु सदा निरुपाधि, निःसंग, अलक्ष्य वस्तूला निरंतर लक्षणारा साधु, त्याच्यापरता दक्ष कोण असणार ? परमार्थाचा कैवारी साधुच. स्वरूप निर्मळ म्हणून स्वरूपीं राहणारा साधुही निर्मळ. सकळ धर्मांतला परमधर्म म्ह० स्वरूपीं राहणें. साधूला ओळखायची ही मुख्य खूण होय. (२३–५४). अशा साधूच्या संगतींत आपोआपच स्वरूपस्थिति साधकाचे अंगीं जडते. श्रवणनिरूपणाभ्यासानें वरील लक्षणें अंगीं बाणतात ; पण स्वरूपाकार राहणें व स्वरूपाकार झालेल्या साधूचा संग करणें हें उत्तम. स्वरूपीं राहतां अनायासें स्वरूपस्थिति बाणते. स्वरूप एक व त्याचा अनुभवही एक हें आतां सांगूं (५५–६०). [द० ८, स० ९]

॥ श्रीराम ॥ जनाचे अनुभव पुसतां । कळहो उठिला अवचिता । हा कथाकल्लोळ श्रोतां । कौतुकें ऐकावा ॥ १ ॥ येक म्हणती हा संसार । करितां पाविजे पैलपार । आपला नव्हे कीं जोजार । जीव देवाचे ॥ २ ॥ येक म्हणती हें न घडे । लोभ येऊन आंगीं जडे । पोटस्ताकारणें घडे । सेवा कुटुंबाची ॥ ३ ॥ येक म्हणती स्वभावें । संसार करावा सुखें नावें । कांहीं दानपुण्य करावें । सद्गतीकारणें ॥ ४ ॥ येक म्हणती संसार खोटा । वैराग्यें घ्यावा देशवटा । येणें स्वर्गलोकींच्या वाटा । मोकळ्या होती ॥ ५ ॥ येक म्हणती कोठें जावें । व्यर्थचि कासया हिंडावें । आपुले आश्रमीं असावें । आश्रमधर्म करूनी ॥ ६ ॥ येक म्हणती केंचा धर्म । अवघा होतसे अधर्म । ये संसारीं नाना कर्म । करणें लागे ॥ ७ ॥ येक म्हणती बहुतांपरी । वासना असावी बरी । येणेंचि तरिजे संसारीं । अनायासें ॥ ८ ॥ येक म्हणती कारण भाव । भावेंचि पाविजे देव । येर हें अवघेंचि वाव । गथागोवी ॥ ९ ॥ येक म्हणती वडिलें जीवीं । अवधीं देवचि मानावीं । मायेबापें पूजित जावीं । येका भावें ॥ १० ॥ येक म्हणती देव-ब्राह्मण । त्यांचें करावें पूजन । मायबाप नारायण । विश्वजनांचा ॥ ११ ॥ येक म्हणती शास्त्र पाहावें । तेथें निरोपिलें देवें । तेणें प्रमाणेंचि जावें । परलोकासी ॥ १२ ॥ येक म्हणती अहो जना । शास्त्र पाहातां पुरवेना । याकारणें साधुजनां । शरण जावें ॥ १३ ॥ येक म्हणती सांठा गोठी । वायांचि करितां चाउटी । सर्वांस कारण पोटीं । भुतदया असावी ॥ १४ ॥ येक म्हणती येकचि बरवें । आपुल्या आचारें असावें । अंतकाळीं नाम घ्यावें । सर्वोत्तमाचें ॥ १५ ॥ येक म्हणती पुण्य असेल । तरीच नाम येईल ।

मतामतांचा कल्लोळ प्रापंचिक म्ह० अज्ञजन व सुज्ञानी या दोघांतही कसा उठला आहे हें या समासांत सांगतात. प्रथम अज्ञान्यांचीं मतें पाहा–१ ला – अहो ! हा संसार करितांनाच परमार्थ होतो. स्त्रीपुत्रादि सर्व देवाचेच जीव आहेत म्हणून त्यांची सेवा ती देवाचीच सेवा होय. २ रा–छे हो ! कुटुंबाची सेवा आपण पोटासाठीं लोभानें करितों. ३ रा–संसार करावाच, पण कांहीं दानपुण्यही करावें कीं गति मिळते ; ४ था–कांहीं नाहीं, संसार खोटा आहे. वैराग्य धरून देशधडी व्हावें तेव्हां स्वर्गाची वाट सांपडते. ५ वा–अहो ! जातां कुठें नी येतां कुठें ? आश्रमधर्म नीट पाळावेत, म्हणजे झालें. ६ वा–संसारांत भलीं बुरीं कर्मे करावीं लागतात. धर्म करतां अधर्म होतो. ७ वा – वासना चांगली ठेवावी म्हणजे झालें. ८ वा – भाव असावा, 'भावेंचि पाविजे देव ;' बाकी सर्व व्यर्थ. ९ वा–'मायबापें पूजीत जावीं ! एक्या भावें ' त्यांत सर्व साधतें. १० वा–देवाब्राह्मणांचें पूजन करावें म्हणजे नारायण प्रसन्न होतो. ११ वा–शास्त्र पहावें तसें वागावें, 'तस्माच्छास्त्रं प्रमाणं' तें. १२ वा–अहो ! ' शास्त्र पाहतां पुरेना । याकारणें साधुजना । शरण जावें.' १३ वा–या साऱ्या गोष्टी सोडा. ' सर्वांस कारण पोटीं । भूतदया असावी. ' १४ वा– आपल्या आचारानें चालावें, अंतीं नाम घ्यावें कीं सुटका होते. १५ वा–खरें ! पण पदरीं पुण्य असेल तर आठवतें, ' नाहीं तरी भुली पडेल । अंतकाळीं. ' १६ वा–जितां सार्थक करावें व त्यासाठीं

नाहीं तरी भुली पडेल । अंतकाळीं ॥ १६ ॥ येक म्हणती जीत असावें । तंवचि सार्थक करावें । येक म्हणती फिरावें । तीर्थाटण ॥ १७ ॥ येक म्हणती हे अटाटी । पाणीपाषाणाची भेटी । चुबकुळ्या मारितां हिंपुटी । कासाविस व्हावें ॥ १८ ॥ येक म्हणती सांडी वाचाळी । अगाध महिमा भूमंडळीं । दर्शनमात्रें होय होळी । महापातकांची ॥ १९ ॥ येक म्हणती तीर्थ स्वभावें । कारण मन आवरावें । येक म्हणती कीर्तन करावें । सावकास ॥ २० ॥ येक म्हणती योग बरवा । मुख्य तोचि आधीं साधावा । देहो अमरचि करावा । अकस्मात ॥ २१ ॥ येक म्हणती ऐस काय । काळवंचना करूं नये । येक म्हणती धरावा सोय । भक्तिमार्गाची ॥ २२ ॥ येक म्हणती ज्ञान बरवें । येक म्हणती साधन करावें । येक म्हणती मुक्त असावें । निरंतर ॥ २३ ॥ येक म्हणती अनर्गळा । धरीं पापाचा कंटाळा । येक म्हणती रे मोकळा । मार्ग आमुचा ॥ २४ ॥ येक म्हणती हें निःशेष । करूं नये निंदाद्वेष । येक म्हणती सावकास । दुष्टसंग त्यागावा ॥ २५ ॥ येक म्हणती ज्याचें खावें । त्या सन्मुखचि मरावें । तेणें तत्काळचि पावावें । मोक्षपद ॥ २६ ॥ येक म्हणती सांडा गोठी । आधीं पाहिजे ते रोटी । मग करावी चाउटी । सावकास ॥ २७ ॥ येक म्हणती पाउस असावा । मग सकळ योग बरवा । कारण दुष्काळ न पडावा । म्हणिजे बरें ॥ २८ ॥ येक म्हणती तपोनिधी । होतां वोळती सकळ सिद्धी । येक म्हणती रे आधीं । इंद्रपद साधावें ॥ २९ ॥ येक म्हणती आगम पाहावा । वेताळ प्रसन्न करून घ्यावा । तेणें पाविजे देवा । स्वर्गलोकीं ॥ ३० ॥ येक म्हणती अघोरमंत्र । तेणें होईजे स्वतंत्र । श्रीहरी जयेचा कळत्र । तेची वोळे ॥ ३१ ॥ ती लागले सर्व धर्म । तेथें कैंचें क्रियाकर्म । येक म्हणती कुकर्म । तिच्या मदें ॥ ३२ ॥ येक म्हणती येक साक्षप । करावा मृत्यंजयाचा जप । तेणें गुणें सर्व संकल्प । सिद्धीतें पावती ॥ ३३ ॥ येक म्हणती बटु भैरव । तेणें पाविजे वैभव ।

'फिरावें तीर्थाटण.' १७ वा—छे ! त्यांत काय ? 'पाणी पाषाणाची भेटी । चुबकुळ्या मारितां हिंपुटी । कासावीस व्हावें ।' १८ वा—मन आवरावें हें मुख्य साधावें. १९ वा—त्याचसाठीं मी म्हणतों कीर्तन करावें. २० वा—ऐका, सर्वांत योग बरवा त्यानें देहच अमर होतो ! २१ वा—छे ! काळवंचना चांगली नाहीं, भक्तिमार्गाची सोय धरावी. २२ वा—ज्ञानमार्ग उत्तम. निरंतर मुक्त असावें. २३ वा—'करूं नये निंदा द्वेष । दुष्टसंग त्यजावा' म्हणजे पुरे. २४ वा—ज्याचें खावें त्या सन्मुख मरावें म्हणजे मोक्ष मिळतो. २५ वा—'आधीं पाहिजे ते रोटी'—पाऊस पाणी विपुल, दुष्काळ नको ! अशीं बहुत मतें जगांत दृष्टीस पडतात. कुणी तप, कुणी अघोरमंत्र, कुणी मृत्युंजयाचा जप, कुणी भद्रकाळीची पूजा

येक म्हणती झोटिंग सर्व । पुर्वीतसे ॥ ३४ ॥ येक म्हणती काळी कंकाळी । येक म्हणती भद्रकाळी । येक म्हणती उच्छिष्ट चांडाळी । साहें करावी ॥ ३५ ॥ येक म्हणती विघ्नहर । येक म्हणती भोळा शंकर । येक म्हणती सत्वर । पावे भगवती ॥ ३६ ॥ येक म्हणती मल्लारी । सत्वरचि सभाग्य करी । येक म्हणती महा बरी । भक्ति वेंकटेशाची ॥ ३७ ॥ येक म्हणती पूर्व ठेवा । येक म्हणती प्रेत्न करावा । येक म्हणती भार घालावा । देवाचवरी ॥ ३८ ॥ येक म्हणती देव कैंचा । अंतचि पाहातो भल्यांचा । येक म्हणती हा युगाचा । युगधर्म ॥ ३९ ॥ येक आश्चर्य मानिती । येक विस्मयो करिती । येक कंटाळोन म्हणती । काय होईल तें पाहावें ॥ ४० ॥ ऐसे प्रपंचिक जन । लक्षणें सांगतां गहन । परंतु कांहींयेक चिन्ह । अल्पमात्र बोलिलें ॥ ४१ ॥ आतां असो हा स्वभाव । ज्ञात्यांचा कैसा अनुभव । तोहि सांगिजेल सर्व । सावध ऐका ॥ ४२ ॥ येक म्हणती करावी भक्ती । श्रीहरी देईल सद्गती । येक म्हणती ब्रह्मप्राप्ती । कर्मेंचि होये ॥ ४३ ॥ येक म्हणती भोग सुटेना । जन्ममरण हें तुटेना । येक म्हणती उर्मी नाना । अज्ञानाच्या ॥ ४४ ॥ येक म्हणती सर्व ब्रह्म । तेथें कैचें क्रियाकर्म । येक म्हणती हा अधर्म । बोलोंचि नये ॥ ४५ ॥ येक म्हणती सर्व नासे । उरलें तेंचि ब्रह्म असे । येक म्हणती ऐसें नसे । समाधान ॥ ४६ ॥ सर्व ब्रह्म केवळ ब्रह्म । दोनी पूर्वपक्षाचे भ्रम । अनुभवाचें वेगळें वर्म । म्हणती येक ॥ ४७ ॥ येक म्हणती हें न घडे । अनिर्वाच्य वस्तु घडे । जें बोलतां मौन्य पडे । वेदशास्त्रांसीं ॥ ४८ ॥ तंव श्रोता अनुवादला । म्हणे निश्चयो कोणी केला । सिद्धांतमतें अनुभवाला । उरी कैंची ॥ ४९ ॥ अनुभव देहीं वेगळाले । हें पूर्वीच बोलिलें । आतां कांहीं येक केलें । नवचे कीं ॥ ५० ॥ येक साक्षत्वें वर्तती । साक्षी वेगळाचि

कुणी गणेशाची, कुणी हरिहराची पूजा याप्रमाणें जो तो आपलें मत सांगत असतो. कुणी म्हणतात 'यत्न करावा,' कुणी म्हणतात 'छे! भार घालावा देवाचवरी!' कुणी म्हणतात 'भल्यांचा अंत पाहतो, तो देव कसचा?' कुणी म्हणतात 'अहो हें कलियुग.' कुणी आश्चर्यांतच स्तब्ध आहेत. हीं अज्ञान्यांचीं मतें सांगितलीं (१-४१). हीं पुष्कळ आहेत पण 'अल्पमात्र बोलिलों' आहे! आतां ज्ञात्यांचीं मतें ऐका-१ ला—श्रीहरीची भक्ति करावी म्ह० तो सद्गति देतो. २ रा—छे! असें नव्हे, कर्ममार्गानेंच ब्रह्मप्राप्ति होते म्हणून कर्म करावें. ३ रा—भोग सुटत नाहीं न् जन्ममरण तुटत नाहीं, कांहींच करूं नये. ४ था—सर्वच ब्रह्मच आहे, तेथें कोठलें कर्म नि कोठला धर्म. ५ वा—चूप! असें धर्मलंडपणाचें भाषण करूं नये. ६ वा—सर्व नाशवंत आहे व उरलें तें ब्रह्मच आहे. ७ वा—समाधानाचा हा मार्ग नाहीं. सर्व ब्रह्म व केवळ ब्रह्म हे पूर्वपक्ष आहेत, अनुभव न्याराच आहे! ८ वा—अनुभवही पूर्वपक्षांतलाच आहे. निश्चय करणारा कोण? ९ वा—आपण साक्षित्वानें रहावें, साक्षी वेगळाच आहे; दृश्याहून द्रष्टा वेगळा आहे, आत्मा पदार्थापलीकडचा आहे. तो देहांत असून अलिप्त आहे.

म्हणती । आपण द्रष्टा ऐसी स्थिती । स्वानुभवाची ॥ ५१ ॥ दृश्यापासून द्रष्टा वेगळा । ऐसी अलिप्तपणाची कळा । आपण साक्षत्वें निराळा । स्वानुभवें ॥ ५२ ॥ सकळ पदार्थ जाणतां । तो पदार्थाहून पर्ता । देहीं असोनि अलिप्तता । सहजचि जाली ॥ ५३ ॥ येक ऐसें स्वानुभवें । म्हणती साक्षत्वें वर्तावें । दृश्य असोनि वेगळें व्हावें । द्रष्टेपणें ॥ ५४ ॥ येक म्हणती नाहीं भेद । वस्तु ठाईंची अभेद । तेथें कैंचा मतिमंद । द्रष्टा आणिला ॥ ५५ ॥ अवघी साकरचि स्वभावें । तेथें कडु काय निवडावें । द्रष्टा कैंचा स्वानुभवें । अवघेंचि ब्रह्म ॥ ५६ ॥ प्रपंच परब्रह्म अभेद । भेदवादी मानिती भेद । परी हा आत्मा स्वानंद । आकारला ॥ ५७ ॥ विघुरलें तुप थिजलें । तैसें निर्गुणचि गुणा आलें । तेथें काय वेगळें केलें । द्रष्टेपणें ॥ ५८ ॥ म्हणोनि द्रष्टा आणि दृश्य । अवघा येकचि जगदीश । द्रष्टेपणाचे सायास । कासयासी ॥ ५९ ॥ ब्रह्मचि आकारलें सर्व । ऐसा येकांचा अनुभव । ऐसे हे दोनी स्वभाव । निरोपिले ॥ ६० ॥ अवघा आत्मा आकारला । आपण भिन्न कैंचा उरला । दुसरा अनुभव बोलिला । ऐसियापरी ॥ ६१ ॥ एक तिसरा अनुभव । प्रपंच सारुनियां सर्व । कांहीं नाहीं तोचि देव । ऐसें म्हणती ॥ ६२ ॥ दृश्य अवघें वेगळें केलें । केवळ अदृश्यचि उरलें । तेंचि ब्रह्म अनुभविलें । म्हणती येक ॥ ६३ ॥ परी तें ब्रह्म म्हणों नये । उपायासारिखा अपाये । शून्यत्वास ब्रह्म काये । म्हणों येईल ॥ ६४ ॥ दृश्य अवघें वोलांडिलें । अदृश्य शून्यत्वीं पडिलें । ब्रह्म म्हणोनि मुरडलें । तेथूनि माघारें ॥ ६५ ॥ इकडे दृश्य तिकडे देव । मध्यें शून्यत्वाचा ठाव । तयास प्राणी मंदबुद्धीस्तव । ब्रह्म म्हणे ॥ ६६ ॥ रायास नाहीं वोळखिलें । सेवकास रावसें कल्पिलें । परी तें अवघें व्यर्थ गेलें । राजा देखतां ॥ ६७ ॥ तैसें शून्यत्व कल्पिलें ब्रह्म । पुढें देखतां परब्रह्म । शून्यत्वाचा अवघा भ्रम । तुटोन गेला ॥ ६८ ॥ परी हा सूक्ष्म आडताळा । वारी विवेकें वेगळा । जैसें

या बोधानें अकर्ता व्हावें. १० वा–परमात्मवस्तु एकीएक आहे, तेथें हा द्रष्टा कोण आणलास ? सर्वच साखर त्यांत कडु कणच नाहीं. द्रष्टा नाहीं न दृश्य नाहीं अवघेंच ब्रह्म आहे. प्रपंच व परब्रह्म अभिन्न आहेत, भेदवादी भेद करितात पण आत्माच जगद्रूपानें विस्तारला आहे. पातळ तुपाचेंच घट्ट तूप होतें, तसें निर्गुणच साकारलें आहे. द्रष्टा व दृश्य एक परब्रह्मच. ११ वा–प्रपंच सारावा म्हणजे कांहीं नाहीं तोच म्ह० शून्य हाच देव. १२ वा–वाहवा ! शून्याला ब्रह्म म्हणतां येत नाहीं (४२–६६). दृश्य व द्रष्टा एक हें सर्व ब्रह्मवाद्यांचें मत, द्रष्टा दृश्याहून वेगळा आहे हें साक्षीवाद्यांचें मत व कांहीं नाहीं हें शून्यवाद्यांचें मत अशीं तीन मतें वर सांगितलीं आहेत. शून्यवादाचा येथें निरास केला पाहिजे. इकडे दृश्य व तिकडे देव

दुग्ध घेऊन जळा । राजहंस सांडी ॥ ६९ ॥ आधीं दृश्य सोडिलें । मग शून्यत्व वोलांडिलें । मूळमायेपरतें देखिलें । परब्रह्म ॥ ७० ॥ वेगळेपणें पाहाणें घडे । तेणें वृत्ति शून्यत्वीं पडे । पोटीं संदेह पवाडे । शून्यत्वाचा ॥ ७१ ॥ भिन्नपणें अनुभविलें । तयास शून्य ऐसें बोलिलें । वस्तु लक्षितां अभिन्न जालें । पाहिजे आधीं ॥ ७२ ॥ वस्तु आपणचि होणें । ऐसें वस्तूचें पाहाणें । निश्चयेसीं भिन्नपणें । शून्यत्व लाभे ॥ ७३ ॥ याकारणें शून्य कांहीं । परब्रह्म होणार नाहीं । वस्तुरूप होऊन पाहीं । स्वानुभवें ॥ ७४ ॥ आपण वस्तु सिद्धचि आहे । मन मी ऐसें कल्पूं नये । साधु सांगती उपाये । तूंचि आत्मा ॥ ७५ ॥ मन मी ऐसें नाथिलें । संतीं नाहीं निरोपिलें । मानावें कोणाच्या बोलें । मन मी ऐसें ॥ ७६ ॥ संतवचनीं ठेवितां भाव । तोचि शुद्ध स्वानुभव । मनाचा तैसाच स्वभाव । आपण वस्तु ॥ ७७ ॥ ज्याचा घ्यावा अनुभव । तोचि आपण निरावेव । आपुला घेती अनुभव । विश्वजन ॥ ७८ ॥ लोभी धन साधूं गेले । तंव ते लोभी धनचि जाले । मग ते भाग्यपुरुषीं भोगिले । सावकास ॥ ७९ ॥ तैसें देहबुद्धि सोडितां । साधकास जालें तत्वतां । अनुभवाची मुख्य वार्ता । ते हे ऐसी ॥ ८० ॥ आपण वस्तु मुळीं येक । ऐसा ज्ञात्याचा विवेक । येथून हा ज्ञानदशक । संपूर्ण जाला ॥ ८१ ॥ आत्मज्ञान निरोपिलें । यथामतीनें बोलिलें । न्यूनपूर्ण क्षमा केलें । पाहिजे श्रोतीं ॥ ८२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे शून्यत्वनिरसननाम समास दशम ॥ १० ॥

(शुद्ध ब्रह्म) यांमध्यें शून्य कल्पून त्या शून्यासच मतिमंद प्राणी ब्रह्म म्हणतात, पण शून्य कांहीं ब्रह्म नव्हे. राजाला न ओळखतां मधल्या एखाद्या सेवकालाच राजा समजणाऱ्यांची प्रत्यक्ष राजाला पाहिल्यावर जशी फजिती होते तशीच या शून्यवाद्यांची होते. ते शून्यालाच ब्रह्म म्हणतात, पण पुढें ब्रह्म देखतांच शून्यत्वाचा भ्रम निघून जातो. हा शून्यत्वाचा सूक्ष्म प्रतिबंध (आडताळा) विवेकानें दूर करून मुनिराजहंस परमामृत प्राशन करितात. आधीं दृश्य सोडावें, मग शून्यत्व ओलांडावें, व मूळ मायेपरतें परब्रह्म पहावें, पण वस्तूला पहावें म्ह० आपणच वस्तु होऊन जावें, वस्तूहून आपण वेगळे आहोंत अशा भिन्नत्वानें पाहिलें म्हणजे प्राणी शून्यत्वांत पडतो. पण वस्तूला लक्षितां वस्तूशीं अभिन्न झालें पाहिजे. तात्पर्य शून्य कांहीं परब्रह्म नाहीं, वस्तुरूप होऊन स्वानुभवानें वस्तु पहावी. मन मी अशी कल्पना टाकून द्यावी व आत्मा मी हा साधुबोध चित्तीं धरून आपण वस्तुच सिद्ध आहोंत असा निश्चय ठेवावा. मन मी असें कोणीच संत म्हणत नाहींत, मग कोणाच्या आधारावर ‘ मन मी ’ असें म्हणावें ? संतवचनीं विश्वास हाच स्वानुभव आहे. मन मीच वस्तु असें म्हणून मध्यें उगीच लुडबुडतें. ज्या निराकार, निर्गुण, निरंजनाचा अनुभव घ्यावा तेंच आपण व्हावें, लोभी धनाच्या ध्यासानें धनच होतात व इतरांच्या उपयोगी येतात, तसें आत्मरूप होऊन जनांच्या कार्यांत उरावें. आपण वस्तूच आहोंत, हाच ज्ञानाचा विवेक. ज्ञानदशक येथें संपला (६७–८२). [द. ८, स. १०]

****

|| जय जय रघुवीर समर्थ ||

|| सार्थ श्रीदासबोध ||

|| दशक नवम गुणरूपनाम || ९ ||

|| श्रीराम || निराकार म्हणिजे काय । निराधार म्हणिजे काय । निर्विकल्प म्हणिजे काय । मज निरोपावें || १ || निराकार म्हणिजे आकार नाहीं । निराधार म्हणिजे आधार नाहीं । निर्विकल्प म्हणिजे कल्पना नाहीं । परब्रह्मासी || २ || निरामय म्हणिजे काय । निराभास म्हणिजे काय । निरावेव म्हणिजे काय । मज निरोपावें || ३ || निरामय म्हणिजे जळमय नाहीं । निराभास म्हणिजे भासचि नाहीं । निरावेव म्हणिजे अवेव नाहीं । परब्रह्मासी || ४ || निःप्रपंच म्हणिजे काय । निःकळंक म्हणिजे काय । निरोपाधी म्हणिजे काय । मज निरोपावें || ५ || निःप्रपंच म्हणिजे प्रपंच नाहीं । निःकळंक म्हणिजे कळंक नाहीं । निरोपाधी म्हणिजे उपाधी नाहीं । परब्रह्मासी || ६ || निरोपम्य म्हणिजे काय । निरालंब म्हणिजे काय । निरापेक्षा म्हणिजे काय । मज निरोपावें || ७ || निरोपम्य म्हणिजे उपमा नाहीं । निरालंब म्हणिजे अवलंबन नाहीं । निरापेक्षा म्हणिजे अपेक्षा नाहीं । परब्रह्मासी || ८ || निरंजन म्हणिजे काय । निरंतर म्हणिजे काय । निर्गुण म्हणिजे काय । मज निरोपावें || ९ || निरंजन म्हणिजे जनचि नाहीं । निरंतर म्हणिजे अंतर नाहीं । निर्गुण म्हणिजे गुणचि नाहीं । परब्रह्मासी || १० || निःसंग म्हणिजे काय । निर्मळ म्हणिजे काय । निश्चळ म्हणिजे काय । मज निरोपावें || ११ || निःसंग म्हणिजे संगचि नाहीं । निर्मळ म्हणिजे मळचि नाहीं । निश्चळ म्हणिजे चळण नाहीं । परब्रह्मासी || १२ || निशब्द म्हणिजे काय । निर्दोष म्हणिजे काय । निवृत्ती म्हणिजे काय । मज निरोपावें || १३ || निशब्द म्हणिजे शब्दचि नाहीं ।

ह्या समासांतील ओंव्यांचा अर्थ देण्याचें कारणच नाहीं. ब्रह्म अनिर्वाच्य आहे. लक्षणांनीं किंवा विशेषणांनीं तें सांगतां येत नाहीं. तें ' असें आहे ' म्हणून सांगवत नाहीं, पण ' हें तें नाहीं किंवा असें तें नाहीं ' एवढेंच म्हणतां येतें. निराकार, निर्विकार, निर्विकल्प, अजन्मा, अनाम, अप्रत्यक्ष, अरूप, अशा व्यावर्तक विशेषणांनीं त्याची फक्त खूण दाखवितां येते. हें

निर्दोष म्हणिजे दोषचि नाहीं । निवृती म्हणिजे वृतिच नाहीं । परब्रह्मासी ॥ १४ ॥ निःकाम म्हणिजे काय । निर्लेप म्हणिजे काय । निःकर्म म्हणिजे काय । मज निरोपावें ॥ १५ ॥ निःकाम म्हणिजे कामचि नाहीं । निर्लेप म्हणिजे लेपचि नाहीं । निःकर्म म्हणिजे कर्मचि नाहीं । परब्रह्मासी ॥ १६ ॥ अनाम्य म्हणिजे काय । अजन्मा म्हणिजे काय । अप्रत्यक्ष म्हणिजे काय । मज निरोपावें ॥ १७ ॥ अनाम्य म्हणिजे नामचि नाहीं । अजन्मा म्हणिजे जन्मचि नाहीं । अप्रत्यक्ष म्हणिजे प्रत्यक्ष नाहीं । परब्रह्म तें ॥ १८ ॥ अ-गणित म्हणिजे काय । अकर्तव्य म्हणिजे काय । अक्षै म्हणिजे काय । मज निरोपावें ॥ १९ ॥ अगणित म्हणिजे गणित नाहीं । अकर्तव्य म्हणिजे कर्तव्यता नाहीं । अक्षै म्हणिजे क्षयाचि नाहीं । परब्रह्मासी ॥ २० ॥ अरूप म्हणिजे काय । अलक्ष म्हणिजे काय । अनंत म्हणिजे काय । मज निरो-पावें ॥ २१ ॥ अरूप म्हणिजे रूपचि नाहीं । अलक्ष म्हणिजे लक्षत नाहीं । अनंत म्हणिजे अंतचि नाहीं । परब्रह्मासी ॥ २२ ॥ अपार म्हणिजे काय । अढळ म्हणिजे काय । अतर्क्य म्हणिजे काय । मज निरोपावें ॥ २३ ॥ अपार म्हणिजे पाराचि नाहीं । अढळ म्हणिजे ढळचि नाहीं । अतर्क्य म्हणिजे तर्कत नाहीं । परब्रह्म तें ॥ २४ ॥ अद्वैत म्हणिजे काय । अदृश्य म्हणिजे काय । अच्युत म्हणिजे काय । मज निरोपावें ॥ २५ ॥ अद्वैत म्हणिजे द्वैतचि नाहीं । अदृश्य म्हणिजे दृश्यचि नाहीं । अच्युत म्हणिजे चेवत नाहीं । परब्रह्म तें ॥ २६ ॥ अछेद म्हणिजे काय । अदाह्य म्हणिजे काय । अक्लेद म्हणिजे काय । मज निरोपावें ॥ २७ ॥ अछेद म्हणजे छेदेना । अदाह्य म्हणिजे जळेना । अक्लेद म्हणिजे कालवेना । परब्रह्म तें ॥ २८ ॥ परब्रह्म म्हणिजे सकळांपरतें । तयास पाहातां आपणचि तें । हें कळे अनुभवमतें । सद्गुरु केलियां ॥ २९ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्य-संवादे आशंकानाम समास प्रथम ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥ जें जें कांहीं साकार दिसे । तें तें कल्पांतीं नासे । स्वरूप तें असतचि असे । सर्वकाळ ॥ १ ॥ जें सकळांमध्यें सार । मिथ्या नव्हे तें

दर्शविण्यासाठीं समर्थांनीं प्रस्तुत समास लिहिला आहे. 'न इति न इति' म्ह० 'नेति नेति' याचा अर्थ हाच आहे. प्रस्तुत समासाबरोबर शिवकवचस्तोत्रांतील ३० वा मंत्र वाचावा (१–२९). [द. ९, स. १]

सकळांचें जें सार तें भगवंताचें निजरूप, त्यालाच स्वरूप म्हणतात. संकेतासाठीं जीं जीं लक्षणें व नामें सांगावीं त्या

साचार । जें कां नित्य निरंतर । संचलें असे ॥ २ ॥ तें भगवंताचें निजरूप । त्यास बोलिजे स्वरूप । याही वेगळीं अमूप । नामें तयाचीं ॥ ३ ॥ त्यास नामाचा संकेत । कळावया हा दृष्टांत । परी तें स्वरूप नामातीत । असतचि असे ॥ ४ ॥ दृश्यासबाह्य संचलें । परी तें विश्वास चोरलें । जवळीच नाहींसें जालें । असतचि कैसें ॥ ५ ॥ ऐसा ऐकोनियां देव । उठे दृष्टीचा भाव । पाहों जातां दिसे सर्व । दृश्यचि आवघें ॥ ६ ॥ दृष्टीचा विषयो दृश्य । तोचि जालियां सादृश्य । तेणें दृष्टी पावे संतोष । परी तें देखणें नव्हे ॥ ७ ॥ दृष्टीस दिसे तें निरसे । येतद्विषईं श्रुति असे । म्हणोन जें दृष्टीस दिसे । तें स्वरूप नव्हे ॥ ८ ॥ स्वरूप तें निराभास । आणी दृश्य भासलें साभास । भासास बोलिला नास । वेदांतशास्त्रीं ॥ ९ ॥ आणी पाहातां दृश्यचि भासे । वस्तु दृश्यावेगळी असे । स्वानुभवें पाहातां दिसे । दृश्यासबाह्य ॥ १० ॥ जें निराभास निर्गुण । त्याची काय सांगावी खूण । परी तें स्वरूप जाण । सन्निधचि असे ॥ ११ ॥ जैसा आकाशीं भासला भास । आणी सकळांमध्यें आकाश । तैसा जाणिजे जगदीश । सबाह्य अभ्यंतरीं ॥ १२ ॥ उदकामध्यें परी भिजेना । पृथ्वीमध्यें परी झिजेना । वन्हीमध्यें परी सिजेना । स्वरूप देवाचें ॥ १३ ॥ तें रेंद्यामध्यें परी बुडेना । तें वायोमध्यें परी उडेना । सुवर्णीं असे परी घडेना । सुवर्णासारिखें ॥ १४ ॥ ऐसें जें संचलें सर्वदा । परी तें आकळेना कदा । अभेदामाजीं वाढवी भेदा । ते हे अहंता ॥ १५ ॥ तिच्या स्वरूपाची खूण । सांगों कांहीं वोळखण । अहंतेचें निरूपण । सावध ऐका ॥ १६ ॥ जे स्वरूपाकडे पावे । अनुभवासवें झेंपावे । अनुभवाचे शब्द आघवे । बोलोन दावी ॥ १७ ॥ म्हणे आतां मीच स्वरूप । तेंचि अहंतेचें रूप । निराकारीं

सर्वांहून तें पलीकडे आहे. दृश्याच्या अंतर्बाह्य तें असून तें जनांच्या दृष्टीपासून चोरलें आहे म्ह० जवळ असून नाहीं सारखें झालें आहे. देवाचें हें वर्णन ऐकून दृष्टीला वाटतें कीं तो पहावा. दृष्टीचा विषय-' अहाहा ! काय नक्षत्रतारांची शोभा, कसे हे सूर्य-चंद्र, नद्या-पर्वत, फुलें व मुलें अशी लीला पाहून त्याचें स्मरण होतें, पण हें कांहीं देव पाहणें नव्हे-हें देवदर्शन नव्हे. जातां सारें दृश्यच दिसतें. दृश्य तेवढें साभास व नाशवंत; व वस्तु दृश्यावेगळी आहे असें वेदांतशास्त्र सांगतें, बाकी स्वानुभवें पाहतां ब्रह्म दृश्यासबाह्य आहे. त्याची खूण काय सांगावी ! ' तें स्वरूप सन्निधचि असे ' एवढें म्हणतों. आकाशासारखेंच ब्रह्म सर्वांशीं अलिप्त असून सकळां सबाह्य आहे. तें उदकांत असून भिजत नाहीं, पृथ्वींत असून झिजत नाहीं, अग्नींत असून शिजत नाहीं, वायूंत असून उडत नाहीं, सुवर्णांत असून त्याचे अलंकार घडत नाहींत (१-१४). असें तें सर्वत्र अभिन्नपणें संचलें असतांही आकळत नाहीं. त्या अभेदांत अहंता (कल्पना) भेद वाढविते. त्या अहंतेचें रूप ऐका (१५-१६). अहंता स्वरूपाकडे धांवून मीच स्वरूप (अहं ब्रह्मास्मि) म्हणते, पण असें म्हणतांच ती स्वरूपाहून वेगळी

आपेंआप । वेगळी पडे ॥ १८ ॥ स्वयें मीच आहें ब्रह्म । ऐसा अहंतेचा भ्रम । ऐसिये सूक्ष्मीं सूक्ष्म । पाहातां दिसे ॥ १९ ॥ कल्पना आकळी हेत । वस्तु कल्पनातीत । म्हणोन नाकळे अंत । अनंताचा ॥ २० ॥ अन्वय आणी व्यतिरेक । हा शब्दभेद कोणी येक । निशब्दाचा अंतरविवेक । शोधिला पाहिजे ॥ २१ ॥ आधीं शोधिजे वाच्यांश । मग वोळखिजे लक्ष्यांश । लक्ष्यांशीं पाहातां वाच्यांश । असेल कैंचा ॥ २२ ॥ सर्वब्रह्म आणी विमळब्रह्म । हा वाच्यांशाचा अनुक्रम । शोधितां लक्ष्यांशाचें वर्म । वाच्यांश नसे ॥ २३ ॥ सर्व विमळ दोनी पक्ष । वाच्यांशीं आटती प्रत्यक्ष । लक्ष्यांशीं लावितां लक्ष । पक्षपात घडे ॥ २४ ॥ हें लक्ष्यांशें अनुभवणें । येथें नाहीं वाच्यांश बोलणें । मुख्य अनुभवाचें खुणे । वाचारंभ कैंचा ॥ २५ ॥ परा पश्यंती मध्यमा वैखरी । जेथें वोसरती च्यारी । तेथें शब्दकळाकुसरीं । कोण काज ॥ २६ ॥ शब्द बोलतां सर्वेंच नासे । तेथें शाश्वतता कोठें असे । प्रत्यक्षास प्रमाण नसे । बरें पाहा ॥ २७ ॥ शब्द प्रत्यक्ष नासिवंत । म्हणोन घडे पक्षपात । सर्व विमळ ऐसा हेत । अनुभवीं नाहीं ॥ २८ ॥ ऐक अनुभवाचें लक्षण । अनुभव म्हणिजे अनन्य जाण । ऐक अनन्याचें लक्षण । ऐसें असे ॥ २९ ॥ अनन्य म्हणिजे अन्य नसे । आत्मनिवेदन जैसें । संगभंगें असतचि असे । आत्मा आत्मपणें ॥ ३० ॥ आत्म्यास नाहीं आत्मपण । हेंचि निःसंगाचें लक्षण । हें वाच्यांशें बोलिलें जाण । कळावया कारणें ॥ ३१ ॥ येरवीं लक्ष्यांश तो वाच्यांशें । सांगिजेल हें घडे कैसें । वाक्यविवरणें अपैसें । कळों लागे ॥ ३२ ॥ करावें तत्वविवरण । शोधावें ब्रह्म निर्गुण । पाहावें आपणास

पडते. ‘ मी ब्रह्म ’ असें वाटणें हा अहंकारच आहे. हें सूक्ष्मपणें पहावें. ‘ मी ब्रह्म ’ हें कल्पना बोलते, हा हेतु कल्पना ओळखते, पण ब्रह्म कल्पनातीत असल्यामुळें त्याचा पार लागत नाहीं, तें अनंत आहे. अन्वय आणि व्यतिरेक म्हणजे पिंडब्रह्मांडाची उभारणी व संहारणी हा शब्दभेद आहे, पण निःशब्द वस्तूचा अंतरविवेक शोधून अनुभविला पाहिजे. शब्द सोडून अर्थ, वाच्यांश टाकून लक्ष्यांश घ्यावा. ‘ सर्वब्रह्म ’ व ‘ विमलब्रह्म ’ हे दोन पक्ष आहेत, पण हे दोन्ही वाच्यांश आहेत, त्या दोन्हींचें लक्ष्य पाहिलें पाहिजे. वर्म उमगल्यावर हे शब्द व पक्ष कांहीं उरत नाहीं. येथें बोलावयाचें काम नाहीं, जेथें अनुभव घ्यायचा तेथें वाचारंभ कसचा ? परादि चारी वाचा जेथें आटतात तेथें शब्दांचें कौशल्य काय चालणार ? शब्द बोलतो व लगेच नाहींसा होतो, त्याची शाश्वतता कोठें आहे ? शब्द नाशवंत म्हणून पक्ष व नाना मतें बोलतात. अनुभवस्वरूप ब्रह्माच्या ठिकाणीं ‘ सर्वब्रह्म ’ नाहीं तसें ‘ विमल ब्रह्मही ’ नाहीं, अनुभव म्ह. अनन्य, अनन्य म्ह. अन्य नाहीं. हें आत्मनिवेदन. सर्व संग नाहींसा होतो व आत्मा आत्मपणानें आहे तसाच आहे. आत्म्याला आत्मपण नाहीं, हें त्याच्या निःसंगपणाचें लक्षण होय; आणि हाही वाच्यांश कळावा म्हणून सांगितला आहे, वाच्यांशानें लक्ष्यांश सांगतांच येत नाहीं, पण कळण्यासाठीं सांगावा लागतो (१७–३२). तत्वांचें विवरण करावें, तत्त्वांच्या पलीकडील

आपण । म्हणिजे कळे ॥ ३३ ॥ हें न बोलतांच विवरिजे । विवरोन विरोन राहिजे । मग अबोलणेंचि साजे । महापुरुषीं ॥ ३४ ॥ शब्दचि निःशब्द होती । श्रुति नेति नेति म्हणती । हें तों आलें आत्मप्रचिती । प्रत्यक्ष आतां ॥ ३५ ॥ प्रचित आलियां अनुमान । हा तों प्रत्यक्ष दुरभिमान । तरी आतां मी अज्ञान । मज कांहींच न कळे ॥ ३६ ॥ मी लटिका माझें बोलणें लटिकें । मी लटिका माझें चालणें लटिकें । मी माझें अवघेंचि लटिकें । काल्पनिक ॥ ३७ ॥ मज मुळींच नाहीं ठाव । माझें बोलणें अवघेंचि वाव । हा प्रकृतीचा स्वभाव । प्रकृती लटिकी ॥ ३८ ॥ प्रकृति आणि पुरुष । या दोहींस जेथें निरास । तेथें मीपण विशेष । हें केंवि घडे ॥ ३९ ॥ जेथें सर्वही अशेष जालें । तेथें विशेष कैंचें आलें । मी मौनी म्हणतां भंगलें । मौन्य जैसें ॥ ४० ॥ आतां मौन्य न भंगावें । करून कांहींच न करावें । असोन निःशेष नसावें । विवेकबळें ॥ ४१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ब्रह्मनिरूपणनाम समास द्वितीय ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥ श्रोतीं केला अनुमान । ऐसें कैसें ब्रह्मज्ञान । कांहींच नाहीं असोन । हें केंवीं घडे ॥ १ ॥ सकळ करून अकर्ता । सकळ भोगून अभोक्ता । सकळांमधें अलिप्तता । येईल कैसी ॥ २ ॥ तथापी तुम्ही म्हणतां । योगी भोगून अभोक्ता । स्वर्गनर्कही आतां । येणेंचि पाडें ॥ ३ ॥ जन्ममृत्यु भोगीलेच भोगी । परी तो भोगून अभोक्ता योगी । यातनाही तयालागीं । येणेंचि पाडें ॥ ४ ॥ कुटून नाहीं कुटिला । रडोन नाहीं रडला । कुंथोन नाहीं कुंथिला । योगेश्वर ॥ ५ ॥ जन्म नसोन घातला ।

ब्रह्म शोधावें व आपण तेंच हें ओळखावें. हें न बोलतां विवरून पहावें. महात्मे ब्रह्माविषयीं मौनच धरितात. शब्द तेथें मुके होतात, हें प्रचीतीनें पहावें. येथें अनुमान काय कामाचें ? ' मी अज्ञान, माझें बोलणें लटकें, मला मुळींच ठाव नाहीं, एक ब्रह्मच आहे ' हें बोलणेंही प्रकृतींतलें आहे म्हणून कांहीं न बोलतां मीपण सोडून ब्रह्मीं लीन व्हावें. प्रकृतीचाच नव्हे तर पुरुषाचाही जेथें (ब्रह्मस्वरूपीं) निरास होतो, तेथें ' मी ' आणि ' बोलका ' हें कोठें उरतें ? तेथें सर्वच सपाट होतें, विशेषत्वानें कांहींच नाहीं. ' मी मौनी ' म्हणतांच मौन भंग पावतें, हा मौनी नाहीं हें जनांस कळतें. त्याप्रमाणें ' मी ब्रह्म ' म्हणतांच हा ब्रह्माहून वेगळा पडला, अहंतेनें घेरला असें समजतात. तात्पर्य, मौन भंगूं नये, म्ह. ब्रह्म होऊन ' मी ब्रह्म ' अहंतेचा वारा लागूं देऊं नये ; विहित कर्में करून ' मी कर्ता, ' असें मानूं नये, असून कांहींच नसावें (३३–४१). [द० ९, स० २]

९ प्रश्न—तुम्ही म्हणतां कीं ज्ञाता करून अकर्ता, भोगून अभोक्ता त्याचप्रमाणें सकळांत असून अलिप्त असतो, तर उलट यावर मी असें म्हणतों कीं आतां यथेच्छ पापाचरण करण्यास कांहींच हरकत राहिली नाहीं ! कारण याच न्यायानें जन्ममृत्यु भोगून न भोगल्यासारखे, पाप करून न केल्यासारखें, स्वर्गाला व नरकालाही जाऊन